
ऐतिहासिक

जैनवीर



लेखक
बा. भु. पाटील

दक्षिण महाराष्ट्र जैन सभा, ग्रंथ–माला.

ऐतिहासिक जैनवीर

—अर्थात्—

अहिंसा धर्माचें सत्यस्वरूप.

लेखक व प्रकाशकः—

बाबगौडा भुजगौडा पाटील,

बी. ए. एल्एल्. बी. वकील, सांगली.

—मुद्रक—

बा० आ० पाटील.

सत्यवादी स्टीम प्रेस, कोल्हापूर.

प्रति २०००] महावीर संवत २४६१ [किंमत १२ आणे

ॐ

दक्षिण महाराष्ट्र जैनसभा, ग्रंथ-माला.

—उद्देश—

जैनधर्म, जैनसंस्कृति व जैनइतिहास यांची जैनेतरांना ओळख व्हावी व जैनधर्मावरील त्यांचे आक्षेप व गैरसमज दूर होऊन जैनधर्माच्या श्रेष्ठत्वाची व उदारतेची त्यांना कल्पना यावी आणि जैनधर्मीयांना आपल्या पुण्यश्लोक पूर्वजांचे स्मरण करून देऊन कार्यप्रवृत्त करावें; यासाठीं-

(१) ऐतिहासिक व धार्मिक विषयावरील छोटीं पुस्तकें सुलभ मराठी भाषेंत प्रसिद्ध करणें,

(२) अशा पुस्तकांचा शक्य तितका अधिक प्रसार व्हावा व तीं सर्वांना विकत घेतां यावींत म्हणून तीं अत्यल्प किंमतीस विकणें,

(३) अशीं पुस्तकें प्रसंगीं शाळा-कॉलेजांतील ग्रंथालयांना मोफत देऊन मतप्रचार करणें.

यानंतर प्रसिद्ध होणारीं पुस्तकें:—

(१) दक्षिण हिंदुस्थान व जैनधर्म (ऐतिहासिक)

(२) जैनधर्माची उदारता व प्राचीनता (धार्मिक)

तेव्हां या मालेच्या ग्रंथप्रकाशनाला जैनधनिकांनीं उदार हस्तें मदत देऊन जैनधर्माच्या प्रभावनेचें श्रेय घ्यावें, अशी आग्रहाची विनंति आहे.

पत्रव्यवहाराचा पत्ता:— सम्पादक, द. म. जैनसभा ग्रंथ-माला,
पो. सांगली (S. M. C.)

निवेदन

इतिहास ह्मणजे भूतकालांतील घडामोडीची स्मृति. गतस्मृति म्हणजे विद्यमानांना कर्तव्यस्फूर्तीचा अखंड झरा. समाजांतील व धर्मांतील महान विभूतींच्या व वीरशाली पुरुषांच्या कर्तबगारीचा इतिहास म्हणजेच राष्ट्राचा इतिहास होय. गतेतिहासाचें ज्ञान झाल्यानें आपणामध्यें जागृति, जिवंतपणा उत्साह व कर्तव्यतत्परता येणार आहे. महान पुरुषांच्या चरित्रस्मरणामुळें मन आनंदित व पवित्र होतें; शरिरांत स्फूर्ति व कर्तव्यतत्परता संचारू लागते. आपल्या घराण्यांतील, गांवांतील, समाजांतील, धर्मांतील व राष्ट्रांतील वीरवर, आचार्य व कर्तृत्ववान पुरुषांच्या इतिहासज्ञानामुळें, त्यांच्या स्मृतीमुळें आपला आदर दुणावतो, आनंद द्विगुणीत होतो व कर्तव्यस्फूर्ति शतगुणीत झाल्यास नवल नाहीं.

जैनधर्म व त्याचा प्रसार; जैनराजे व त्यांचीं राज्यें; जैनवीर व त्यांची कर्तबगारी; जैनाचार्य व पंडित आणि त्यांचे ग्रंथ व वाङ्मय-सेवा; जैन शिल्पकार व त्यांचें कलाकौशल्य; जैनसंस्कृति व तिनें केलेले संस्कार यांचा इतिहास अत्यंत गौरवास्पद आहे. विद्यमान समतावादाच्या युगांतहि जैनेतरांची दृष्टि या इतिहासाकडे वळली नसेल तर त्यांना याबद्दल फारसा दोष लाविता येणार नाहीं, परंतु जैनइतिहासाबद्दल दृष्टी साफ व मन विकाररहित न ठेविल्यास ते दोषार्ह आहेत. जैन इतिहासाबद्दल अज्ञानानें आक्षेप घेणाऱ्या जैनेतरांचे आक्षेप कदाचित् क्षम्य मानिलें जातील, परंतु बुद्धिपुरःस्सर व सहेतूक आक्षेप घेऊन जैनधर्म व त्या धर्माचें अनुयायी यांच्याबद्दल गैरसमज पसरविणाऱ्यांचा गुन्हा जैनांच्या अनास्थेपेक्षांहि अक्षम्य व निंद्य आहे; कारण असले

आक्षेप व गैरसमज दूर करण्याचें कार्य अधिक कष्टतर व प्रसंगीं, नाईलाजानें व न कळत उखाळयापाखाळ्या काढून निष्कारण, वर्दळीवर यावें लागल्यानें दुर्घटहि होतें.

जैनधर्माचा व जैनांचा इतिहास उपलब्ध करून देण्याचा प्रयत्न आमच्या उत्तरेकडील हिंदी व गुजराथी जैनबांधवाकडून होत आहे, परंतु जैनधर्माच्या दृष्टीनें आशिर्वादित दक्षिण हिंदुस्थान व कर्नाटक–अर्थातच महाराष्ट्रीय व कन्नड-प्रांतीय धर्मबांधवाकडून कोणताच प्रयत्न होऊं नये याबद्दल खेद होत आहे. जैन-इतिहास लिहिण्यास दक्षिण हिंदुस्थान साधनसामुग्रीनें समृद्ध असतां त्या सामुग्रीची अवहेलना करून ती सामुग्री नष्ट होऊं देण्याइतकें दुसरें पातक तें कोणतें? अल्पांशानें कां होईना या पातकांतून मुक्त व्हावें अशी इच्छा झाली, परंतु इतिहासलेखकाच्या पात्रतेची अडचण आड येऊं लागली म्हणून स्वतंत्र इतिहास लिहिण्याचा विचार सोडून द्यावा लागला. हें पुस्तक म्हणजे त्या विषयासंबंधी इतर भाषेंत लिहिलेलीं पुस्तकें व तदनुषंगीक इतर वाङमय पाहून त्यांतील सार मराठींत देऊन दुधाची हौस ताकावर भागवून घेण्याच्या समाधानाचें फल आहे.

दक्षिण हिंदुस्थानांतील जैनधर्माचा जैन इतिहास मराठींत लिहिण्याचा प्रयत्न प्रस्तुत लेखक करीत असतां अनेक जैनवीरांच्या चरित्राची जी त्रोटक माहिती मिळाली, ती एकत्रित करून प्राथमिक शाळांतील बाळगोपाळा-साठीं कांहीं चरित्रविषयक पुस्तकें हल्लीं प्रसिद्ध झाली आहेत, त्या धर्तीवर जैनवीरांची चरित्रें प्रसिद्ध करावीत असा विचार मनाशीं केला. परंतु तेवढ्यानें मनाचें समाधान होईना. आबालवृद्ध सामान्य वाचकांना उपयुक्त व्हावे व जैनधर्मावर घेतलेल्या कांहीं आक्षेपांचे निरसन करावें

या हेतूने हा अल्पसा प्रयत्न आहे. या प्रयत्नांत दिलेल्या जैनवीरांची चरित्रें म्हणजे अफाट सागरांतील एका बिंदूवत् होत ; तसेंच अहिंसातत्वाच्या या पुस्तकांत दिलेल्या सत्यस्वरूपाबद्दलहि वरीलप्रमाणेंच म्हणता येईल. जैनाचार्यांनीं अहिंसातत्वाचा सूक्ष्म व सांगोपांग विस्तारपूर्वक विचार केला आहे, त्याचें अत्यंत त्रोटक सार देणेंहि प्रस्तुतसारख्या प्रयत्नांत शक्य नाहीं. फक्त जैन अहिंसातत्वाबद्दल ज अज्ञान पसरलें आहे व गैरसमज माजले आहेत ते अल्पांशानें तरी दूर व्हावेत व जिज्ञासूंची दृष्टी या पुस्तकांतील विषयाच्या सांगोपांग अध्ययनाकडे वळावी एवढा एकच हेतू हें पुस्तक लिहिण्यांत आहे.

ब्रम्हश्री दिवेकरशास्त्री यांनीं आपल्या **आर्यसंस्कृतीचा उत्कर्षापकर्ष** या पुस्तकांत हिंदुस्थानच्या व आर्यसंस्कृतीच्या अवनतीचीं व अपकर्षाचीं कारणें म्हणजे जैनधर्मीय अहिंसावाद, बौद्ध धर्मातील जगन्मिथ्यावाद, 'संसार असार व दुःखमय आहे' ही शिकवण व संन्यास-धर्माचें खूळ ही होत; असें बिनदिक्कत प्रतिपादिलेलें पाहून मनास विजेसारखा धक्का बसला असल्यास नवल नाहीं. श्री. दिवेकरांचें अगर त्यांच्या अनुवादित मतांचें जे लेखक आहेत त्यांची विचारसरणी किती भ्रामक व चुकीची आहे हें दाखविण्याचा हा अल्पसा प्रयत्न आहे. अर्थातच दिवेकरांचें **आर्यसंस्कृतीचा उत्कर्षापकर्ष** हें पुस्तक या पुस्तकांतील मत प्रतिपादन करितांना पार्श्वभूमि-Back Ground- म्हणून उपयोगांत आणिलें आहे.


लेखकाची ही कृति पसंत पडल्यास अशाच दुसऱ्या प्रयत्नास हात घालण्यास लेखकास प्रोत्साहन मिळणार आहे.

अल्प-परिचय.

मिरज शाखेच्या पटवर्धन घराण्यांत वाटण्या होऊन श्रीमंत आप्पासाहेब पटवर्धन यांनीं आपल्या हिश्शास आलेल्या जहागिरीची राजधानी सांगलीस आणिली, त्यावेळीं सांगली हें अगदींच सामान्य प्रतीचें-खेडेगांव वजा-गांव होते. या वाटण्यामुळें या गांवचे ग्रह बदलले. सांगलीस राजाचें ठाणें आल्यानें तिला राजधानीचें स्वरूप आलें, परंतु यावेळीं नांव सोनूबाई व हातीं कथलाचा वाळा अशी स्थिति होती. जहागिरीबरोबरच राज्यव्यवस्थेला लागणारा जो बराच संच वाटपांत वाटून आला, त्या सर्वांची व राज्यव्यवस्थेला लागणाऱ्या याशिवायच्या सामुग्रीची तरतूद करणें श्रीमंत आप्पासाहेबांना जरूर वाटले. नवी विटी नवें राज्य. तेव्हां अनेक सुखसोयींची व साधनांची तरतूद करून राजधानी सर्वांगसुन्दर करण्याकडे श्रीमन्तांनीं लक्ष दिलें.

श्रीमंतांनीं सराफी, कापड, भुसार, किराणा व सावकारीधंदा करणाऱ्या व्यापाऱ्यांना बोलावून आणून त्यांना आश्रय देऊन, व्यापारास लाविलें. सुतार, गवंडी, तेली, तांबोळी, न्हावी, परीट, गवळी, बुरुड अशा लोकांना मदत करून त्यांना रहिवाशी केलें. राजधानीमुळें गांवच्या वाढणाऱ्या व्यापाराला सर्व तऱ्हेचा पुरवठा करून, राजधानी सर्वांगसुन्दर करण्याचा आटोकाट प्रयत्न झाला. यासाठीं नवी वस्ती व नवी पेठ वसवावी लागली, व्यापार सुरू झाला; इमारतींचीं बांधकामें सुरू झालीं.


अशा वेळीं सांगलीस उतारमालाच्या बाजारपेठेचें स्वरूप येणें जरूर आहे असें वाटल्यानें अडतीचा धंदा करणाऱ्या व्यापाऱ्यांना बोला-



स्व. बाबाजी शांताप्पा आरवाडे.

वून घेऊन आश्रय दिला. सांगलीचें औरवाडे घराणें यांची प्रामुख्यानें यांत गणना केली जाते. नव्या पेठेची रचना व त्यांतील विद्यमान वस्ती पाहिल्यासही हीच गोष्ट प्रत्ययास येते. नृसिंहवाडींतून हें औरवाडे घराणें व्यापारासाठीं सांगलीस आलें.

[या घराण्याची वंशावळ खालीं दिली आहे.]



यापैकीं शांतापाचे चिरंजीव कै० बाबाजी यांचे चिरंजीव श्री. जंबूरावादिक त्रिवर्गबंधू हे आपल्या पूज्य पित्याच्या (स्वर्गवासी बाबाजी) यांच्या स्मरणार्थ सालदरसाल कांहीं रक्कम धर्मादायासाठीं व धर्मप्रभावनेसाठीं काढून ठेवितात. यापूर्वीहि त्यांनीं भक्तामरस्तोत्र सटिक, जैन निर्ग्रंथमुनी व त्यांचे टीकाकार वगैरे पुस्तकें छापून प्रसिद्धहि केलीं आहेत. प्रस्तुत पुस्तकहि या तिघांच्या धर्मप्रभावनेच्या हेतूचें फळ आहे. पुस्तक प्रसिद्धीच्या खर्चाचा कोणताहि मोबदला तर त्यांनीं घेतलाच नाहीं, परंतु विजयाच्या वाचकांच्या हातीं हें पुस्तक विनामूल्य पडल्यास या पुस्तकछपाईचा खर्च सत्कार्यीं लागणार असें वाटल्यानें विजयाच्या वाच-

कांना भेट ह्मणून देण्याचें ठरविलें व द. म. जैनसभा व तिचें मुखपत्र यांना उपकृत करून ठेवून जैनसमाजांत एक आदर्शनीय उदाहरण घालून दिलें आहे.

या प्रोत्साहनाच्या जोरावर व विजयाच्या वाचकांना भेटीस देऊन जीं पुस्तकें राहतील त्यांच्या विक्रीच्या रकमेंतून व जैनसमाजाच्या आशिर्वादाच्या बळावर जैनधर्माचें व जैन इतिहासाचें ज्ञान करून देणारीं अशाच स्वरूपाचीं पुस्तकें प्रसिद्ध व्हावींत अशी त्यांची इच्छा आहे व ती सफल होईल अशी या लेखकास पूर्ण उमेद आहे.

अत्यंत जरूरीच्या प्रसंगीं द. म. जैनसभेच्या महामंत्रीपदाची जबाबदारी श्री. जंबूराव औरवाडे यांनीं आपल्या अंगावर अनेक वर्षें घेऊन समाजसेवा केली आहेच. मिळविलेल्या संपत्तीपैकीं कांहीं भाग सत्कार्यीं लावून ते तनमनधनें करून समाज व धर्मसेवा करीत आहेत हें त्यांना अत्यंत भूषणावह आहे.

जैन समाजाची व जैनधर्माची अशीच उत्तरोत्तर सेवा त्यांच्याकडून घडावी अशी प्रार्थना आह्मी करीत आहों.

आ. न. सेवक,

बा. भु. पाटील.

विचारांत घेतलेल्या पुस्तकांची यादी

(१) जैन शिलालेख संग्रह (हिंदी) लें. प्रो. हिरालाल·

(२) मद्रास व म्हसूर प्रांतके-प्राचीन जैनस्मारक. (हिंदी) ले. धर्मदिवाकर ब्र. सीतलप्रसादजी.

(३) बंबई प्रांतके प्राचीन जैनस्मारक (हिंदी) ले. धर्मदिवाकर ब्र. सीतलप्रसादजी.

(४) मौर्य साम्राज्यके जैनवीर (हिंदी) ले. अयोद्धाप्रसाद गोयलीय.

(५) जैन वीरोंका इतिहास और हमारापतन (हिंदी) ले. अयोध्याप्रसाद गोयलीय.

(६) जैन वीरोंका इतिहास (हिंदी) ले. श्री. बाबू कामताप्रसादजी जैन.

(७) भारतके प्राचीन राजवंश (राष्ट्रकूट) (हिंदी) ले. प्रो· विश्वेश्वरनाथ रेउ.

(८) संक्षिप्त जैन इतिहास-द्वितीय भाग-प्रथम खंड (हिंदी) ले. श्री. कामताप्रसादजी जैन.

(९) भारतके प्राचीन राजवंश [द्वितीय भाग] हिंदी ले. प्रो. विश्वेश्वरनाथ रेउ.

(१०) नागरिकनीति (मराठी) ले. ो. पुणतांबेकर.

(११) आर्यसंस्कृतीचा उत्कर्षापकर्ष (मराठी) ले. श्री. दिवेकर

[१२] जैनजगत्– हिंदी ता. १६-४-३४ चा अंक

(१३)The never to be forgottan Empire. part I ले. श्री. सूर्यनारायणराव. बी. ए., एम् आर. ए. एस्.

[१४] Studies in South Indian Jainism. इंग्रजी.

[१५] The Kadamba Kula. इंग्रजी. मि. मोरीअस्

(१६) The historical inscriptions of South India. इंग्रजी.

(१७) हिंदुस्थानचा इतिहास- श्री. सरदेसाई, प्रो. ओतुरकर वगैरे वगैरे.


(१८) वीर हिंदी मासिक.

(१९) राजपुताने के जैनवीर ले. आयोद्धाप्रसाद गोयलीय

(२०) पंचरत्न, नवरत्न ले. बाबू कामताप्रसादजी. एम्. आर. ए. एस्.

(२१) भारतीय तत्वज्ञान ले. श्री. नरसिंह चिंतामण केळकर संचालक, केसरी.

(वरील ग्रंथकारांचा प्रस्तुत लेखक आभारी आहे.)



प्र-स्ता-व-ना

जैनधर्म व जैनसंस्कृती यांचा अभ्यास अद्यापपावेतों विविध झालेला नाहीं. बहुजनसमाजांत बौद्धधर्माची जितकी माहिती आहे तितकी जैनधर्माची नसल्याचें दिसून येत आहे. याला कारणें पुष्कळ आहेत. जैनलोक आपले ग्रंथ-संग्रह परकियांना दाखविण्यास तयार नसल्यामुळें, पौर्वात्य संस्कृतीच्या अभ्यासांत जैनधर्माचा नंबर बराच मागें लागला आहे. जैनसंस्कृतीच्या अभ्यासाचें साहित्य सर्व हिंदुस्थानभर विस्कळित असल्यानें. त्याची जुळवाजुळव होण्यास बराच अवधी लागला तथापि अजून जुळवाजुळवीचें संपूर्ण व सुसंबंध काम झालेलेंच नाहीं. आणि जें कांहीं जैनधर्म व जैनसंस्कृतीचें ऐतिहासिक कार्य झाले आहे, तें विशेष: पाश्चात्य विद्वान् पंडिताकडूनच झालें आहे. त्यांचें संशोधनाचें सिद्धांत निरनिराळ्या पौर्वात्य नियतकालिकांतच राहिल्यामुळें, बहुजनसमाजाला त्यांचा केव्हांच उपयोग झाला नाहीं ; व त्यामुळें बहुजनसमाजाचा गैरसमज दूर न होतां तो तसाच राहिला.

जैनधर्म व जैन-संस्कृती यांच्या अभ्यासाची विपुल सामुग्री हल्लीं अस्तित्वांत आहे. आजपर्यंत निदान, एक हजार तें बाराशेपर्यंत शिलालेख प्रसिद्ध झालेले आहेत आणि अद्यापही अप्रसिद्ध असे कित्येक शिलालेख दक्षिणेंत व उत्तरेंत पहावयास मिळतात, आणि यापुढेंही मिळतील. याशिवाय जैनांचें विपुल साहित्य प्राकृत (अर्धमागधी, शौरसेनी इत्यादि), संकृत, तामिळ, कन्नड, हिंदी, गुजराथी इत्यादि मृत व जीवित भाषेंत उपलब्ध आहे, व त्या त्या भाषेंतील ग्रंथांत, तत्कालीन, सोज्वल जैनसंस्कृतीवर प्रकाश पाडणारे अनेक पुरावे

मिळण्यासारख आहेत; परंतु सामुग्रीच्या अव्यवस्थित विपुलतेमुळें आणि विविधतेमुळें जैन संस्कृतीचा व जैन इतिहासाचा सर्वांगिण असा अभ्यास झालेला नाहीं. या सर्व सामुग्रीचा-वाङ्मयाचा- दोन दृष्टीनें अभ्यास होणें जरूर आहे. एक पंडितमान्य दृष्टी, व दुसरी सार्वत्रिक अर्थात व्यवहारिक दृष्टी. पहिल्या दृष्टीनें जैनधर्माचा व संस्कृतीचा अभ्यास थोडा बहुत झालेला आहे व साधारण पौर्वात्य पंडितांच्या मनांत जैन संस्कृतिविषयीं जो दूषित ग्रह पन्नास वर्षांपूर्वी दिसत होता, तो आज दिसत नाहीं. कित्येक पौर्वात्य पंडितांनीं जैनसंस्कृतीची मुक्त कंठानें स्तुती केलेली आहे व आजतागायतच्या भारतीय भवितव्यतेच्या रूपरेषेंत जैनधर्मानें प्रामुख्यानें भाग घेतल्याचें प्रतिपादिलें आहे. परंतु तीं सर्व मतें आणि विचार साधारण जनतेपर्यंत येऊन पोंहोचली नाहींत. त्यामुळें जैनधर्मासंबंधीं असलेला दूषित ग्रह साधारण बहुजनसमाजांतून नाहींसा झालेला नाही. वर उल्लेख केलेलीं पंडितमान्य मतें सर्वसाधारण समाजांस सुलभरीत्या बोध होण्यासाठीं जैन संस्कृतिसंबंधीं छोटछोटीं पुस्तके लिहिणें अत्यन्त जरूर आहे.

'अहिंसा परमो धर्मः' हें एक जैनधर्मातील मूलभूत व व्यापक असें तत्व आहे. नीतिशास्त्र, मानसशास्त्र व अध्यात्मशास्त्र इत्यादि जैनधर्माच्या प्रत्येक अवयवांत अहिंसेची व्याप्ती प्रामुख्यानें दिसून येते. हें तत्व जितकें ध्येयवाद्यांना आदर्श आहे, तितकेंच व्यवहार-दृष्टीला तें सुलभ आहे; व तसा उहापोह केल्याचे जैनग्रंथावरून दिसून येईल. जैनधर्माप्रमाणें नीतिधर्म दोन प्रकारचा आहे. एक गृहस्थधर्म व दुसरा मुनिधर्म. गृहस्थधर्मात पाळावयाचे नियम व गुण, मुनिधर्मात विशेष सूक्ष्मतेनें व निरपेक्षपणानें पाळावयाचे असतात. यावरून असें दिसून येईल कीं, जैनधर्म हा निवृत्तिमार्गपर व साधुसंन्यासाचाच धर्म नसून, प्रवृत्तिपर व्यवहारिक गृहस्थांचाही तो धर्म आहे. प्रत्येकानें मग तो गृहस्थ असो अथवा मुनी असो, आपलीं उपदिष्ट तत्वें पाळलींच

पाहिजेत. परंतु जैनधर्माकडें पाहणाऱ्यांच्या लक्षांत ही गोष्ट केव्हांच आली नाहीं. त्यामुळें जैनधर्म व अहिंसा यासंबंधीं असलेला गैरसमज जास्तच पसरत गेला. गैरसमज होण्याचीं दुसरींहि कारणें आहेत. पौर्वात्य पण्डितांनीं जैनधर्मांचा अभ्यास करतांना, मुनिधर्माचेच ग्रंथ प्रथम पाहिलें; व त्यावरून त्यांनीं आपलीं मतें बनविल्यामुळें, त्यांचीं जैनधर्मासंबंधीं असलेलीं मतें अपूर्ण, चुकीचीं आणि विकृत अशीच राहिलीं. पुढें जसजसा त्यांनीं गृहस्थधर्माच्या वाङ्मयाचा अभ्यास केला, तसतसा त्यांच्या पूर्वीच्या मतांत फरक पडूं लागला. गैरसमज होण्याचें तिसरें एक कारण ह्मणजे, अपूर्ण माहितीवर लिहिणाऱ्या लेखक-वर्गाचें लिखाण. हा लेखकवर्ग व्यवसायी होऊं पहात असतो. त्यांना कसेंतरी पुस्तक लिहून काढावयाचें असते. ठराविक मुदतींत वर्तमान-पत्र निघावयाचें असल्यास, त्याचे संपादक असेंच कांहींतरी लिहितात. जें कांहीं लिहितो त्याला सबळ आधार आहे कीं नाहीं, आपण त्याव-रील असणारें महत्वाचें वाङमय वाचलें आहे कीं नाहीं, याचा वरील संपादकवर्ग मुळींच विचार करीत नाहीं, तद्वतच या लेखकवर्गाची विकृत अशी जैनधर्मासंबंधीं मतें प्रसिद्धि पावलीं जातात.

अहिंसेचेंच उदाहरण घ्या. जैनांच्या अहिंसा तत्वाच्या उपदेशामुळें हिंदुस्थान देश अधोगतीस गेला, असे छातीठोकपणें सांगणारे वीर लेखक आज पुष्कळ पाहवयास मिळतील. हे लोक ज्यावेळीं हिंदुस्थानच्या राज-कीय स्थितीबद्दल बोलतात, त्यावेळींसुद्धां, यदाकदाचित् दोष देणें भाग पडल्यास, जैनांच्या अहिंसातत्वालाच संपूर्ण दोष लावतात. पण अहिंसा-तत्वाची क्वचित प्रसंगीं महतीच गाण्याचा प्रसंग आल्यास, अहिं-सा तत्त्व हें आपल्याच धर्मांतून जैन लोकांनीं घेतलें आहे असें बिनदिक्कत सांगतात. या आणि अशा तऱ्हेची असंबद्धता मराठी भाषेंतील कांहीं इतिहासकारांच्या ग्रंथांत आपणांस पहावयास सांपडेल, एवढेंच नव्हे तर कांहीं ग्रंथांत अशा तऱ्हेचें मत प्रतिपादन करतांना मतद्वेषाचा वास येतो.

या सर्वांला मुख्य कारण अहिंसा तत्वासंबंधीं असलेली सार्वत्रिक अनभिज्ञताच होय. **अहिंसा तत्वाची व्यापकता फारच मोठी आहे. तें एक मुमुक्षु मुनीचें हातांतील कर्मनाश करणारें तीक्षण शस्त्र होऊं शकतें, आणि निःशस्त्र अशा एका वीराच्या हातांतील राजकीय साधनसुद्धां बनूं शकतें.** अहिंसेच्या तत्वामुळें तर, हिंदुस्थान खास स्त्रैण बनला नाहीं आणि याला हिंदुस्थानच्या इतिहासाचाच पुरावा.

अहिंसावादी लोक युद्धें करूं शकत नाहींत आणि ह्मणूनच युद्धाच्या अभावीं परकियांना हिंदुस्थान आपल्या अंकित करण्यास संधी मिळाली व हिंदुस्थान देशाला अधोगति प्राप्त झाली, असें सांगण्यांत येतें. परंतु जैनांच्या अहिंसा तत्वाचें सूक्ष्म अवलोकन केल्यास असें स्पष्ट दिसून येईल कीं अहिंसावादी, आपलें राष्ट्र किंवा राज्य राखण्यासाठीं, स्त्रियांचें पावित्र्य व स्वतःचे आत्म-रक्षण यासाठीं युद्ध करूं शकतो ; व त्याला जैनधर्मीय अहिंसावादाची आडकाठी येऊं शकत नाहीं. अहिंसावादी निरपेक्ष असतो, पण त्याची कार्यतत्परता मात्र उत्कट असते. **त्याला मरणाची तर मुळींच भीति नसते ; प्राणिमात्रांचे संरक्षण करणें हें त्याचें आद्य कर्तव्य असतें.** आणि तें जर युद्धानेंच होऊं शकत असेल, तर, जैनवीर युद्ध करण्यास केव्हांही मागें पाहणार नाहीं. जैन पुराणांत युद्धांचीं अनेक वर्णनें आहेत आणि कोठल्याही जैनग्रंथांत, राष्ट्र अगर देश इत्यादिकांच्या संरक्षणासाठीं युद्ध करूं नये असें सांगितलें नाहीं. दक्षिण हिंदुस्थानचा इतिहास चाळल्यास, आपणांला असें आढळून येईल कीं, कित्येक जैन राजे व सेनापती यांनीं केवळ राज्य-स्थापन करण्यासाठीं व त्याच्या संरक्षणासाठीं, आपलें शौर्य युद्धभूमीवर प्रगट केलें आहे. चामुंडरायराजासारखे वीर व वैचप्प दंडनायकासारखे सेनापती जैनच होते. त्यांची तत्कालिन शौर्याची कीर्ति दिगंत होती, याला अनेक पुरावे आहेत. तद्वतच उत्तरेमध्यें सुद्धां खारवेला-सारखे मोठ मोठाले राजे जैनधर्मीच होते. व त्यांनीं राज्य-पालनासाठीं युद्धेंही केली आहेत. राजस्थानच्या इतिहासाचें सूक्ष्म अवलोकन केल्यास,

आभूसारख्या जैन सेनापतीचें उदाहरण आपणांस पाहवयास सांपडेल, स्वतःचा जीव धोक्यांत घालून मेवाड-राजकुलाचें संरक्षण करणारा आशाशाहा हाही जैनच होता. या आणि अशा तऱ्हेचीं कित्येक उदाहरणें पाहिल्यास, जैनांचें अहिंसातत्व व राष्ट्रादिकांच्या संरक्षणासाठीं त्यांनीं केलेलीं युद्धें, हीं परस्पर विसंगत नाहींत, असें सहज कळून येण्यासारखें आहे. ही वस्तुस्थिति न मांडली गेल्यामुळें अनभिज्ञ लेखकांकडून अहिंसेसारख्या उदात्त आणि व्यापक तत्वावर आक्षेप घेतले जातात. हे आक्षेप दूर करण्यासाठीं; अहिंसा तत्वाचें तात्विक स्वरूप सर्वांना सुलभ शब्दांत सांगण्यासाठीं आणि अहिंसा तत्वाचें व्यावहारिक स्वरूप योद्धयांच्या उदाहरणांनीं दाखविण्यासाठीं हें पुस्तक आमचे विद्वान मित्र श्री. पाटील वकील, संपादक ' प्रगति आणि जिनविजय ' यांनीं लिहिलें आहे. पुस्तकाच्या आरंभाच्या प्रकरणांत अहिंसेच्या व्यापकतेसंबंधीं चर्चा केली आहे; व नंतर चंद्रगुप्त, संप्रति, खारवेल, चामुण्डराय, बैचप्प, इरुगप्प इत्यादि जैनवीरांचीं संक्षिप्त चरित्रेंही दिलीं आहेत, आणि पुढेंपुढें आपल्या मातृभूमीच्या अधःपतनाची कारण-मिमांसाही केली आहे. या पुस्तकाच्या वाचनानें कोणाहि वाचकाला असें कळून चुकेल कीं, अहिंसातत्वाची व्यापकता सर्वगामी असून, ती व्यवहार्यही आहे. **या पुस्तकावरून असें आढळून येईल कीं, जैन-वीरांची शौर्यपरंपरा ही फार उज्वल असून, त्यांनीं अहिंसातत्वाच्या बलावरच कित्येक राज्यें मिळविलीं आणि त्याच्या बलावरच कित्येक शतकेपर्यंत भारतदेशाची स्वतंत्र ध्वजा आपल्या नेतृत्वाखालीं फडकविली.**

कोणत्याही धर्माचीं तत्वें व परंपरा समजून घेण्यासाठीं, त्या त्या धर्माचे आधारभूत ग्रंथ व ऐतिहासिक पुरावे सहानुभूतीनें वाचणें अत्यावश्यक आहे. **हिंदुस्थानच्या इतिहासांत जैन योद्धयांच्या व राजकारणधुरंधरांच्या कतवगारीचा, व त्यांना पक्ष दृष्टीनें मदत**

करणाऱ्या **आचार्यांच्या** महत्कार्यांचा, **समावेश केला नाही, तर तो इतिहास एकांगी असाच होईल.** जोंपर्यंत स्वतःच्या धर्मतत्वाइतकीच इतरांच्या धर्मतत्वाबद्दल व परंपरेबद्दल आपल्यात सहानुभूति नाही, तोपर्यंत धार्मिक असहिष्णुतेचा आरोप आपणावर आल्याशिवाय राहाणार नाहीं. आज **अहिंसातत्व सर्व भारतवासीयांचें झालेलें आहे.** त्या तत्वाची अमोघ शक्ति सर्वांना कळून चुकली आहे. अहिंसातत्वावर अनभिज्ञतेमुळें, पुष्कळांनीं शितोडे उडविले आहेत. परंतु त्यानें ते दूषित न होता उलट प्रभावीच बनत चालले आहे. या दृष्टीनें श्री० पाटील यांनीं हें पुस्तक लिहून बहुजन-समाजावर फारच उपकार केले आहेत. श्री० पाटील यांची प्रकृती असमाधानकारक असतांना, आणि रोजच्या कामांची दगदग असतांनासुद्धां, अशा तऱ्हेचा संकलनरूपी ग्रंथ निर्माण करणे हें खरोखर त्यांच्या जैन संस्कृतीविषयीं असलेल्या आस्थेचें द्योतक आहे. हिंदी वगैरे भाषेंत अशा तऱ्हेचें प्रयत्न पं. अयोध्याप्रसाद इत्यादिकांच्याकडून झालेलें आहेत. **मराठी भाषेंत मात्र अशा तऱ्हेचा हा ग्रंथ पहिलाच होय.** यां ग्रंथाचें वाचनानें, जैनेतरामध्यें अहिंसेविषयीं व जैनसंस्कृतीविषयीं असलेला गैरसमज दूर झाल्यास, श्री० पाटील वकील, यांनीं घेतलेल्या बहुमोल प्रयत्नांचें चीज होईल यांत तिळमात्रहि शंका नाहीं. जैनांना-सुद्धां हा ग्रंथ वाचून आपल्या संस्कृतीचा विशेष अभ्यास करण्याची खास स्फूर्ति होईल. दुसऱ्या आवृत्तीचा प्रसंग आल्यास, ठिकठिकाणीं प्रमाणभूतग्रंथांची टिपणें देऊन श्री० पाटील या ग्रंथाची प्रामाणिकता जास्तच वाढवितील, अशी आशा करतो. शेवटीं असले ऐतिहासिक महत्वाचें पुस्तक लिहून जैन वाङ्मयांत महत्वाची भर घातल्याबद्दल श्री० पाटील वकील यांना धन्यवाद देऊन आणि मराठी जाणणारा वाचकवर्ग या पुस्तकाचा भरपूर फायदा घेईल अशी आशा धरून, मी ही प्रस्तावना पुरी करतो.

कोल्हापूर
ता० १४।१२।१९३४.

आ. ने. उपाध्ये.

आ भा र:—

या पुस्तकाचीं मुद्रितें ज्या विद्वान सद्गृहस्थांकडे अभिप्रायासाठीं धाडिलीं त्यापैकीं बहुतेकांनीं वेळांत वेळ काढून आपले अभिप्राय लिहून पाठविलें व ते जशाच्या तसें सोबत प्रसिध्दहि केलें आहेत. श्रीमंत पंतप्रतिनिधी सं. औंध यांची अशा कार्यांतील आख्यायिका ऐकून श्रीमंताकडे अभिप्रायासाठीं विनंति केली व ती त्यानीं तात्काळ मान्य करून बहुविध व्यापांतूनहि वेळ काढून माझें पुस्तक तर वाचलेंच, परंतु त्या बरोबरच ब्रम्हश्री दिवेकरांचेंहि पुस्तक वाचून काढून आपला अभिप्राय दिला, याबद्दल श्रीमंताचा मी अत्यंत आभारी आहे. पं० सातवळेकर, श्री. आण्णासाहेब भोपटकर, श्रीमान रावसाहेब दोशी, प्रो. हिरालाल, श्री. महाजन वकील, श्री. पळसुले वकील व दि. ब. लठ्ठे यांनीं अभिप्राय देऊन मला उपकृत केलें याबद्दल मी त्यांचेही मनःपूर्वक आभार मानीत आहे.

माझे सन्माननीय मित्र प्रो. उपाध्ये यांनीं सुंदर प्रस्तावना लिहून दिली याबद्दलहि लेखक त्यांचा अत्यंत आभारी आहे.

या पुस्तकाची प्रकरणसूची तयार करण्याचें व हें पुस्तक शक्य तितकें सर्वांगसुंदर व दोषरहित व्हावें म्हणून सर्व प्रकारची मदत मनोभावें केल्याबद्दल माझे स्नेही श्री. के. आ. चौगुले बी. ए. एलएल. बी. वकील सांगली व सत्यवादी पत्राचे सम्पादक श्री. बाळासाहेब पाटील यांचे आभार मानणे मी माझें कर्तव्य समजतो. कारण थोड्याच मुदतींत छपाईची पूर्तता करून तें वाचकांच्या हातीं देण्यास सत्यवादीकर्ते श्री० पाटील व श्री० चौगुले वकील यांची मदतच कारणीभूत झाली.

विशेषत: श्री० पाटील यांनीं धर्मबंधुत्वाच्या व मित्रत्वाच्या नात्यानें अनेक सूचना करून पुस्तक आकर्षक करण्यास मदत केली याबद्दल त्यांचे व त्यांच्या प्रेसमधील कुशल कामगारांचे आभार मानणें मी माझें कर्तव्य समजतो

या पुस्तकावर अभिप्राय देणाऱ्यांनीं निरनिराळ्या दृष्टीनें पाहिले व त्यांना त्यांत दिसणारे गुणदोष त्यांनीं स्पष्ट शब्दांत कळविले. प्रस्तुत लेखक त्यावरून योग्य व जरूर तो बोध तर घेईलच; परंतु या अभिप्रायामुळें या पुस्तकाकडे कोणकोणत्या दृष्टीनें वाचकांनीं पहावें याचाही बोध होण्यास सुलभ झालें आहे.

पुस्तक लिहितांना कांहीं ठिकाणीं शब्दयोजना कडक झाली आहे, असें कित्येकांना वाटण्याचा संभव आहे याची जाणीव लेखकांस आहे.

या शब्द योजनेच्या मुळाशीं धर्माभिनिवेश असावा अशीही कोणी कोणी शंका घेईल, परंतु वडाची साल पिंपळाला लावण्याचा इतरांकडून प्रयत्न होत असतां त्याचा प्रतिकार विचारी लोकांकडूनहि होऊं नये हे पाहून खेद वाटतो. मात्र धर्माभिनिवेशाच्या भरांत ही कडक शब्दयोजना झालेली नसून सत्य वस्तुस्थिति कडक शब्दांत कथन करावी लागत आहे. याउप्परहि कोणाचे समाधान न झाल्यास **सर्वे जीवाः क्षमंतु मे** अशी क्षमा याचना करून त्यांच्या क्षमेस पात्र होणें हें मी माझें आद्य कर्तव्य समजतो. पुस्तकाची छपाई घाईनें करून घ्यावी लागल्यानें कांही मुद्रणदोष राहिले आहेत. पुढील आवृत्तींत ते दुरुस्त करण्यात येतील. असो.

शेवटीं ही माझी कृति सर्वांस पसंत पडो अशी मी सदिच्छा बाळगतो.

सांगली,
ता. २५।१२।३४,

आपला न. सेवक,
बा. भु. पाटील.

—प्रकरण-सूचिका.—

—*०*—

– विषय –			पृष्ठ

प्रकरण ४ थें

प्रकरण ५ वें

॥ ॐ ॥

* सादर-अर्पण *

—:o:—

परमपूज्य माता पिता व तत्सम मानलेली
द. म. जैन सभा यांना, अहिंसा धर्माचें
सत्यस्वरूप दाखविणारी ही
जैनवीरांची स्फूर्तिदायक
कथा-माला सादर
अर्पण.

आशिर्वादित,
बा. भु. पाटील.

❋ ऐतिहासिक जैनवीर ❋

प्रकरण १ लें.

कोणत्याहि देशाचा, राष्ट्राचा, धर्माचा अगर कुलाचा खराखुरा इतिहास समजन न घेतां त्यासंबंधी आक्षेपार्ह विधानें करणें किंवा रोग्याच्या रोगाचें "निदान" न करितां औषधोपाय करणें हे सारखेंच चुकीचें होणार आहे. कार्यावरून कारणाची व त्यांतूनहि शेकडों वर्षाखालीं अनेक कारणांच्या संयोगानें घडन आलेल्या कार्याच्या कारणांची मीमांसा आजच्या चष्म्यांतून पाहून निश्चित व ठाम मत बनविण्यापूर्वी फार दूरवर विचार करणें जरूर आहे. शेकडों वर्षांपूर्वी घडलेल्या कार्यांची व त्यावेळची प्रत्यक्ष अगर तत्कालीन (Immediate) व सुन्दर (Remote) कारणे तर्काच्या व बुद्धीच्या जोरावर बरोबर हुडकून काढणें अत्यंत कठीण व धाष्टर्याचें आहे. जैनधर्मांतील अहिंसा-तत्वाचें खरेखरें व सत्य स्वरूप समजून न घेतां केवळ तो धर्म जे हल्ली आचरतात त्यावरून या श्रेष्ठतम व सर्वमान्य तत्वांची अवहेलना करणें हें नाटकांतील राजाची तरवार पाहून त्यावरून खऱ्या वीराच्या हातांतील तरवारीच्या पाण्याची परीक्षा करण्यासारखेंच हास्यास्पद होणार आहे. मोठमोठ्या विद्वानांनीं एकवार आपली दिशाभूल करून घेतली कीं, सामान्य जनता साफ फसते जैनधर्मी अहिंसा-तत्वाबद्दल व संसार हा असार आहे या शिकवणीबद्दल कांहीं जैनेतर विद्वानांची अशीच दिशाभूल होत आहे. अशी दिशाभूल करण्याचा कांहींचा तर उघड संकल्प व उद्देशच असतो. अशा आक्षेपांतील दोषांचें व दुष्ट धोरणांचें वेळींच आविष्करण न झाल्यास पूर्वपक्ष खरा असावा असा दृढ समज होतो व दुसऱ्या लोकाकडन या चुकींच्या मताचा पुरस्कार झाल्यानें त्याचें प्रसारकार्य झपाट्यानें होऊं लागतें.

जैनधर्माच्या श्रेष्ठतेवर जे आक्षेप घेतले जातात, त्यापैकीं दोन महत्वाच्या आक्षेपांतील वैय्यर्थ दाखविण्याचा या पुस्तकांत प्रयत्न केला आहे. मनोरमा नांवाच्या एका हिंदी मासिकाच्या एका अंकांत जैनध-

मांतील अहिंसेचें सत्यस्वरूप वर्णन करण्याच्या हेतूनें लिहिलेल्या लेखांत लेखकानें लिहिलें आहे कीं, 'हिंसा घडेल म्हणून, मुखमार्जन व दन्तधावन करणें जैनांनीं सोडून दिलें, मग त्यांच्यांत शौर्यवीर्यादि गुणांची अपेक्षा कशी करावी?' 'सरोज' नांवच्या दुसऱ्या एका हिन्दी मासिकांतील लेखकानें तर याहीवर ताण केली आहे. तो म्हणतो कीं, 'एखाद्या प्राण्याची हिंसा होईल या भीतीनें जैनलोक रस्त्यावरून जातांना बरोबर झाडणी घेऊन जातात.' या लेखकाला असें म्हणावयाचें आहे कीं रस्त्यावर पाऊल टाकतांना हातांतील झाडणीनें प्रथम पायाखालील रस्ता झाडून जैनलोक तो प्रथम साफ करितात व साफ केलेल्या जागेवर दुसरें पाऊल टाकितात. कोण हा अविचार! किती हें अज्ञान!! थेंबेंथेंबे तळें सांचे असे या नियतकालिकांतील लेखांचे होते व पुढें अशाच आक्षेपांना अधिकृत म्हणून पुस्तकांत स्थान मिळते.

'मनोरमा' मासिकांतील मुखमार्जन व दंतधावन याबद्दलची विधानें दिगंबर आम्नायी मुनीलोकांच्या आचाराला उद्देशून लिहिले आहेत; श्रावकाच्या आचारांशीं या आक्षेपाचा कसलाही संबंध नाहीं. 'सरोज' मासिकांतील आक्षेप श्वेतांबर लोक जिनमंदिरांत शास्त्रवाचन व प्रतिक्रमण करण्यापूर्वीं आपलें आसन स्वच्छ करितात त्यास उद्देशून आहे हे चाणाक्ष वांचकांच्या लक्षांत आलेच असेल. ब्रम्हश्री दिवेकरशास्त्री आपल्या '**आर्यसंस्कृतीचा उत्कर्षापकर्ष**' या पुस्तकांत जे आक्षेप घेतात त्याकडे आतां आपण वळूं.

अहिंसेमुळें हिंदुसमाजाचा अपकर्ष

'धर्मासाठी मांसाहाराचा त्याग हिंदुसमाजानें केला व त्यामुळें तो आध्यात्मिक वैभवाच्या शिखरावर चढला.' असें कांहीं ह्मणत असतात त्यात तथ्य असो वा नसो, पण एवढें खरें कीं, "**या तत्त्वामुळें हिंदुसमाजाला राजकीयदृष्ट्या मृत्युपंथास जावें लागलें.**" असें विधान मॅक्समुलरनें केलें व तें सत्य मानून, मध्ययुगीन भारताच्या पहिल्या भागांत श्री. चिं. वि. वैद्य यांनीं मान्य केलें व तेंच अक्षरशः खरें आहे

असें ब्रम्हश्री दिवेकर-शास्त्री आपल्या आर्यसंस्कृतीचा उत्कर्षापकर्ष (पूर्वार्ध) पान १२५ वर उद्धृत करून, ठासून त्याचाच पुनरुच्चार करीत आहेत. परंपरागत पूर्वसंस्काराचें महत्व फार मानिलें जातें व यामुळें तीन हजार वर्षांपूर्वीच्या मांसाहाराच्या संस्काराचें भूत श्री. वैद्य व दिवेकरशास्त्री यांच्या डोक्यांत थैमान घालूं लागलें असावें असें वाटते ; मात्र मांसाहार त्यागांचे अत्यंत कटू दूरगामी (?) दुष्परिणाम कथन करितांना ते मॅक्समूलरच्या लिखाणामागें दडतात. मॅक्समुलरनें केलेलें विधान श्री. वैद्यासारख्या कांहींना मान्य आहे व या विधानांचा वेळींअवेळीं उपयोग करून, जैनधर्मांतील अहिंसा तत्वाची-या परमधर्माची निन्दा व नालस्ती केली जाते ही निंदा व नालस्ती किती अयथार्थ आहे हे यथामति दाखविण्याच्या एकाच हेतूनें हा अल्पसा प्रयत्न केलेला आहे.

श्री. महादेवशास्त्री दिवेकर यांनीं 'बुध्द-तत्वज्ञानाची छाप हिंदुसमाजावर पडण्याची जीं कारणें आपल्या वरील पुस्तकांत दिलीं आहेत, तीं व मॅक्समूलरनें 'राजकीयदृष्टचा हिंदूसमाजास मृत्युपन्थास जावें लागलें' असें विधान केलें आहे, याचा अर्थ ठिकठिकाणी विशद करून सांगताना ब्रम्हश्रींनीं जीं कारणें दिलीं आहेत, त्यांची दृढ ओळख करून दिल्याखेरीज या श्रेष्ठतम तत्वावर घेतल्या जाणाऱ्या बाणेरड्या आक्षेपांची खरीखुरी कल्पना व त्यामुळें होणाऱ्या घोर दुष्ट परिणामांची यथार्थ ओळख वाचकांना येणार नाहीं. श्री. दिवेकरशास्त्री पान ८३ वर लिहितात कीं, 'गौतमबुध्दाच्या "जगत् दुःखमय" आहे म्हणून तें त्याज्य या तत्वज्ञानानें लोकांना मोहिनी घातली. वैदिक कर्ममार्गांतील कठोरता, यज्ञाचें अवडंबर व प्रायश्चित्तांचा कठोरपणा यामुळें त्रस्त झालेल्या लोकांना हा धर्म (बुद्ध धर्म) पाहून आनंद झाला.' हिंदुसमाजांतील कोणत्या वर्णावर या धर्म-मताची छाप अधिक पडली हे सांगतांना दिवेकरशास्त्री म्हणतात कीं ' फक्त ब्राम्हण सोडून (कांहीं ब्राम्हणसुद्धां बौद्ध बनले होते) सर्व त्रैवर्णिकांवर बौद्ध तत्वज्ञा-

नाची इतकी विलक्षण छाप पडली कीं त्यामुळें ब्राम्हणांविषयीं अनादर व तिरस्कार उत्पन्न झाला. ब्राम्हण हे वैदिक तत्वविचार व वैदिक कर्ममार्ग यांच्याच विचारांत निमग्न झाले व इतर समाज 'जग दुःख-मय' आहे या तत्वज्ञानाला भाळला जाऊन, भिक्षू होण्याच्या मार्गाला लागला.' एवढा मोठा महात्मा बुद्ध परंतु त्याच्याहि मताची छाप ब्राम्हणावर पडली नाहीं असेंहि जातां जातां दिवेकरशास्त्र्यांनीं सांगून ठेवून **'अयं विशेषः'** हेहि दाखविलें. या तत्वज्ञानाचा हिंदुस्थानावर कोणता अनिष्ट परिणाम होईल, याचें आकलन महात्मा बुद्धाला झालें नाहीं ते दिवेकरशास्त्र्यांना करितां आलें हें वैशिष्टय तरी इतरांना कसें लाभणार ?

हिंदुस्थानाबाहेर प्रसार व त्याचे अनिष्ट परिणाम

'बौद्धतत्वज्ञानाचा हिंदस्थांनाबाहेर प्रसार करणाऱ्या बौद्ध भिक्षूंनीं स्वतःच्या अत्याचारी वर्तनानें हिंस्थानांतील तत्वज्ञान कसें आहे हें साक्षात दाखविले व त्यामुळें परकीयांनां या देशावर स्वाऱ्या करण्याचा मोह उत्पन्न झाला **असें वाटतें**. अहिंसा म्हणजे प्रतिकारतशून्यता व **सर्वं दुःखं सर्वं शून्यं** म्हणजे जगाकडे दर्लक्ष; हीं तत्वें बौद्धभिक्षूंनीं प्रतिपादिलीं; व त्यामुळें शिकंदरापासून अहमदशहा अबदालीपर्यंत जे जे परकीय लोक इकडे आले त्यांच्या पथ्यावर हिंदुस्थानांतील हें तत्वज्ञान पडलें यांत **संशय नाहीं**.' असें सदर शास्त्री आपल्या पुस्तकाच्या पान ८५ वरील टीपेत लिहितात. वरील जाडया टाईपांतील 'असें वाटतें' व 'संशय नाहीं' या शब्दप्रयोगा-वरूनहि शास्त्रीबुवांचें मत कसें द्विधा आहे हे जरी दिसून आले तरी हिंदुस्थानच्या अपकर्षाच्या मुळांशीं ही शिकवणच कारणीभूत आहे असें प्रतिपादन करण्याचा मोह त्यांना अना-वर झाल्याचें दिसत आहे. या तत्वज्ञानाची ओळखहि ज्या अनेक राष्ट्रांना नव्हती तेथेंहि राजकीय उलाढाली होऊन जूनी साम्राज्यें नष्ट झाली व तेथें नवीन राजे व राज्यें निर्माण झालीं व हा क्रम अद्याप अनिबंध व अव्याहत चालू आहे याकडे शास्त्रीबुवांचे लक्ष गेलें नाहीं तर त्यांत नवल

नाहीं. बौध्दधर्माच्या तत्वज्ञानामुळें दुबळ्या व स्त्रैण बनलेल्या हिंदुस्थानावर परकीयांना स्वाऱ्या करण्याचा मोह उत्पन्न झाला एवढेंच नव्हे तर 'ब्राम्हण व इतर वर्ण यांच्यामध्यें फारकत झाली.' असेंहि पान १०६ वर त्यांनीं प्रतिपादिलें आहे. हिंदुस्थानावर स्वाऱ्या करण्याचा मोह परकीयांना अनावर होण्यापूर्वीं बुध्दधर्माची छाप ब्राम्हणांवर पडलेली नाहीं; यामुळें अशा स्वाऱ्यांत आपणास कितपत यश येईल याचा विचार करण्याचें परकीयांना विस्मरण झालें असावें असें दिसतें. नाहीं तर अशा खाईत त्यांनीं निष्कारण उडीच घेतली नसती.

हिंदुसमाजाची दुबळी संरक्षक शक्ति

'बुध्द व जैन धर्माच्या उद्भवानें, विशेषत: जैनधर्माच्या उत्कर्षानें मध्यकाळांत समाज निवृत्तमांस झाला, पुढें बंगाल्यांत उत्पन्न झालेल्या नवीन वैष्णव मतानें अहिंसेलाहि धर्मांत मुख्य स्थान दिलें. त्यामुळें हिंदुसमाजाची **संरक्षक शक्ति** दुर्बळ होऊन तो परक्यांच्या हातीं पडला. ब्राम्हणांवर जसा जैन व बौध्द तत्वज्ञानाचा परिणाम झाला, तसाच क्षत्रियांवरहि झाला आणि पुष्कळ क्षत्रिय या दोन्ही (**बौध्द व जैन**) धर्माचे अनुयायी बनले ' असें शास्त्रीबुवा आपल्या पुस्तकाच्या पान १२५ वर लिहितात. याहिपुढें जाऊन ते पान १२९ वर म्हणतात कीं 'निवृत्तमांस लोकांनीं क्षात्रवृत्तीचा अंगिकार करून राज्य चालविल्याचें उदाहरण फक्त चित्पावन ब्राम्हणांचे अपवाद म्हणूज सांगतां येईल. पण या अपवादामुळे नियमाचीच सिध्दी होते.' याहि विधानांत 'अयं विशेष:' याचीच फिरून दुर्गंधी येत आहे. चित्पावन ब्राम्हणांनीं राज्य चालविल्याचा इतिहास सांगतांना त्यांचें राज्य कां गेलें याचीं कारणें दिलीं असती तर इतिहास वाचकांवर महदुपकार झाले असते! निदान चित्पावनांच्या राज्यनष्टतेच्या मुळाशीं निवृत्तमांसवृत्ती नव्हती, अशी जरी कबुली दिली असती तरी अहिंसावाद्यांना हायसें वाटलें असतें.

रा. दिवेकरांच्या या चित्पावनी ब्राम्हणांच्या राज्याची हाडे खिळखिळे करणारा अहमदशहा अबदाली याची व या चित्पावन ब्राम्हण

राजांची गांठ राज्याकारभाराच्या सुरवातीनंतर सुमारें ५० वर्षांनीं पडली. राज्य चालविण्यांत चित्पावन हे अपवाद अगर राज्यरक्षणांत ते अपवाद आहेत, याचा शोध इतिहासज्ञान्यांनीं जरूर लावावा. इ. स. पूर्वी ७००।८०० वर्षें ते इ. सनानंतर ७००।८०० वर्षें या कालांत तर निवृत्त- मांस लोकांनींच हिंदुस्थानचा राज्यकारभार हांकिला. त्या कालांत क्षात्रवृत्तीचा अंगिकार करून राज्य चालविणारे कांहीं ब्राम्हण आहेत; परंतु ते चित्पावन होते अगर कसें तें रा. दिवेकरांनीं पहावें ! विजयनगरच्या राज्याला तर हिंदूसाम्राज्य व ब्राम्हण आशिर्वादित साम्राज्यच म्हटलें जाते. फारकाय शिवछत्रपतीच्या गादीवरील रामदास काढून घेतला तर तेथेंहि शिल्लक शून्यच !! असें दिवेकरांदि ब्राम्हण का म्हणणार नाहींत? बौध्द व जैनधर्माच्या उत्कर्षामुळें ब्राम्हण व इतर वर्ण यांच्यांत अडीचहजार वर्षांपूर्वी रा. दिवेकरांनीं केलेली ही फारकत अद्याप प्रगतीच्याच मार्गावर आहे असें दिसते. हिंदुस्थानांत अपवाद म्हणून ज्या चित्पावन पेशव्यांचा साभिनिवेश उल्लेख रा. दिवेकरांनीं केलेला आहे त्या चित्पावनशाही (मराठेशाही) राज्यांत या फारकतीचा हेवादेवा तर मांडला नसेल ना अशी शंका येते. या अपवाद पेशव्यांनांही ही फारकत नष्ट करून हिंदूनां संसृष्ट करितां आले नाहीं. निवृत्तमांस लोकांनीं किती राज्यें व तीं कोठकोठें स्थापिली व कितीकाळ राज्य हांकलें याच्या इतिहासाचें रा. दिवेकरांनीं आतां तरी जरूर अध्ययन करावें. बौध्द व जैनधर्म हे सार्वधर्म व राजधर्म पदावर असलेल्या शेंकडों वर्षांच्या काळांत प्राय: अखिल हिंदुस्थाननें मांसाहारत्यागाचें व्रत अखंड चालविलें होतें व त्याच कालास इतिहासज्ञ हिंदुस्थानचा ' सुवर्णयुग ' असें सादर संबोधितात. या खऱ्या इतिहासाचें ज्ञान ब्रह्मश्री दिवेकरांना असते तर एकमेव म्हणून पेशव्यांनाच शेलापागोटे बांधण्याचा हास्यास्पद प्रकार ते करिते ना ?

मांसाहारनिवृत्ति व अहिंसा तत्वाचा सततोपदेश, यामुळें हिंदुसमाज स्त्रैण, सामर्थ्यहीन बनला, " जगत् दुःखं " म्हणजें जग

दुःखमय आहे; तें क्षणिक आहे, संसार असार व मिथ्या आहे असा वहुजनसमाजाचा ग्रह ज्या तत्वज्ञानाच्या शिकवणीमुळें झाला आहे तें **तत्वज्ञान हें अपकर्षाचें प्रमुख कारण होय.''** (पहा पान ७१) श्री. दिवेकरशास्त्र्यांच्या पुस्तकांतील आणखी एक दोन उतारे देऊन अहिंसा तत्वोपदेशामुळें व 'जगत् दुःखं' या शिकवणीमुळें हिंदुसमाजावर अर्थातच हिंदुस्थानावर कोणते घोर व दूरपरिणामीं परिणाम घडल्याचा आक्षेप घेतला जातो हे दाखवून देत आहो. हेतू हा की हे आक्षेप अयथार्थ असून गाढवावरून पडून गांवावर रुसण्याच्या अगर वडाची साल पिंपळाला लावण्याच्या हास्यास्पद प्रकारापैकीच विक्षिप्तपणाचे नमुनेदार प्रकार आहेत. श्री. दिवेकरशास्त्री आपल्या पुस्तकाच्या १२ व्या-अखेरच्याच्या-प्रकरणांत पान १८२ वर **बौद्ध संस्कृतीचे अनिष्ट परिणाम** देतांना लिहितात कीः-बौद्ध संस्कृतीने आर्यसंस्कृतीचा पूर्ण पाडाव करून विजय मिळविला; व इस्लामच्या उग्र, क्रूर व रानदांडग्या अनुयायांना येथें राज्य स्थापण्याची पूर्वतयारी करून दिली. आमचें असें स्पष्ट मत आहे की, बौद्ध संस्कृति जर येथें बद्धमूल झाली नसती तर, इस्लामला पहिल्या दोन स्वाऱ्यानंतर थपडा खाऊन पुनश्च इकडे न येण्याचाच निश्चय करावा लागला असता ?' तरी हिंदुस्थानचें नशीब शिकंदर म्हणून दिवेकरांना इस्लामला पहिल्या दोन स्वाऱ्यात थपडा द्यावयास मिळाल्या!! अहिंसा धर्मांचा कैफ पुरा असता इस्लामला थपडा मिळाव्यात व ती निशा उतरल्यावर इस्लामनें उलट थपडा द्याव्यात, हा कार्यकारण भाव तर मोठा विलक्षण दिसतो. अहिंसा धर्मांच्या उत्कर्षकाळात क्रूर, दांगड्या व रानटी इस्लामांना दोनदां थपडा मारण्यास हिंदुस्थान समर्थ कसा झाला ? व त्या धर्माच्या अपकर्षकाळांत इस्लामच्या थपडा का खाव्या लागाव्या ? यातील श्रेयाचा भाग अहिंसा-धर्माकडे व नामुष्कीचा भाग वैदिक धर्माकडे दिल्यास रा. दिवेकरांना व त्यांच्यासारख्या इतरांना चालणार नाहीं काय ?

जैन व बौद्धधर्मावर घेतल्या जाणाऱ्या आक्षेपांपैकीं कांहीं आक्षेप आम्ही श्री. दिवेकरशास्त्र्यांच्या शब्दांतच शक्यतोंवर दिले आहेत. आणखी एक उतारा देणे जरूर वाटल्यानें तो याखालीं दिला आहे. 'अहिंसा, संन्यास, जगन्मिथ्यात्व, समष्टिधर्माचा अभाव यामुळें हिंदुसमाजांत जातिविषयक उच्चनीच कल्पना, शिवाशिव, विटाळचांडाळ खाऊन बाटतो, पिऊन बाटतो अशाप्रकारचा धर्म अतिशयच बोकाळला होता. यासर्व धर्म-कल्पना मुसलमानांना पोषक झाल्या व त्या हिंदूंना शोषक झाल्या ! परकीयांना त्या साधक झाल्या आणि हिंदूंना बाधक झाल्या ! इतकेंच नव्हे तर मारकहि झाल्या ' (पहा पान १७२) श्री. दिवेकरशास्त्र्यांनीं आपल्या पुस्तकाचें सिंहावलोकन पृष्ट १८४ वर केलें आहे परंतु विस्तारभयास्तव तें देण्याचें आम्ही टाळिलें आहे. जिज्ञासू वाचकांनीं तें सिंहावलोकन जरूर डोळ्यांखालून एकवार तरी घालवे. सारांश एवढाच की **या नव्या संस्कृतींनीं आर्यसंस्कृतीचा घात केला. या नव्या तत्वोपदेशामुळें हिंदुस्थानचें स्वातंत्र्य नष्ट झालें.**

वैय्यर्थ्य दाखविण्याचे मार्ग

वर दिलेल्या आक्षेपांचें वैय्यर्थ्य दाखविण्याचा आमचा उद्देश आहे. अहिन्सा तत्वामुळें झालेली हानी ही जैनधर्मातील अहिन्सेला उद्देशून लिहिली आहे असें समजून हा आमचा प्रयत्न आहे. हें वैयर्थ्य दाखविण्यासाठीं आम्ही दुहेरी मार्गांचें अवलंबन केलें आहे. जैनधर्मीय अहिन्सेचा खरा अर्थ समजून सांगणें हा पहिला मार्ग असून जैनवीरांचें चरित्र देणें हा दुसरा. अहिंसातत्वाचें संपूर्ण पालन करूनहि अहिंसावादी जैन वीरपुरुष झाले, जैनस्त्रिया वीरमाता व वीरपत्नी पदाला प्राप्त झाल्या. अहिंसावादी जैनांनीं नेटका संसार केला व शेवटीं संसारावर व वैभवशाली राज्यावरहि पाणी सोडून मोक्षलक्ष्मी प्राप्त करून घेतली. अनेक जैनराजे होऊन गेले. त्यांच्या पदरीं जैनधर्मीय सेनापती होते. त्यांनीं लढाया मारिल्या. फारकाय जे त्या मुसलमानांना

विरोध करण्यासाठीं स्थापन झालेल्या विजयनगरराज्याची मुहूर्तमेढ रोवणारा राजा चौथा बल्लाळ व त्याचे या कार्यांतील अनेक मदतनीस जैनधर्मीयच होते, हें दाखवून दिल्यास अहिंसा तत्वाविरुद्ध घेतलेल्या आक्षेपांचें आपोआपच निरसन होईल असा आम्हांस भरंवसा वाटत आहे.

हा अल्पसा प्रयत्न करण्यांत आणखीहि एक हेतू आहे व हाच हेतू प्रामुख्यानें दृष्टीसमोर ठेवण्यांत आला आहे. खऱ्या इतिहासज्ञानाच्या अभावी जैनसमाजहि आपल्या पराक्रमी, वीर व विजयी वाडवडिलांबद्दल अंधेरांत चांचपटत आहे ; तशांत मॅक्समूलरादि विद्वानांनीं प्रतिपादिलेल्या एकतर्फी प्रभावी मतांचा परिणाम जैनधर्मीयांच्या मनावर सतत होत गेल्यानें जैनधर्मीय राहिल्यानें शौर्यवीरादि कृत्यास मुकावेंच लागणार आहे, असाहि समज जैनधर्मीयांमध्यें होणें साहजिकच आहे. हा समज दूर व्हावा असाहि हेतू या लिखाणांत आहे.

अहिंसा धर्माचें सत्यस्वरूप व जैनवीरांची त्रोटक चरित्रें दिल्यानंतर हिंदुस्थानच्या अपकर्षाच्या-गुलामगिरीच्या-कारणांचा विचार केला आहे व तसें करितांना रा. दिवेकर व तत्पक्षीय यांची विचारसरणी कशी भ्रामक आहे हेहि दाखविलें आहे.

प्रकरण २ रें.

अहिंसा धर्मतत्वाला सर्व धर्मांनीं श्रेष्ठ धर्म मानिले आहे. एखाद्या प्राण्याचा वध करणें, घात करणें, त्याचा जीव घेणें यालाच जैनधर्मांत हिंसा असें मानिले नाहीं तर कोणत्याही प्राण्याचें मन दुखविणें व त्याला त्रास होईल असें कृत्य करणें यांनाही हिंसा या सदरांत गोंवण्यांत आलें आहे. जैनाचार्यांनीं हिंसा या शब्दाच्या केलेल्या व्याख्या पुढीलप्रमाणें आहेत.

प्रमत्तयोगात् प्राणव्यपरणम् हिंसा। (उमास्वामी-तत्वार्थसूत्र) अर्थ:- काम, क्रोध, मोह, मद व मत्सरादि कषायांनीं प्रेरित होऊन प्राण घेणें अगर मन दुखविणें ही हिंसा होय. या सूत्राचा अधिक खुलासा दुसऱ्या आचार्यांनीं खालील शब्दांत केला आहे.

(टीप:- प्राण दोन प्रकारचे आहेत. १ भावप्राण व २ द्रव्यप्राण. आत्म्याच्या ज्ञानदर्शनाला भावप्राण म्हणतात. शरिराला द्रव्यप्राण म्हणतात.)

यत्खलु कषाययोगात् प्राणानां द्रव्यभाव रूपाणाम् ।
व्यपरोपणस्य करणं सुनिश्चिता भवति सा हिंसा ॥

सार्थ खुलासा:- कामक्रोधादि कषायानें युक्त व मनानें, वचनानें अगर शरिरानें आपला अगर दुसऱ्याचा भावप्राण अगर द्रव्यप्राण याचा घात करणें याचें नांव हिंसा. या व्याख्येकडे अधिक सूक्ष्म दृष्टीनें पाहिल्यास कळून येईल कीं, एखाद्या प्राण्याचा जीवघात करणें अगर त्याच्या एखाद्या अवयवाचा च्छेद करणें यांतच हिन्सा आहे असें नाहीं परंतु भावहिन्सापूर्वक केलेली द्रव्यहिन्साहि हिंसा या सदराखालीं येते. कषायाचा अभाव असता व मनाची सत्प्रवृत्ति असतां एखाद्या

प्राण्याचा जीवघात झाला अगर शरीराच्या एका अगर अनेक अवयवांचा च्छेद झाला अगर एखाद्याचें मन दुखविलें गेलें अगर एखाद्याला पीडा झाली तर ह्या एक अगर अनेक कृत्यांपैकीं कोणतेंहि कृत्य हिंसा या सदराखालीं येणार नाहीं. परिणाम एकच परंतु तो घडत असतां अगर घडवून आणित असतां जी भावना असते, जो हेतू असतो त्या भावनेवरून व हेतुनुरूप त्या परिणामाकडे व फलाकडे पहावें व मगच सदरचें कृत्य हिंसा या सदराखालीं येईल अगर कसें हे ठरवावें. ही कसोटी शास्त्र-संमत आहे; उदा. आपल्याकडे आलेल्या रोग्याचें दुःखनिवारण करण्याच्या हेतूनें डॉक्टरनीं शस्त्रक्रिया केली व त्यामुळें रोगी मरण पावला तर हिंसा केली असें म्हणतां येंत नाहीं. रोग्याला मारण्याचा डॉक्टरचा हेतू नव्हता. त्यास रोगमुक्त करावें हा हेतू होता; रोग्याबद्दल डॉक्टरची दृष्टि कषाययुक्त नव्हती. व यामुळें त्याचें कृत्य हिंसा या सदराखालीं येत नाहीं. मुलाच्या कल्याणाकरितां मातापितरांनीं त्यास माराहाण करून शाळेंत धाडिलें व विद्यार्थ्यांच्या कल्याणाकरितां शिक्षकानें त्यास चार छड्या मारिल्या तर या अशा कृत्यामुळें आईबाप अगर गुरु यांचे कृत्य हिंसा या सदराखालीं येणार नाहीं. मुलानें सुशिक्षित व्हावें हा सद्हेतु या कृत्याच्या मुळाशीं असतो; कषायाचा पूर्ण अभाव असतो. व्यवहार व चालू कायदा यांतहि भावनेकडे व हेतूकडे लक्ष देऊन कोण-त्याहि कृत्याचा विचार होऊन तें कृत्य व्यवहारास सुटून व कायद्याच्या कक्षेखालीं येणारे असें झालें अगर कसें हें ठरविलें जाते. एखाद्यास काठीनें, हत्यारानें अगर विषप्रयोग करून मारण्याचा उद्देश आहे, परंतु त्या उद्देशास मूर्त व इच्छित स्वरूप जरी आले नाहीं, तरी अशा या कृत्याबद्दल प्रचलित कायदा त्यास दोषी ठरवितो, तद्वतच जैनधर्महि अशा इसमास दोषी ठरवितो.

याबद्दलचा अधीक स्पष्ट खुलासा जैनशास्त्रांतील खालील कथे-वरुन होणार आहे. ती कथा अशीः– एक जैनमुनी अरण्यांत तपश्चर्या करीत होते. त्यांना खाऊन आपली भूक भागवावी म्हणून एका वाघानें

प्रतिकार करणें हे पाप आहे काय ?

अहिंसा धर्म हा सर्वश्रेष्ठ धर्म आहे हे खरें परंतु या सर्वश्रेष्ठ धर्माच्या पालनांत अनेकवेळां असे प्रसंग उद्भवतात कीं त्यावेळीं कोणते धोरण अंगिकारावें व आचरण स्वीकारावें याबद्दल मन साशंक राहते. उदाहरणार्थ आपली स्त्री अगर मुलगी यावर कोणी हात टाकूं पाहत आहे, आपल्या घरास आग लावण्यासाठीं हातांत जळता कांकडा घेऊन आपला वैरी उभा आहे, अगर आपला शिरच्छेद करण्यासाठीं हातांत तरवार घेऊन मारेकरी उभा आहे अशावेळीं आपल्या स्त्रीची, अगर मुलीची अब्रू राखण्याकरितां, आगीपासून घराचा बचाव करण्याकरितां व मारेकऱ्यांच्या तलवारीस आपण बळी पडूं नये म्हणून प्रतिकार करणें हें धर्मविहित होईल अगर तो प्रतिकार पापमय होईल याचा विचार धर्मशास्त्राच्या दृष्टीनें करणें जरूर आहे. पंचाध्यायींतील खालील दोन श्लोकावरून या वरील शंकेचे समाधान होणार आहे.

अर्थादन्यतमस्योश्चैरुद्दिष्टेंषु स दृष्टीमान् ।
सत्सु घोरोपसर्गेषु तत्परः स्यात्तदत्यये ॥ ८०८ ॥

यद्वा न ह्यात्मसामर्थ्य यावन्मंत्रासि कोशकम् ।
तावत् द्रष्टुं च श्रोतुं च तद्बाधां सहते न सा ॥ ८०९ ॥

अर्थः-- सिद्ध परमेष्ठी, अर्हत्-बिंब, जिनमंदिर, चतुर्विधसंघ-मुनी अर्जिका, श्रावक व श्राविका यापैकी कोणा एकावर अगर अनेकावर संकट आल्यास सम्यग्दृष्टी जैनानें त्या संकटाच्या निराकरणार्थ सदैव दक्ष राहिले पाहिजे. आपल्या शरीरसामर्थ्याचा, बुद्धीचा, संपत्तीचा व हत्याराचा उपयोग करावा असा भावार्थ आहे. असें संकट डोळ्यांनी पाहवणार नाहीं व कानानें ऐकवणार नाहीं. यावरून देव, धर्म, धर्मबांधव यावर आलेल्या संकटाच्या निवारणार्थ आपलें चित्त, जीवित व वित्त वेंचून प्रतिकार करावा अशी धर्माज्ञा आहे हें उघड होईल. चढाई करून येणाऱ्या शत्रूचें पारिपत्य करण्याचा उपदेश आचार्यांनीं स्पष्ट व असंदिग्ध शद्बांत केला आहे.

प्रयत्न केला. मुनींचें प्राण वांचवावेत म्हणून एका रानडुकरानें वाघावर उडी घातली. या झटापटींत दोन्हीहि प्राणी प्राणास मुकले, परंतु आपल्या शुभ परिणामानें रानडूकर स्वर्गास गेला व वाघ नरकास गेला. या कथेंतील सार स्पष्ट आहे. वाघाचा हेतू निराळा व वाघावर चाल करून जाणाऱ्या रानडूकराचा हेतू निराळा होता ; व त्या हेतूप्रमाणें त्यांनां फळ मिळालें.

आत्मानुशासन या ग्रंथांत ग्रंथकारांनीं हेंच तत्व अधिक सुबोध रीतीनें प्रतिपादिलें आहे. त्यांत म्हटलें आहे कीं

परिणामेव कारणमाहुः खलु पुण्यपापयोः प्राज्ञाः ।
तस्मात्पापाचयः पुण्योपचयश्च विधेयः ॥

सारांशः-- पाप व पुण्य या दोहोंच्याहि उदयाच्या मुळांशीं आत्म-परिणाम-भावनाच कारणीभूत आहेत.

एकस्य सैव तीव्रम् दिशति फलं सैव मंदमन्यस्य ।
व्रजति सहकारणोरपिहिंसा वैचित्र्यमत्र फलाकालें ॥ ५३ ॥

अर्थः- एकापेक्षा अधिक इसमांनीं मिळून एखाद्याचा खून केला तरी जैनधर्मशास्त्राच्या दृष्टीनें ते सर्वच इसम सारखेच दोषी व पापी ठरत नाहींत. मारेकऱ्यांचें कषाय ज्या मानानें कमीअधीक प्रमाणांत तीव्र असतील त्या मानानें त्यांचें कृत्य कमीअधिक प्रमाणांत अशुभ कर्मबंधाला कारणीभूत होईल.

येथवर जैनधर्मांतील अहिंसा शब्दाची व्याख्या व व्याप्ती अत्यंत त्रोटक स्वरूपांत दिली मुनीजनांचा धर्म गृहस्थी लोकांपेक्षां कष्टतर व निराळा आहे. श्रावकांना संसारांत अनेक तऱ्हेच्या अडचणी येतात व निरनिराळे प्रसंग उद्भवतात. अशा वेळीं कोणाचें मनहि न दुखविणें कसें शक्य आहे, तसें करणें व्यवहार्य तरी होईल काय ? याचा विचार करणें क्रमप्राप्त आहे म्हणून त्या दृष्टीनें यापुढें अधिक खुलाशानें विचार-कर्तव्य आहे.

य: शस्त्रवृत्तिः समरे रिपुः स्यात् । यः कंटको वा निजमंडलस्य ॥
अस्त्राणि तत्रैव नृपाः क्षिपन्ति न दीन-कानीन शुभाशयेषु ॥

श्री सोमदेवाचार्य.

राजे, क्षत्रिय, वीर व योद्धे समरांगणांत आपल्या शत्रूशीं लढतांना आपल्या तरवारीचा उपयोग करितात; ते शत्रूंवर तरवारीचा वार करितात आणि आपल्या देशाच्या उन्नतीच्या मार्गांत येणारें संकट दूर करून उन्नतीचा मार्ग निष्कंटक व साफसूफ करण्यांत ते आपली तरवार परा-जतात. हीन, दीन, दुर्बल व साधु लोकांवर ते आपले हत्यार चालवीत नाहीत. सारांश हा कीं, शत्रूंशी लढतांना अगर देशावरील संकट टाळतांना जे आपले हत्यार चालवितात ते वीर होत. दीनदुबळ्यावर व सत्पुरुषावर हत्यार उपसतात ते वीर नव्हेत, ते राजे नव्हेत अगर ते वीरात्मे नव्हेत. कोणत्या प्रसंगी व कोणावर तरवारीचा उपयोग करावा व कोणावर त्यांचा उपयोग करू नये याचें यापेक्षां सुन्दर व स्पष्ट विवरण अन्यत्र क्वचितच मिळेल. क्षत्रचुडामणी काव्याचे कर्ते श्री वादीभसिंह हे आपल्या काव्यांत प्रतिपादन करितात कीं:-

जीवितात्तु पराधीनाज्जीवानां मरणं वरम् (४०)

श्री वादीभसिंहाचार्य जैन होते. जैनधर्मीय त्यांना आचार्य असें मानितात. ते म्हणतात कीं, जिवंत राहून दुसऱ्याच्या आधीन राहणें -स्वातंत्र्य गमविणें- यापेक्षां मरण आलेलें बरे. जगावयाचे असल्यास स्वातंत्र्य असावें. गुलामगिरी अगर दास्यत्व पत्करण्यापेक्षां मेलेले बरें. दास्यांत अगर गुलामगिरींत राहून जगण्यांत अर्थ कोणता ? व त्यांत पुरुषार्थ तो काय ?

' नीतिवाक्यामृता ' तील ' युद्धसमुद्देश ' प्रकरणांतील खालील श्लोकहि असाच मननीय आहे. हा ग्रंथ एका जैन राजाच्या दरबारच्या आश्रित जैन पंडितानेंच लिहिला आहे, हें लक्षांत ठेवणें जरूर आहे. चाणक्याच्या अर्थशास्त्राच्या तोडीचा हा जैनग्रंथ आहे . असें विद्वानांचें मत आहे. ते पंडित लिहितात कीं,:-

दंडसाध्ये रिपावुपायानंतरमग्नावाहुतिप्रदानमिव ।
यंत्रशास्त्रक्षारप्रतीकारे व्याधौ किं सामान्यदोषधं कुर्यात ॥

अर्थः-- युद्धाविना जों शत्रू आपल्या ताब्यांत- कह्यांत येत नाहीं अगर वश होत नाहीं त्यास ताब्यात आणण्यासाठीं सामादि इतर उपायांचें अवलंबन करणें म्हणजे अग्नि शांत करण्यासाठीं अग्निमध्यें आहुती देण्या-सारखेच होईल. सारांश अग्नि शमविण्याचा आहुति देणें हा मार्ग नव्हे. आहुति दिल्यानें अग्नि उलट अधिकच प्रज्वलित होतो, तद्वतच युद्ध केल्याशिवाय शत्रू दबत नसेल तर युद्ध करूनच त्यास ताबेदार होण्यास भाग पाडावे. युद्धाखेरीज इतर उपायांचें अवलंबन केल्यास तो अधिकच शेफारून जाईल. वर जे आधार दिले आहेत त्यावरून उजव्या थोबाडांत मारल्यास डावे थोबाडहि आनंदानें पुढें करावें अशी शिकवण अहिंसा च्या नांवाखालीं जैनधर्म देत नाही हें उघड सांगण्याचें कारणहि रहात नाहीं.

आपल्या शरिरास अगर आपल्या बायकापोरांस कोणीही कितीहि त्रास दिला तरी शांत चित्तानें तो सहन करणें; आपल्या संपत्तीचा अन्या-यानें कोणी अपहार केला तरी लक्ष्मी चंचल आहे असें समजून, मनाचें समाधान करून घेणें, आपले अकल्याण चिंतणाऱ्यांचेहि 'जयत् दुख' म्हणून आपण कल्याण चिंतणें, आपल्याशीं कृतघ्न होणाऱ्याशीं आपण कृतज्ञता दाखविणें अगर उपकार करणें, मनगटांत जोर असतांहि आपल्यावर होत असलेल्या अन्यायाचा प्रतिकार न करितां हंसत मुखानें त्याचें स्वागत करणें हें सामान्य लोकांना शक्य नाहीं ; तें अत्यंत उच्च कोटींतील लोकांचे विहित आचरण होईल. असें आचरण करणें हें जैनधर्माचें ध्येय आहे. तें साध्य करून घेण्याची आज्ञा जैनधर्मांत आहे. परंतु हें साध्य सर्वांनाच सहजसाध्य नाहीं अगर ते साध्य गांठता आलें नाहीं म्हणून तो जैन नव्हे अगर अहिंसा तत्वापासून तो च्युत झाला असेंहि मानण्यास जैनधर्म तयार नाहीं. गृहस्थी-श्रावक, व संन्यासी-मुनी-यांचे धर्म, यांची कर्तव्यकर्मं व आचार यासाठींच जैनाचार्यांनीं अगदीं अलग व निरनि-राळीं केली आहेत व श्रावकाचार व यत्याचार (आचारांग) असें

ग्रंथहि लिहिले आहेत. संसारत्याग करून मुनिदीक्षा ज्यांनीं घेतली आहे त्यांना शत्रुमित्र, स्तुतिनिंदा, राजवाडा व स्मशान सारखेच आहेत. आपल्या भक्ताबद्दल आदर व निंदकाबद्दल रोष त्यांच्या ठायीं नसावा व नसतो ; परंतु संसारी लोकांना नित्य व्यवहारांत अनेक परिस्थितीशीं टक्कर द्यावयाची असते व त्यामुळें मुनीजनांप्रमाणें त्यांस पूर्ण चारित्र्य पालन करणें शक्य नाहीं, हें जाणूनच श्रावकलोकांना एक देशचारित्र्य पालन करण्याची आज्ञा जैन शास्त्रकारांनीं घातली आहे. श्री स्वामी समंतभद्राचार्य आपल्या रत्नकरंडक श्रावकाचारांत म्हणतात कीं:-

सकलं विकलं चरणं तत्सकलं सर्वसंगविरतानाम् ।
अनगाराणां विकलं सागराणां ससंगानाम् ॥५

अर्थः– चारित्र्याचें प्रकार दोन-सकल आणि विकल. सर्वसंगपरित्याग केलेल्या मुनीसाठीं सकलचारित्र्य व परिग्रहधारी श्रावका साठीं विकल–एकदेश–चारित्र्य सांगितलें आहे. वरील विवेचनावरून अन्यायाचा प्रतिकार करणें हे पापमूलक नसून तै पुण्यदायक आहे असें दिसून येईल ; म्हणूनच आचार्य म्हणतात कीं 'वधे प्रत्युतधर्मः स्याष्टद्टस्याहः कुतो भवेत्.'

हिंसेचे चार भेद

[श्रीमदमृतचंद्राचार्यकृत पुरुषार्थसिद्धि ग्रंथाच्या आधारें]

जैनाचार्यांनीं (१) संकल्पिनी (२) औद्योगिक (३) आरंभणी व (४) विरोधनी असे हिंसेचे चार भेद केले आहेत.

(१) संकल्पिनीः–मनाचा संकल्प, बेत करून कोणत्याहि प्राण्याच्या प्राणाची हिंसा करणें, त्याचा वध करणें अथवा त्यास त्रास, वेदना होईल असें कोणतेहि कृत्य करणें ही संकल्पिनी हिंसा होय. अशा कृत्यांत मारण्याची बुध्दी, हिंसा करण्याचा संकल्प असतो. ही बुद्धी व हा संकल्प कषायानें प्रेरित असल्यानें पापमूलक आहे. विचारांत आलेल्या कृत्यास आचारामुळें मूर्त स्वरूप आल्यास हिंसा घडते ; व हिंसेमुळें उत्पन्न होणाऱ्या पापबंधाचा तो धनी होतो.

(२) औद्योगिक हिंसा:–शेती, व्यापार करण्यांत, कारखाने सुरूं करण्यांत व ते चालविण्यांत जो हिंसा होते त्या हिंसेस औद्योगिक हिंसा असे संबोधिले जाते. हिंसेतील पहिला भेद गृहस्थी लोकांना वर्ज्य आहे ; तसा हा दुसरा भेद त्यांना वर्ज्य मानिलेला नाहीं. शेती व्यापारादि उदरनिर्वाहाचें धंदे करीत असतानां हिंसा ही घडणारच आहे परंतु गृहस्थधर्मीयांनीं अशी हिंसा होऊंच देऊं नये असें धर्मशास्त्र सांगत नाहीं. अशा कार्यांत झालेली हिंसा पापबंधकारक नाहीं. यांत शेती अगर व्यापार करण्याची भावना असते ; त्यांत हिंसा करण्याचा उद्देश नसतो, म्हणून अशा कार्यांत झालेली हिंसा धर्मशास्त्र मानीत नाहीं.

(३) आरंभी हिंसा:–स्वयंपाक वगैरे करतांना होणारी हिंसा ही आरंभी हिंसा होय. व्यापार करितांना, शेती कमवितांना, स्वयंपाक करितांना व राज्यकारभार हाकतांना कितीहि प्रयत्न केले तरी अनेक लहानसान जीवांची हिंसा ही होणारच, म्हणूनच गृहस्थी लोकांना या हिंसेचा त्याग करण्याची आज्ञा धर्मशास्त्रकारांनीं केलेली नाहीं.

(४) विरोधिनी हिंसा:–या भेदांत दुसऱ्याचा घात वगैरे करण्याची इच्छा, अगर भावना नसते परंतु आपल्या स्वतःच्या अगर इतरांच्या बचावाकरितां अगर दुसऱ्यास हिंसावृत्तिपासून परावृत्त करण्याकरितां केलेल्या कृत्यांत जी हिंसा घडते त्यास विरोधिनी हिंसा असें ह्मणतात. यावरून हिंसेच्या या चार भेदांपैकीं पहिल्याखेरीज इतर तीन प्रकारच्या हिंसेचा त्याग करण्याची अनज्ञा धर्मज्ञांनीं गृहस्थधर्मीयांना दिलेली नाहीं. या भेदांपैकीं पहिल्या भेदांत संकल्प असल्यानें कषायाचें अस्तित्व असणें अपरिहार्य आहे व बाकीच्या तीन भेदांतील हिंसा गृहस्थीलोकांना अनिवार्य असल्यानें व त्यांत कषायांचा अभाव असल्यानें त्यांचा त्याग सांगितलेला नाहीं; मात्र यावरून असें मात्र कोणी समजूं नये कीं अखेरच्या तीन भेदांतील घडणाऱ्या हिंसेकड दुर्लक्ष्य करावें. सारांश एवढाच कीं स्वार्थहेतुनें व कषायानें प्रेरित होऊन कोणत्याही प्राण्याचा घात करूं नये, प्राणीमात्रावर सदैव दया

करावी, पशुपक्ष्यादि प्राण्यांना बरेंवाईट कळण्याचें सामर्थ्य नाहीं म्हणून त्यांचा वध करूं नये. अज्ञानामुळें अगर निर्बलतेमुळें जाणून बुजन अगर मस्तपणानें अपराध झाल्यास त्याची त्यास क्षमा न करितां त्याचा प्रतिकार करावा व त्याचें पारिपत्य करावें.

अहिंसा धर्माचें सत्यस्वरूप व अहिंसा तत्त्वावरील आक्षेप

अहिंसा तत्त्वाविरुद्ध व त्यांतूनही **जैनधर्मीय अहिंसा** तत्त्वाविरुद्ध अनेकांनीं अनेक आक्षेप घेतले आहेत. अहिंसा तत्वामुळें मनुष्यमात्र भित्रा, पापभीरू बनतो, आपल्या **स्वतःचें**, आपल्या देशाचें व धर्माचें संरक्षण करण्यास असमर्थ होतो व तो नामर्द बनतो, अहिंसातत्वाच्या आचरणामुळें हिन्दुस्थानास स्वातंत्र्यास मुकून, पारतंत्र्यांत पडावें लागले, अशा आक्षेपकांचे कांहीं उतारे या पुस्तकाच्या पहिल्या भागांत शक्य तितक्या विस्तारानें उद्धृत केले आहेत. **गृहस्थी अहिंसा धर्माचें** स्वरूप सांगितल्यानन्तर हे आक्षप सार्थ आहेत अगर कसे हें पाहणें सयुक्तिक होईल म्हणून गृहस्थी अहिंसाधर्माचें त्रोटक स्वरूपही या भागांत यापूर्वीं दिलें आहे. अहिंसातत्वावर घेतलेले आक्षेप सार्थ नाहींत. ते भ्रामक आहेत. अहिंसा तत्त्वाच्या खऱ्या ज्ञानाच्या अभावामळें व आक्षेपकांच्या पूर्वजांनीं जैनधर्मावर केलेल्या हल्ल्याची परंपरा ठेवण्यासाठीं असे आक्षप घेतले जातात, हें यापुढें यथामति दाखविण्याचा प्रयत्न करणार आहों व तसें करितांना कोणा व्यक्तीबद्दल अगर धर्माबद्दल कडक टीका झालेली दिसून आल्यास, ती प्रस्तुत प्रसंगाला उचित व अनिवार्यच आहे असें समजून त्यांतील ग्राह्यांश तेवढाच विचारांत घेतला जाईल अशी आशा आहे.

अनेक वेळां सद्गुणांच्या ठिकाणीं दुर्गुणांचा आरोप नित्य व्यवहारांत केलेला दिसून येतो व खऱ्याखऱ्या दुर्गुणाला सद्गुणाचे जागीं बसविण्यांत येतें. क्षमाशील मनुष्याला भित्रा अगर दुर्बल असें कोणी कोणी संबोधितात; मितव्ययी इसमास कंजुष अशी पदवी मिळते; विनयी व स्पष्टवक्त्यांचीहि अशीच संभावना होते. उलट उद्धट मनुष्याची शूरांत,

बेफाम बोलणाऱ्याची निस्पृहांत व उमदेपणांत, उधळ्याची दानशूरांत गणना केली जाते. सारांश हा कीं अनेक वेळां गणाच्या ठिकाणीं दुर्गुणाचा, व दुर्गुणाच्या ठिकाणीं गुणाचा आरोप अविचारानें केला जातो. जैनधर्मीय अहिंसा तत्वाबद्दलहि हुबेहुब असाच प्रकार घडत आहे. अहिंसा तत्वाची सात्विक चर्चा करून, अहिंसाधर्म वीरोचित व वीरांचा धर्म आहे हें वाचकांच्या गळीं उतरविण्याचा व हिंदुस्थानच्या पारतंत्र्याच्या कारणांची मीमांसा करण्यापूर्वी अहिंसातत्ववादी जैनांचे व्यवहारिक आचार कसे होते हें देणें अधिक योग्य होईल असें वाटतें.

जिनशास्त्राची खालीलप्रमाणें आज्ञा आहे:-

स्थूलग्रहणमपलक्षणं । तेन निरपराधसंकल्पपूर्वकमपि हिंसा-
दीनाम् ग्रहणम् । एतेनः-' दंडोहि केवलो लोकमिमाचामुन्च रक्षति ।
राज्ञा शत्रौच पुत्रेच यथादीप समंधृतः " । इति वचनादपराधकादिषु
यथाविध मदंडप्रणतृणमपि चक्रवर्त्यादीनामणुव्रतादि धारणं पुराणादिषुस
बहुशः श्रूयमाणं न विरुध्यते । आत्मीयपदवीशक्त्यनुसारेण तैः
स्थूलहिंसादि विरतेः प्रतिज्ञानात् ।

भावार्थः-

राजेरजवाडे व क्षत्रिय यांना आपल्या लौकिक व्यवहारास मुकावे लागेल असा कोणताहि निर्बंध अहिंसा तत्वाच्या नांवाखालीं जैनधर्मानें त्यांच्यावर घातला नाहीं. प्रजेमधील अन्यायी, अपराधी व दुराचारीं लोकांना शिक्षा न करण्याची व आपल्या राज्यावर चालून आलेल्या परचक्राशीं टक्कर न देण्याची अनुज्ञा धर्मशास्त्रांत नाहीं. जैनकथाग्रंथ, जैनपुराणें, जैनराजे व सेनापती यांच्याकडे स्थूलदृष्टीनें पाहिल्यासहि असें आढळून येईल की परचक्रापासून आपलें संरक्षण करण्याकरितां लढाईशिवाय दुसऱ्या कोणत्याही मार्गाचें त्यांनीं अवलंबन केले नाहीं. गृहस्थधर्मी जैन विरोधी हिंसेचा त्यागी नाहीं. त्यामुळें युद्ध करण्यास त्यास धर्मशास्त्राचीं मुळींच मनाई नाहीं राजेरजवाड्यां-बद्दल तर याबाबतींत विचारच करावयास नको, कारण त्यांना आपल्या

प्रजेंचा संसार सांभाळावयाचा असतो. तो असा:-

> सूक्ष्मा: न प्रतिपीडयन्ते प्राणिन: स्थूलमूर्तय: ।
> ये शक्यास्ते विवर्जंते कार्हिसा संयतात्मन: ॥ १ ॥

अर्थ:-स्थूल आणि सूक्ष्म प्राण्यांना पीडा देण्याचा हेतु असत नाहीं म्हणून जितके शक्य असेल तितक्यारीतीनें हिंसेचा त्याग करावा. संयताना कोठून हिन्सा घडणार !

रविषेणाचार्यांच्या पद्मचरित् ग्रंथांत सैन्याचें जें वर्णन दिले आहे तें वर्णनच आमच्या वरील विधानास खास बळकटी आणणारे आहे. आचार्यांनीं खालीलप्रमाणें सैनिकांचें वर्णन केलें आहे.

> सम्यग्दर्शनसंपन्न: शूर: कश्चिदणुव्रती ।
> पृष्टतो वीक्ष्यते पत्न्या पुरश्चित्रदशकन्यया ॥ ७३-१६८ ॥

अर्थ:-सैनिकांमध्यें कांहीं सम्यद्गर्शसंपन्न व अणुव्रताचे असतां ते लढाईवर जातात. अहिंसा धर्म त्यांना आड आला नाहीं. नाटकांतील लढाई व नाटकी सैनिक असा प्रकार यांत तर नव्हतांना अशी शंका मात्र कोणी काढणार तर नाहींना ? युद्ध व दिग्विजय यांची सुन्दर व विस्तृत वर्णनें जैनपुराणग्रंथांतून दिलेलीं आहेत. परंतु यापैकीं कोणत्याहि पुराणात कोणाही राजाबद्दल, त्यानें मारलेल्या लढाईमुळें व त्याने मिळविलेल्या दिग्विजयामुळे त्याचें जैनत्व नष्ट झालें अगर तो अणुव्रती राहिला नाहीं असें कथन केलेलें नाहीं. जैन लोकांनीं ज्यांना महापुरुष व तीर्थंकर असें मानिलें आहे ते प्राय: सर्वच क्षत्रिय-कुलोत्पन्न होते एवढेंच नव्हे तर त्यापैकीं अनेकांच्या मागें लढायांची परंपरा लागलेली होती असेंहि वर्णन आहे. अहिंसातत्वाचें व जैनधर्माचे पूर्णावतार जें तीर्थंकर त्यांचे चरित्रांनाहि लढायाखेरीज पूर्तता देण्यांत आलेली नाहीं.

हरिवंश पुराणांत बावीसावे तीर्थंकर श्रीनेमिनाथ यानीं भारतीय युद्धांत भाग घेतल्याचा उल्लेख आहे. या युद्धांतील वीरांची जी नामा-वली दिली आहे, त्यांत श्री नमिनाथांच्या नांवाचा खालीलप्रमाणें

प्रामुख्यानें उल्लेख केला आहे.

यदुष्वतिरथां नेमिस्तथैवबलकेशवौ ।
अतिक्रम्य स्थितान् सर्वान् भारते ऽ तिरथांस्तुते ॥ वगैरे वगैरे.

तीर्थंकरांपैकी शांतिनाथ, कुंथनाथ व अरनाथ हे तीर्थंकरपदास प्राप्त होण्यापूर्वी चक्रवर्ती होते व सहा खंड पृथ्वी जिकल्याखेरीज चक्रवर्ती ही पदवी मिळत नसते. तीर्थंकरासारख्या सर्वश्रेष्ठ धर्माधिकाऱ्यांनीं लढाया मारिल्या, जैनाचार्यांनीं त्यांची सुन्दर, विस्तृत व प्रशंसापूर्ण चरित्रें लिहिलीं व त्या ग्रंथांना जैन आजवर मानीत आले; यावरून जैन असला कीं तो लढाईच्या कामाला सर्वस्वी मुकला असें कसें म्हणता येईल? जैनधर्म हा सार्वधर्म झाल्या काळांत अनेक क्षत्रिय राजे या धर्माच्या झेंड्याखालीं शेंकडों वर्षे जमा झाले होते ही एकच गोष्ट क्षत्रियत्व व जैनत्व हीं एका ठिकाणीं नांदतात हे दाखविण्यास पुरेशीं नाहीं असें हट्टानें प्रतिपादन करणाऱ्या आक्षेपकांनाहि म्हणतां यावयाचें नाहीं. याहिउपर आक्षेपक आपल्या विधानांना हट्टानें चिकटून राहतील तर ते यापेक्षां जैनधर्मावर दुसरा अधिक अन्याय कोणता करूं शकतील ?

भगवान् पार्श्वनाथापूर्वीच्या कालांतील तीर्थंकरादि वीरपुरुषांनीं लढाया मारिल्या असें प्रतिपादन करण्यांत फारसें स्वारस्य नाहीं. कारण ज्या स्वरूपाच्या अहिंसातत्वाबद्दल आक्षेप घेतले जातात तें तत्व भगवान पार्श्वनाथांच्या वेळेपासूनच बद्धमूल होऊन राहिले आहे असाहि आक्षेप येण्याचा संभव आहे. भगवान पार्श्वनाथ हे अंतिम तीर्थंकर भगवान वीर वर्धमानापूर्वी सुमारे दोनशे वर्षे (१९८) अगोदर होऊन गेले होते असें आतां सर्वमान्य झाले आहे अर्थातच(२४६०+१९८=२६५८)वर्षांच्या दीर्घ काळांत त्यांतूनहि मुसलमानांच्या हद्दपारानांवरील स्वाऱ्यांपूर्वी क्षात्रवृत्तीचें रक्षण करण्यांत जैनांचे श्रम किती कारणीभूत झाले हे पुढील प्रकरणांत देण्याचें योजिलें आहे. मुसलमानांचे पाय उत्तर हिंदुस्थानांत

धीटपणें रोंविले गेल्यानंतर तसाच प्रकार दक्षिण हिंदुस्थानांत होऊं नये म्हणून ज्या विजयनगरच्या राज्याची प्राणप्रतिष्ठा अगर स्थापना करण्यांत झाली त्या राज्याच्या एका सेनापतीचे गोंवे प्रांतांत मिळालेल्या वीरगला-वरील लेख वाचून एका विद्वान इंग्लिश इतिहाससंशोधकानें सहज स्फूर्तीनें काढलेले उद्गार प्रथम देऊन या वीराचें प्रातःस्मरणीय नांव देणार आहों. An extraordinary reward indeed for a Jain who is said to have sent many of the Kokanigas to destruction, हें जे सहजोद्गार निघाले ते विजयनगर जैन-वीर वैचप्पा यांच्या वीरगलावरील स्तुतिपर लेख वाचूनच होय. या स्तुतिपर मृत्युलेखांत लिहिलें तरी काय आहे याचीही जिज्ञासा वाचकांना होणें साहजिकच आहे. त्या लेखांत लिहिलें आहे कीं , समरभूमीवर वीरोचित मृत्यूचा लाभ झाल्यानें वैचप्पानें स्वर्ग व जिनचरण यांना समीप केलें. लढाया मारणें हे जैनधर्माला असंमत असते तर हा स्तुतिपर लेख कदापि लिहिला गेला नसता.

आचार्यप्रणित धर्मग्रंथांतीलच दाखला हवा असल्यास तोहि खालीं दिला आहे. जयकुमार व अर्ककीर्ति यांच्यामध्यें सुलोचनेसाठीं युद्ध झालें व त्यांत जयकुमार विजयी झाला. आकाशांतून विजयी जयकुमारा-वर पुष्पवृष्टि होऊन त्याचें अभिनंदन देवादिकांनीं केलें.

इति सौलोचने युद्धे समिद्धे शमिता तदा ।
पपात पंचभूतेभ्यो वृष्टिः सुमनसां दिवः ॥

जैनधर्मीयांना युद्ध निषिद्ध असतें तर विजयी वीरांचा देवादि॰कांनीं सन्मान केला असें कदापि वर्णिलें नसतें.

क्षत्रियोचित अहिंसावाद—व्यवहारिक अहिंसावाद

भारतीय कौरवपांडव-युध्दाचा काल कोणताहि असो पण तो काळ भगवान् पार्श्वनाथांच्या कालापूर्वींचा आहे यात शंका नाहीं. विमोहित झालेल्या वीरशाली अर्जुनाला श्रीकृष्णानें गीतोपदेश केला अशी आख्यायिका आहे. त्या गीतेंत अर्जुनाच्या तोंडचे म्हणून खालील

श्लोक देण्यांत येत आहे.

यदि मामप्रतिकारमशस्त्रं शस्त्रपाणयः ।
धार्तराष्ट्रा रणे हन्युस्तन्मेक्षेमतरं भवेत् (अ. १।४६)

सारांशः-मी कौरवांना मारण्यापेक्षां कौरवांकडून मी मारला जाण्यांत अधिक कल्याण आहे. अर्जुनाच्या या भाषणावरून कोणी असा तर्क बांधतील कीं जैनधर्मी अहिंसातत्वाचा अर्जुनाच्या मनावर परिणाम तर झाला नसेल ना ? आपला व आपल्या पत्नीचा नाना प्रकारें छळ करून व कपटद्यूतांत आपणास जिंकून देशोधडीस लावणाऱ्या कौरवाबद्दलचे अर्जुनानें हे उद्‌गार कां काढावेंत ? शत्रुसैन्याला, शत्रूच्या शस्त्रास्त्रांला, शत्रूपक्षांकडील वीरांना पाहून अर्जुन घाबरला-अगर आपल्या सामर्थ्याबद्दल अर्जुनाला अविश्वास उत्पन्न झाला नव्हता. खरें धैर्य, **खरें शूरत्व दुसऱ्याचा जीव घेण्यांत नाहीं** परंतु **स्वतःचे प्राण अर्पण करण्यांत आहे**. प्रत्येक प्राणीमात्राला आपला जीव अत्यंत प्यारा आहे. रणक्षेत्रांतून पळून जाऊन जीवरक्षण करणें हे वीरोचित नाहीं. रणक्षेत्रावर मरण यावें ही अर्जुनाची तीव्र व प्रबळ इच्छा असली पाहिजे.

यापूर्वी हिंसेचे जे प्रकार सांगितले आहेत त्यांतील विरोधिनी हिंसा या भेदाखालीं येणारी ही भारतीय युध्दांतील हिंसा होती. श्रीकृष्णानें गीतोपदेश दिल्यानंतर अर्जुनाला झालेला **विमोह** दूर होऊन अर्जुन युध्दास तयार झाला. अर्जुनाला झालेला **विमोह** हा अहिंसातत्वाचा प्रभाव होय असें म्हणणें चुकीचें होईल. विमोह व सत्यतत्वाचे यथार्थ स्वरूप यामधील अंतर पूर्वपश्चिम दिशांमधील अंतराइतकें आहे हे आतांपर्यंत केलेल्या विवेचनावरून कळून आलेच असेल.

जैनधर्म या शब्दावरून या धर्माचा वीरवृत्तीशींच निकट संबंध आहे असें दिसून येईल. जित--जिन--जैन या शब्दांतच कोणावरतरी विजय मिळविण्याचा गूढ भावार्थ आहे. **रागादिजेतृत्वाज्जिनः** रागादि षड्रिपूंवर विजय मिळविणारा जेता-जगज्जेता होण्याच्या लायकीचा

नाहीं असें मानणें खास चुकीचे होईल. इंद्रियाविजय अगर रागद्वेषादि-कावर विजय मिळविण्याचाच केवळ उपदेश जैनधर्मांत आहे असें नाहीं. **जो कर्मक्षेत्रांत विजयी होईल तोच धर्म मार्गांतहि विजयी होण्यास पात्र आहे.** आधी संसार करावा नेटका हीच शिकवण जैनधर्मानेंहि दिली आहे.

व्यवहारपराचीनो निश्चयं यश्चिकीर्षति ।
बीजादिना विना मूढः स सस्यानि सिसृक्षति ॥ १०० ॥
(अमृतचंद्र पुरुषार्थ सिद्ध्युपाय)

सारांशः–जो व्यवहाराचा त्याग करून निश्चय प्राप्त करून घेण्याची इच्छा करतो तो मूर्ख बीजाशिवाय पिकें उत्पन्न करण्याची इच्छा करतो. आल्या अनुयायांना **निःशंक होण्याचा** उपदेश जैनधर्म देत आहे. या जगांतील रोगादि संकटामुळें घाबरून जाऊं नकोस असा उपदेश करून आपल्या अनुयायांना निःशंक राहण्याची शिकवण जैनधर्मानें दिली आहे.

म० गांधी व अहिंसा

मृत्यूचा नियम हिंसा, जीवनाचा नियम अहिंसा. हिंसा विघातक तर अहिंसा विधायक आहे. अहिंसा पशुबलाची दर्शक तर अहिंसा मनुष्य-बळाला पोषक आहे. हिंसा आसुरी संपत्ति तर अहिंसा दैवी संपत्ति आहे.

सारांशः–हा कीं हिंसा अधर्ममय आहे तर अहिंसा " परमो धर्मः" आहे ' असें म० गांधी म्हणतात व तें अक्षरशः खरें आहे.

युक्यनुशासनांत प्रतिपादिलें आहे कीं।–

दयादमत्यागसमाधिनिष्टं, नयप्रमाण प्रकृतांजसार्थम् ।
अधृष्यमन्यैरखिलैः प्रवादैर्जिन त्वदीयं मतमद्वितीयम् ॥

वरील श्लोकांत दयेला प्रथम स्थान दिलें आहे ते उचीतच आहे. कारण जेथें दया, अहिन्सा यांना स्थान नाहीं तेथें संयमाकडे प्रवृत्ति होणार नाहीं. त्यागवृत्ति अंगी येण्यापूर्वी संयमवृत्ति अंगीं मुरणें जरूर आहे; व जोंवर त्यागवृत्ति अंगीं बाणत नाहीं तोंपर्यंत समाधीचें तांवहि

ध्यावयास नको. या श्लोकांतील दयादि प्रथम धर्म त्यानंतरच्या प्रत्येक धर्माचें निमित्तकारण होय व यामुळेंच दयाधर्मास प्राधान्य व अग्रस्थान देण्यात आलें आहे. ' धर्मस्य मूलं दया ' या वाक्यांतहि वरील अर्थच ग्रथित केला आहे.

स्वामी समंतभद्र आपल्या स्वयंभूस्तोत्रांत म्हणतात कीं:-

अहिंसा भूतानां जगति विदितं परमं ।

परमब्रम्हाची प्राप्ती व्हावी असें ज्यांना ज्यांना वाटतें त्यांनीं त्यांनीं अहिंसा तत्वाची कांस बळकट धरणें जरूर आहे. रागद्वेषादिक सोडून देऊन दया, परोपकार व जनसेवा यांत रत झालें पाहिजे. मनुष्याची वृत्ति जोपर्यंत हिंसक आहे तोंपर्यंत आत्मगुणाचा घात होत राहणार. आत्मगुणाचा विकास व्हावयास पूर्ण अवसर देण्यापूर्वीं प्रत्येकानें अहिंसा-वादी बनलें पाहिजे. चोराला चांदण्या रात्रीची जशी भीति तशी हिंसक मनुष्याला स्वतःची हिंसा होईल ही भीति क्षणोक्षणीं वाटत असते. **पापाः सर्वत्र शंकिताः ।** कंसाला श्रीकृष्ण जसा जळीं, स्थळीं, काष्ठीं, पाषाणीं दिसत असे, तसे हिंसावृत्तीचा पापी मनुष्य सर्वत्र शंकाखोर दृष्टीनें वागत राहील. आपण दुसऱ्याची हिंसा करितो तर आपलीही हिंसा दुसरा करील, हा विचार त्याच्या डोक्यांत सदव जागृत राहील. व तो आपल्या जीवाच्या भीतीनें भीरु व भित्रा बनेल तर त्यात नवल तें काय? अहिंसावाद्याचे विचार याविरुद्ध राहिल्यानें तो भित्रा व भीरु न बनतां तो शूर व वीर होईल. आपल्या पापाचें प्रायश्चित्त श्रीकृष्णाकडून मिळणार हें जाणून कंसाच्या हृदयाचें पाणी झालें होतें व ही आपत्ती टाळावी म्हणून कंस लढाईला उभा राहिला नाहीं. तर तपश्चर्या करून वर मागून या आपत्तीला तोंड देण्याच्या प्रयत्नाला लागला. श्रीकृष्णकंस-कथेपासून आपण आणखी कोणता बोध घ्यावयाचा? जेथें भीतीनें-भयानें ठाणें दिलें आहे तेथें वीरत्व कोठलें? हे जाणूनच सम्यग्दृष्टी लोकांनी सात प्रकारच्या भयांपासून अलिप्त असलें पाहिजे असें जैनशास्त्र सांगत आहे. पंचा-

ध्यायींत म्हटलें आहे कीं:-

> नापिस्पृष्टो सुदृष्टिर्यः स सप्तभिर्भयैर्मनाक् ।
> ततो भीत्याऽनुनेयोऽस्ति मिथ्याभवो जिनागमात् ।
> साच भीतिरवश्यं स्याद्धेतोः स्वानुभवक्षतेः ॥

सारांश:- जेथें भित्रेपणा आहे. तेथें सम्यक्त्व नाहीं व जेथें सम्यक्त्व नाहीं तेथें आत्मोध्दार शक्य नाहीं आत्मोद्धार-आत्मविकास होण्यासाठीं प्रत्येकानें अहिंसावादी बनलें पाहिजे. अहिंसावादी होणें हें वीरत्वाचें चिन्ह आहे; तें भीरूपणाचें निदर्शक खास नाहीं. भित्रा व भीरू मनुष्य अहिंसा धर्माचें पालन करण्यास बिलकूल पात्र नाहीं. अहिंसा धर्म हा वीरोचित धर्म आहे; तो भित्र्यांचा धर्म नाहीं.

आत्म्याचा धर्म अहिंसा

दुसऱ्या दृष्टीनेंही याचा विचार केला आहे. अहिंसाधर्म हा शरीराचा धर्म नव्हे, तो आत्म्याचा धर्म आहे. अहिंसा म्हणजे दया, **प्रेम व क्षमा.** अशक्त मनुष्य दुसऱ्याच्या मदतीनें हिंसा करितो. तसें घडवून आणितां आलें नाहीं तरी त्याची भावना हिंसक झाल्यानें पापबंध तरी जडणारच. हिंसा करण्याचें शारीरिक सामर्थ्य असतांही जो हिंसा करीत नाहीं, तोच अहिंसा धर्माचें पालन करण्यास समर्थ व पात्र होईल. भीतीमुळें,-भित्रेपणामुळें अगर अशान्त अन्य कारणामुळें हिंसा करण्याची इच्छा असतांही ज्याच्याकडून प्रत्यक्ष हिंसा घडत नाहीं, अशा इसमास त्याच्या कषाययुक्त भावनेंमळें हिंसेचें पातक घडतें. म· गांधी आपल्या नवजीवन २३।४।१९३२ च्या अंकांत लिहितात कीं:-- अहिंसेंत भित्रेपणाला स्थान नाहीं. निर्भयता हा अहिंसावादी यांचा श्रीगणेशा पहिला धडा आहे, सहिष्णुता, क्षमा, धैर्यादि सद्गुण हे अहिंसा धर्माचे अंश आहेत. निर्भयता व भीरुता यांचे एके ठिकाणीं वास्तव्य व अस्तित्व असणें शक्य नाहीं. शस्त्रास्त्रांत कुशलता व हिंसा यांना शौर्य म्हणणें चुकीचे आहे. शौर्याचे शारीरिक व आत्मिक असे दोन भेद आहेत. **आत्मिक बल**

अगर शौर्य ह्मणजे अहिंसा व शारीरिक बल अगर शौर्य ह्मणजे वीरता. दुसऱ्यास त्रास अगर पीडा देण्याकरितां शक्तीचा उपयोग केला जातो, तेव्हां तेथें वीरत्वाचा अभाव व हिन्सेचें अस्तित्व दिसून येतें. हिन्सा म्हणजे विकृत वीरता. स्वार्थीनें प्रेरित होऊन केलेली हिन्सा म्हणजे दुष्टपणा. अर्थातच दुष्टपणापेक्षां विकृत वीरताहि बरी.

वरील विवेचनावरून अहिन्सा व दुष्टपणा यांत दोन ध्रुवाइतकें अंतर आहे ; तसेंच तरवार चालविण्यापेक्षां अहिंसावादी होण्यांत अधिक वीरता असावी लागते असें दिसून येईल. शिकारी कुत्र्यांना व शिकारी लोकांना पाहून जंगलांत दडी मारून राहणारा सिंह, वनराजा नव्हे ; तो 'अहिन्सा अहिन्सा' म्हणून पळून जात नाहीं. तर आपल्या प्याऱ्या-जीवाचें रक्षण करण्याकरितां पळून जातो. मारण्यापेक्षां मरणास तयार होण्यांत अधिक शौर्य व धैर्य लागतें. अहिन्सा तत्वाच्या उपदेशामुळें आज आक्षेपित परिणाम घडतील इतकाहि विचार न सुचण्याइतके मूर्ख आमचे पूर्वज नव्हते हें खास. फलावरून कारणाची मीमांसा करणें अत्यंत बिकट काम आहे. विवक्षित फल देणारी कारणें अनेक असणें अशक्य नाहीं. तशांत दोनतीन हजार वर्षापूर्वीपासून अनेक निरनिराळ्या तऱ्हेच्या घडामोडी झाल्या. परिस्थिति बदलली. फार काय ऋतुमानहि बदलले. यामुळें हिन्दुस्थान परतंत्र होण्यास अहिन्साधर्मच सर्वस्वीं अगर प्रामुख्यानें कारण आहे असें मानणें केव्हांहि युक्त होणार नाहीं.

ज्या अरब, तुर्कादि मुसलमानांनीं एकवार कां होईना युरोप-खंडास चळचळा कापावयास लाविले त्याना हल्लीं आपले अस्तित्व कानाकोपऱ्यांत राहून सांभाळावें लागतें. इजिप्शियन, सिरियन व ग्रीक संस्कृती व राज्यें नष्ट झाली व त्याजागीं दुसरी संस्कृती व राज्यें आली, या उलटापालटींतील राष्ट्रापैकीं कांहीं राष्ट्रे हिन्सावादी व कांहीं अहिन्सावादी होतीं असें थोडेंच आहे ?

हिन्दुस्थानचा इतिहास पाहिला तर फरेंच, पोर्तुगीज अगर डच यांचें राज्य हिंदुस्थानांत कां झालें नाहीं ? हिन्दूंना जिंकणाऱ्या मुस-

लमानांना इंग्रजांनीं खडे चारलेच ना ? चित्पावन पेशव्यांनीं राज्य केले त्यापूर्वीच विजयनगरच्या साम्राज्यानेंहि मुसलमानांशीं कित्येक वर्षें टक्कर दिलीच ना? विजयनगरच्या राज्याच्या वेळीं अहिन्सावाद नव्हती असें थोडेच होतें ? किम्बहुना चित्पावन पेशव्यांच्या कालपेक्षां विजयनगरच्या साम्राज्याच्या वेळीं अहिन्सावादाचें प्रस्थ शेंकडो पटीनें अधिक होतें. अहिन्सावादाच्या प्रमुख क्षेत्रापासून पेशवाई फार दूर होती; विजयनगरची स्थापना मात्र अहिन्सावादाच्या बालेकिल्यांतच झाली. सायनमाधवांच्या प्रेरणेनें विजयनगरची स्थापना झालेली आहे असें मानिलें तरी हे सायनमाधव हिन्सावादी थोडेच होते ? या राज्यस्थापनेंत व तिच्या विस्तारांत अहिन्सावादी कट्टर जैनांचा भाग मुळींच नव्हता असेंहि नाहीं. विजयनगरच्या राज्याच्या समकालीन अहिन्सावादी स्वतंत्र जैनराज्यें नव्हतीं काय ? विजयनगरच्या राज्यस्थापनेच्या पूर्वीं दक्षिण हिन्दुस्थानच्या कानाकोपऱ्यांतहि अहिन्सावादी जैनांची राज्यें नव्हती काय ? जगज्जेत्या शिकंदरानंतर हिंदुस्थानावर चालून येणाऱ्या सेंल्यूकसला युद्धांत खडे चारणारा मौर्य चंद्रगुप्त अहिन्सावादी जैनच होता ना ? अगदीं अलिकडचा (इ. स. १७७५) इतिहास पाहिला तरी सेनापति इंद्रसेन हा जैन होता. रा. ब. पारसनीस यांनीं ग्वाल्हेरच्या शिन्दे घराण्यांतील जे कागदपत्र प्रसिद्ध केले आहेत त्यांत जनरल इंद्रसेनाच्या नांवाचा उल्लेख एक नाहीं हजारवेळां आला आहे. इंद्रसेन अहिन्सावादी जैन असतां सेनापति झाला ना ?

सारांश हा कीं जैनधर्मीय अहिन्सा मनुष्योन्नतीला व त्याबरोबरच राष्ट्रोन्नतीला बाधक नाहीं. उलट ती पूरक व सहाय्यकच आहे. कषायवश होऊन अगर करमणुकीसाठीं मनवचनकायेनें कोणत्याही प्राण्याची हिन्सा करणें अगर त्यास त्रास होईल असें वर्तन करणें जैनधर्मास मान्य नाहीं. आपला देश, धर्म, धर्मबांधव, अबला स्त्रिया व निर्बल पुरुष यांचें दुष्टापासून संरक्षण करणें हा धर्म आहे असें जैनधर्म मानीत आहे. अशा उज्वल धर्माची शिकवण कोणासही मारक होईल अगर

तारक होईल याचा वाचकहो, आपणच विचार करा.

हिंदुस्थान स्वातंत्र्यास मुकला याची जीं अनेक कारणें आहेत त्या कारणांची त्रोटक ओळख अखेरच्या भागांत देण्याचें योजिलें आहे. यानंतरच्या प्रकरणांत ज्ञात इतिहासातील अनेक जैनवीरांपैकीं कांहीं अत्यंत प्रसिद्ध अशा जैनवीरांचीं चरित्रें व जैन राजघराण्यांचीं माहिती देण्याचें योजिलें आहे.

हीं चरित्रें देतांना चरित्रनायकाचा जन्म, मृत्यू, मातापितर यांची माहिती व चरित्रांतील माहितीची आधारभूत साग्र सामुग्री देण्याचें मुद्दाम टाळिलें आहे. जैनधर्मीय राजघराण्याचा वृत्तांत देतांनाहि हेंच धोरण ठेविलें आहे. हेतू हा कीं, त्यामुळें अंगिकृत विषय पाल्हाळिक होऊं नये, वीरपुरुषांची चरित्रें व राजघराण्यांची माहिती देतांना उत्तर व दक्षिण हिंदुस्थान असें दोन प्रमुख भेद लक्षांत ठेवून, शक्यतोंवर त्या त्या भागांतील माहिती एकत्रित दिली आहे. प्रतिपादित विषयाचें महत्व वाचकांच्या मनावर बिंबावें म्हणून क्वचित प्रसंगीं पुनरुक्तीचा दोष घेण्याची जरूरी वाटली व त्यामुळें अशी पुनरुक्ति टाळण्याचा प्रयत्न केला नाहीं. तसेंच चरित्रनायकांपैकीं एखाद्यास एखाद्या ग्रंथकारानें केव्हां कालीं अजैन म्हणून संबोधिलें असेल अशास आम्हीं हल्लीं जैन म्हणून संबोधिल्यानें पराचा कावळा करून वाद वाढविण्याची आमची इच्छा नाहीं. वादाकरितां ते चरित्रनायक जैनधर्मीय नव्हते असें मानिलें तरी ते अहिंसावादी-मांसाहारनिवृत्त तरी खास होते. चरित्रनायक जैन असो वा नसो तो मांसाहारनिवृत्त असतांहि त्यानें वीरोचित कृत्य केलें एवढें सिद्ध झालें तरी आक्षेपकांच्या आक्षेपास मूठमाती मिळते.

दक्षिण हिंदुस्थानांतील जैनधर्माचा प्रसार व विस्तार, दक्षिण हिंदुस्थानांतील जैनराज्यें, दक्षिण हिंदुस्थानांतील जैनांनीं सजविलेलें वाङ्मय व कलाकौशल्य इत्यादि विषयावर अधिक विस्तृत, संगतवार व साधारण माहिती मराठींतून देण्याचा प्रयत्न होणार आहे. या कारणामुळेंहि प्रस्तुत पुस्तकांत त्रोटकच माहिती दिली आहे.

प्रकरण ३ रें.

अफाट व अगाध सागरांतील एका बिंदूवरून समुद्राची खरीखुरी कल्पना येणें अगर आणून देण्याचा प्रयत्न करणें जसें अशक्य तद्वतच जैनवीररूपी सागरांतील दहा-वीस जैनवीरांचीं चरित्रें देण्यानें सर्वच जैनवीरांच्या वीरवृत्तीची व त्यांच्या संख्याबलांची कल्पना देता येणार नाहीं. ऐतिहासिक वीरपुरुषांचीं चरित्रें देण्याचा हा आमचा प्रयत्न चमचानें समुद्राचें पाणी काढून टाकून समुद्र आटविण्याच्या प्रयत्नासारखाच हास्यास्पद होणार आहे. मात्र शितावरून भाताची परीक्षा करितात तद्वतच दहावीस जैन-वीरांच्या चरित्रांवरून जैनवीरसागराची अंधुक कल्पना करण्यास अवसर मिळेल. मागील प्रकरणांत जैनधर्मांतील अहिंसा तत्वावर घेतल्या जाणाऱ्या आक्षेपांची जाणीव करून देतांना ते आक्षेप यथार्थ नाहींत असें म्हटलें आहे. ते आक्षेप यथार्थ कां नाहींत, हें दाखविताना जैनधर्मीय अहिंसेचें सत्यस्वरूप देऊन अशा धर्माचें अनुयायी वीरवृत्तीचेंच असणें कसें जरूर आहे हें निरनिराळ्या रीतीनें दाखविण्याचा प्रयत्न केला आहे. कदाचित् कोणी असेंहि म्हणतील कीं अहिंसा धर्माचें तात्विक सत्यस्वरूप आम्हांस मान्य आहे. परंतु " पुराणांतील वांगी पुराणांत " या न्यायानें या अहिंसाधर्माच्या सत्यस्वरूपाचें झालें नसेल कशावरून? हीहि शंका राहूं नये म्हणून नमुन्यादाखल पुढील चरित्रें दिली आहेत.

ही चरित्रें देतांना कांहीं ओबडधोबड व ठोकळ खुणा मनाशीं बांधिल्या आहेत. जैनांचें अंतिम तीर्थंकर होऊन गेल्यास २४६० वर्षें झाली व तेथपासूनचा थोडासा इतिहास उपलब्ध झाला आहे. शिकंदर बादशाहानें हिंदुस्थानावर इ० स० पूर्वीं ३२३ सालीं स्वारी केली. हीच परकीयांची पहिली स्वारी होय असे इतिहासज्ञ मानितात.

अर्थातच १९३४+३२३=२२५७ वर्षांच्या सुदीर्घ कालांतील कांहीं वेंचक जैनवीररत्नांच्या नांवाच्या उल्लेख करणें क्रमप्राप्त आहे.

या २२००।२३०० वर्षांच्या काळाचे अलीकडील सुमारे ७००। ८०० वर्षांचा एक व तत्पूर्वीच्या इ. सनाच्या १३ व्या शतकाच्या मध्यापर्यंतचा सुमारें १४००।१५०० वर्षांचा दुसरा असें दोन भाग कांहीं विशिष्ट हेतूनें कल्पिले आहेत. इ. सनाच्या १३ व्या शतकाच्या मध्यकालापर्यंतचा एक टप्पा बांधण्याचा हेतू हा कीं त्या कालापर्यंत जैनधर्मांतील अहिंसातत्वाची नौबत मोठ्या दिमाखानें सर्वत्र झडत होती. त्यानंतर जैनधर्माचा सूर्य मावळत्या मार्गावर लागला. जैनधर्माच्या उगवत्या, मध्यान्हेच्या व मावळत्या सूर्यकिरणांतील कांहीं सुगंधी सुमनांचा परिचय करून घेतांना कालाचें हे विभाग विचारांत घेण्यांत आल्यास या चरित्रापासून योग्य तो धडा घेण्यास व अनुमानें काढण्यास खास सोयीचे होईल.

मध्यदेशांतील जैनवीर मौर्यसम्राट् चंद्रगुप्त

इतिहासज्ञान्यांनीं अनेक साधनांच्याद्वारें आजवर अनेक हिंदी राजे, महाराजे व वीरपुरुषांचा इतिहास संकलित करून त्यांचा कालनिर्णयहि ठरविला आहे. हिंदुस्थानावर ज्या ज्या परकीय विजेत्यांनीं स्वाऱ्या केल्या त्यांतील प्रथम स्वारी करण्याचा मान अॅलेक्झांडर–शिकंदर–बादशाहास इतिहासज्ञांकडून देण्यांत येत आहे. शिकंदर बादशाहानें स्वारी करून हिंदुस्थानचा कांहीं भाग (पंजाब) आपल्या अमलाखालीं घेतला. हिंदुस्थानावर परकीयानें मिळविलेला हा विजय इ. स. पूर्वीं ३२५ व्या वर्षीं घडला असें मानिलें जातें. पंजाब ओलांडून शिकंदर पुढें जाता तर अखिल हिंदुस्थान त्यास खास जिंकिता आले असते ; परंतु या स्वारीसाठीं सुमारें दोन वर्षें बाहेर राहिल्यानें शिकंदरच्या मायभूमीत राजकीय सत्तेसाठीं अंतस्थ कलह माजल्यानें व पंजाब आक्रमण करण्यांत त्याची शक्तिहि बरीच क्षीण झाल्यानें शिकंदरास पुढील आक्रमण बंद ठेवून स्वदेशीं परतावे लागले. शिकंदरास विरोध करणाऱ्या हिंदी

राजामधील ज्या बेकीमुळें शिकंदर विजयी झाला तशीच बेकी शिकंदरच्या गैरहजेरींत त्याच्या स्वदेशांत माजून राहिली व त्यानें कमविलेल्या राज्याचे लहानमोठे तुकडे तुकडे झाले. पंजाब पादाक्रांत करून शिकंदरास परतणें भाग पडले, परंतु तो यानंतर थोड्याच दिवसांत म्हणजे . स. पूर्व ३२३ व्या वर्षीं बाबिलोन येथें मरण पावला. आमचा चरित्रनायक यावेळीं नुकता विशीच्या घरांत गेला होता.

शिकंदरला मिळालेल्या जयामुळें खडबडून जागें झालेल्या हिंदी राजांना आपल्या अपयशाच्या कारणावरून उपाययोजना करण्याची आवश्यकता वाटूं लागली. हिंदुस्थानांत वीरवृत्तीचा लोप झाला होता म्हणून शिकंदर विजयी झाला असें इतिहास सांगत नाहीं. हिंदी राज्यातील आपसांतील कलह व त्या कलहामुळें उत्पन्न झालेली घातुक बेकी ही शिकंदरच्या विजयाच्या मुळाशीं आहेत हे कळून चुकलें. अशाच संकटाचीं पुनरावृत्ति झाल्यास त्यास एकमुखीं विरोध करणारी राज-सत्ता अस्तित्वांत असल्याखेरीज विरोध यशस्वी होणार नाहीं हें चंद्रगुप्तानें ताडिलें व तशी सत्ता-साम्राज्य-स्थापन करण्याचा उद्योग चंद्रगुप्त करू लागला. यावेळीं मगधदेश हिंदुस्थानांतील इतर कोणत्याहि देशाच्या पुढें होता. चंद्रगुप्त हा इ. स. पूर्व ३०३ व्या वर्षी त्या देशाच्या गादीवर बसला.

मगधाधीश चंद्रगुप्तानें शिकंदर बादशाहानें जिंकलेला मूलख आपल्या ताब्यांत घेतला, एवढेंच नव्हे तर त्याहि पलीकडे आपल्या राज्याची सीमा पोंहचविली. हिंदुस्थानच्या संरक्षणाच्या दृष्टीनें अशी हद्द बांधणें केव्हांही अत्यंत जरूरीचे आहे. शिकंदराच्या मृत्यूनंतर एंटिगोनिस व सेल्यूकस या त्याच्या दोन प्रतिस्पर्धी व प्रबळ सरदारामध्यें सत्तेसाठीं लढाया होऊन एंटिगोनस हा प्रथम विजयी झाला, परंतु सेल्यूकसनें त्याचा पराभव करून बाबिलोन आपल्या कबजांत घेतले व त्यानंतरच्या पुढील ६ वर्षांतच तो मध्य व पश्चिम आशियाचा अधिपति झाला. घरांतील स्थिरस्थावर होऊन स्वास्थ्य मिळाल्यानंतर

महत्वाकांक्षी व शिकंदराच्या तालमींत तयार झालेल्या सेल्यूकसनें शिकंदरनें पूर्वी मिळविलेला मुलुख फिरून मिळविण्यासाठीं हिंदुस्थानकडे आपला मोर्चा वळविला व तो तडाक्यासरशीं सिंधु नदीपार झाला. शिकंदराच्या स्वारीनंतर सुमारें वीस वर्षांनीं सेल्यूकसची ही दुसरी स्वारी इ. स. पूर्वी ३०५ मध्यें झाली.

परंतु या अवघ्या वीस वर्षांच्या काळांत हिंदुस्थानांत आमूलाग्र स्थित्यंतर झाल्याचे सेल्यूकसच्या प्रत्ययास आलें. चंद्रगुप्ताच्या प्रबल सेनेशीं जेव्हां रणांगणांत गांठ पडली तेव्हां सेल्यूकसच्या सैन्याची वाताहात होऊन त्याची महत्वाकांक्षा जिरली. चंद्रगुप्ताशीं मैत्रीचा तह करून शिरसलामत मायदेश केव्हां पाहीन असें झाले. या स्वारीमुळें हिंदुस्थानांतील सुईच्या अग्राएवढीं देखील जमीन सेल्यूकस यास मिळवितां आली नाहीं, उलट ५०० हत्तीच्या मोबदल्यांत सेल्यूकसनें हिरात, काबूल व कंदाहरच्या भोंवतालचा मुलूख चंद्रगुप्तास दिला. चंद्रगुप्ताशीं आपला स्नेह व सलोखा कायम रहावा या हेतूनें त्यानें आपली मुलगी एथीना इचे चंद्रगुप्ताशीं लग्न लावून दिलें. हा चंद्रगुप्त-सेल्यूकस तह इ. स. पूर्वी ३०३ मध्यें झाला. हिरात, काबूल व कंदहारच्या भोंवतालच्या मुलखाचा भौगोलिक दृष्टीनें विचार करितां असें दिसून येईल कीं मोंगल बादशाही सत्तेपेक्षांहि चंद्रगुप्ताची सत्ता अधिक मुलखावर राहिली होती.

चंद्रगुप्तानें फक्त २४ वर्षें राज्य केलें. त्यानें यौवनावस्था प्राप्त होण्यापूर्वींच राज्याची धुरा शिरावर घेतली होती व त्यानंतर फक्त २५ वर्षांच्या अल्प काळांत चंद्रगुप्त सम्राट् झाला. चंद्रगुप्ताची कारकीर्द सर्व प्रकारें यशस्वी झाली. केवळ २५ वर्षांच्या अल्प मुदतींत हिंदुस्थानांत अभूतपूर्व साम्राज्य स्थापन करून त्यास त्याने स्थैर्य आणिलें. सेल्यूकसच्या पराजयामुळें पुढें कित्येक वर्षे हिंस्दुथानाकडे तोंड वळविण्याची परकीयांची छाती झाली नाहीं. चंद्रगुप्तानंतरच्या पुढील दोन पिढ्यांत मौर्य घराण्याशीं ग्रीक राजांचे व्यापारविषयक व राजकीय तहनामे घडून येत होते. यावरून मौर्यसाम्राज्यास चंद्रगुप्तानें आपल्या पराक्रमानें व कर्तब-

गारीनें आणलेल्या स्थैर्याची कल्पना सहज करितां येईल.

श्री. मिश्र यांनीं आपल्या 'भारतवर्षका इतिहास' खंड २ पृष्ट १२१ वर मौर्यसम्राट चंद्रगुप्ताबद्दल अत्यंत मननीय असें उद्गार काढिलें आहेत. ते म्हणतात "चंद्रगुप्ताची कारकीर्द सर्वांगसुंदर व यशस्वी झाली. सुमारें २५ वर्षांच्याच काळांत त्यानें हिंदुस्थानांत अभूतपूर्व साम्राज्य स्थापन करून त्यास स्थैर्य आणिलें. हल्लीच्या कायदेकानूशीं चंद्रगुप्ताच्या कायद्यांची तुलना करितां कांहीं बाबतींत ते अधीक कडक व निष्ठूर असलेले दिसून येतात. तथापि त्यावरून त्या काळची भारतीय संस्कृती अत्यंत उच्च दर्जाची होती ती योग्यच आहे. या संस्कृतीची मुक्तकंठानें जी स्तुती केली जात आहे. ती योग्य आहे असें दिसून येईल व ऐतिहासिक काळांतील पहिला सम्राट चंद्रगुप्त हा नुसता शूर वीरयोद्धाच होता असें नाहीं, तर तो निष्णांत राजकारणीहि होता. गृहस्थधर्माचा पेशा पत्करून एका अभूतपूर्व साम्राज्याचा तो स्वामी झाला व वयाला ५० वर्षे पुरी होतात न होतात तोंच साम्राज्यसुखाच्या अतुल वैभवावर लाथ मारून सर्व परिग्रहत्यागी **जैनमुनी** झाला. या सम्राटश्रेष्ठाचें शौर्य, राज्यकारभार-कौशल्य व त्याग या तिन्ही सद्गुणाबद्दल त्यांची मुक्तकंठानें स्तुति करणें भाग आहे." जैनमुनी झाल्यावर १२ वर्षे खडतर तपश्चरण करून चंद्रगुप्तानें म्हैसूर संस्थानांतील श्रवण बेळगोळ येथें आपल्या इहलोकीची यात्रा संपविली.

जैनवीरांच्या चरित्र मालिकेंत सम्राट चंद्रगुप्ताला प्रथमस्थान कां दिलें याचा बोध वाचकांना होईलच, परंतु आक्षेपक सत्यशोधक व सत्यान्वेषी असेल तर जैनधर्मांतील अहिंसेवर घेतलेले आक्षेप अन्यायमूलक व अपमानकारक आहेत अशी स्पष्ट व खुल्या शब्दांत तो कबुली दिल्याखेरीज राहणार नाहीं.

सम्राट चंद्रगुप्त जैन होता काय ?

चंद्रगुप्त मौर्य हा जैन होता, तो वीरधीर योद्धा होता, तो कुशल राजकारणी होता व शेवटी त्यानें जैनमुनींची दीक्षा

घेंतली हे सर्व थोतांड असून कोणातरी महान् योद्धयाला व राजकारणी पुरुषाला आपल्या धर्मात बळेंच ओढून आरती ओंवाळून घेण्याचा हा आमचा अश्लाध्य प्रयत्न आहे अशी शंका निघाल्या खेरीज राहणार नाही. हें आम्ही जाणून आहों. ही शंका एकदां निघून तिचे निराकरणहि झालें आहे, त्यामुळें विद्वानांमधील वाद मिटला, मतभेद नष्ट होऊन सम्राट चंद्रगुप्त हा जैन होता व जैनमुनीदीक्षा धारण करून बेळगोळ येथें त्यानें समाधिमरण साधिलें याबद्दल आतां विद्वानांमध्यें जरी एकमत झाले असलें तरी सामान्य लोकांना त्याची माहिती असणें शक्य नाहीं. चंद्रगुप्ताच्या धर्माबद्दल एकमत होण्यास जी कारणें दिली आहेत ती येथें देणें अप्रस्तुत होईल; मात्र यासंबंधी विद्वानांची मतें दिल्यास ही शंका नष्ट होईल असें वाटल्यानें इतिहासक्षेत्रांतील कांही सन्मान्य विद्वानांच्या मताचा सार याखाली दिला आहे.

(१) मि. इ. थॉमसः- ' महाराजा चंद्रगुप्त हा जैनधर्माचा नेता होता. कांही धार्मिक व ऐतिहासिक आधारांच्या द्वारें ही गोष्ट शाबीत झाली आहे. यामुळें यापुढें चंद्रगुप्त हा जैन नव्हता अशी शंकाकुशंका काढणें व्यर्थ आहे. ज्या अनेक शिलालेखांच्या आधारें हे शाबित झालें आहे ते शिलालेख अत्यंत प्राचीन आहेत. महाराजा चंद्रगुप्ताचा नातू-मुलाचा मुलगा-अशोक यानें बौद्धधर्माचा उघड स्वीकार केला नसतां तर त्यास जैनधर्माचा आश्रयदाता असें म्हणण्यास कोणतीहि अतिशयोक्ती होणार नाहीं. मेगास्थेनीस म्हणतो कीं, ' ब्राम्हणांचा ' प्रतिस्पर्धी धर्म जो जैनधर्म त्या धर्माचा चंद्रगुप्तानें स्वीकार केला होता. मि. थॉमस यांनीं बौद्धधर्माचा व बौद्धधर्माच्या इतिहासाचे सांगोपांग व चिकित्सापूर्वक अध्ययन केलें व त्यामुळें त्या विषयांत त्यांना अधिकार प्राप्त झाल्यानें त्यांच्या मतास सर्वत्र मान्यता दिली जाते. मि. थॉमस यांनीं अशोकासंबंधी वर जें विधान केलें आहे त्याचा अधिक खुलासा होणें जरूर आहे. मि. थॉमस यांना अशोकच्या , राजाज्ञेंत ' बौद्ध-

र्माच्या शिकवणीपेक्षां जैनधर्मतत्वज्ञानाचीच छटा अधिक दिसून आली. परंतु अशोकनें आपल्या आजाचा धर्म सोडून देऊन बौद्धधर्माची उघड उघड दीक्षाच घेतली होती असें मि. थॉमस यांना मान्य करणें भाग पडते. आद्य शंकराचार्याला जसें प्रच्छन्न बौद्धच मानितात तद्वतच अशोकाला मि. थॉमस हे प्रच्छन्न जैन असें मानितात.

(२) मि. बी. लुईस राईसः- इतिहासज्ञ व पुरातत्ववेत्ता म्हणून मि. बी. लुईस राईस यांची प्रसिद्धी आहे. ते म्हणतात कीं, 'चंद्रगुप्त हा जैन होता याबद्दल मुळींच संशय नाहीं.'

(३) एन्सायक्लोपीडिया ऑफ रिलिजन्‌मध्यें लिहिलें आहे. कीं:- 'संसारत्याग करून व विरक्त होऊन चंद्रगुप्तानें जैनमुनी दीक्षा घेतली. त्यानंतर १२ वर्षें तपश्चरण करून इ. स पूर्वी २९७ व्या वर्षी चंद्रगुप्त स्वर्गास गेला.'

(४) मि. जॉर्ज वर्डवूड म्हणतात कीं:-' चंद्रगुप्त व बिंदुसार हे दोघेहि बौद्धधर्मीय नव्हते. चंद्रगुप्ताचा नातू अशोक यानें जैनधर्माचा त्याग करून बौद्धधर्माचा स्वीकार केला.'

(५) सुप्रसिद्ध इतिहासकार सर विन्सेंट स्मिथ यांचें मत असें आहे कीं:- जनकथावली व जैन पुराणांत दिलेलें वृत्तांत बव्हंशी खरे व सत्य आहेत. चंद्रगुप्तानें राजत्याग करून जैनमुनींदीक्षा घेतली ी कथा सत्य आहे.'

(६) श्री जयस्वाल म्हणतात कीं:- ' आजपर्यंत उपलब्ध झालेली सर्व माहिती डोळ्यापुढें ठेवून मी माझें मत देत आहे. इ. सनाच्या ५ व्या शतकापर्यंतचे जैनग्रंथ व तदनंतरचे शिलालेख यांतून चंद्रगुप्त हा जैनमुनी झाला होता असें प्रतिपादन केलें आहे. जैनग्रंथांचा मी जसजसा अभ्यास केला तसतसे त्यांतील लिखाण सत्यस्वरूपाचें आहे असा माझा विश्वास वाढत चालला व माझा त्याबद्दलचा आदर दुणावला. चंद्रगुप्तानें आपल्या अखेरच्या काळांत राज्यत्याग करून जैनमुनीनें व्रत स्वीकारिलें असें न मानण्यास मला कोणतेहि कारण देतां येत नाहीं.

श्रवण-बेळगोळ येथील शिलालेखांचे संपूर्ण अध्ययन व मनन करून मि. राईसनें चंद्रगुप्ताच्या जैनत्वाबद्दल जो अभिप्राय व्यक्त केला व ज्यास मि. स्मिथनें संमति दिली त्याविरुद्ध मत देणें शक्य नाहीं. '

सम्राट् चंद्रगुप्ताचें इतिहासांतील स्थान.

कौशल, तिरहुत, वाराणसी, अंग व मगध देशाच्या राजांना चंद्रगुप्तानें जिंकिले. शिकंदर बादशहानें जिंकिलेला पंजाब देश चंद्रगुप्तानें परत आपल्या अंमलाखालीं आणिला. विजयी सेल्यूकसचा पराभव करून काबूल, कंदाहार, हिरात व बलुचिस्थान या देशावर आपली सत्ता प्रस्थापित करणारा हिंदुस्थानचा आजवर चंद्रगुप्त एकच सार्वभौम राजा झाला. मोगल बादशहा व इंग्रज या दोघांनाहि अशी सत्ता स्थापन करितां आली नाहीं.

शिकंदर, महमद गिझनी, नेपोलिअन व नादिरशहा वगैरे योद्धयांनीं मुलुखगिरी करून आपल्या राज्याचा विस्तार चंद्रगुप्ताप्रमाणें केला; परंतु चंद्रगुप्त व वरील विजेते यामध्यें महदंतर-पृथ्वी-आकाशाइतकें-आहे. जिंकलेल्या मुलखांत त्यांची सत्ता बद्धमूल झाली नाहीं. चंद्रगुप्ताच्या विजयाला स्थैर्य आले.

शिकंदरादि वरील विजेते व विजयी चंद्रगुप्त याच्यांत आणखीहि महत्वाचा फरक आहे. चंद्रगुप्तानें आपली राज्यव्यवस्था उत्तम प्रकारें लाविली; इतरांना ते मुळींच साध्य झालें नाहीं. विजयानें चंप्तगुप्त उन्मत्त झाला नाहीं. तो न्यायशील व सदाचारी बनला. धर्मवेडा होऊन आपल्या साम्राज्यांतील निरनिराळ्या धर्माच्या लोकांचा धर्माच्या नांवाखालीं त्यानें छळ केला नाहीं.

सम्राट्पद प्राप्त झाल्यानंतर आपल्यावर क्षत्रियत्वाचा शिक्कामोर्तब करून घेणें त्याच्या हातचा मळ होता. परंतु अशाची जरूरी खऱ्या क्षत्रियाला का भासावी ?

वर ज्या सहा सुप्रसिद्ध इतिहासज्ञांचे अभिप्राय दिले आहेत ते चुकीचे असून सम्राट चंद्रगुप्त मौर्य हा जैनधर्मी नव्हता असें

म्हणणाऱ्यांच्या दुराग्रहाची व अज्ञानाची कोणीहि कीवच करील ? चंद्रगुप्त मौर्य हा क्षत्रिय होता व तो जैनधर्मीयहि होता म्हणूनच कीं कोण जाणें त्याचीं ब्राम्हणांनीं शूद्रांत गणना केली. सारांश हिंदुस्थानचें परचक्रापासून संरक्षण करून प्रथम सम्राट होण्याचा मान एका अहिं-सावादी जैनाला मिळवितां आला असें इतिहास सांगत आहे. मग ब्रम्हर्षी दिवेकरांच्या लिखाणाला कोण विचारतो !!

जैनधर्माची ध्वजा आसेतुहिमाचल फडकविण्यास मगधनरेश कारणीभूत झालें; मत्त हात्तीकडून मारलें जाणें बरें परंतु अशा संकट कालीहि आश्रयास जिनमंदिरांत जाऊं नयें असा उपदेश करणाऱ्यांनीं वीर्यशाली चंद्रगुप्तास शूद्र-कुलोत्पन्न ठरवून या महान् विभूतीबद्दल व त्याच्या उज्वल धर्माबद्दल आदर (!) तर व्यक्त केला नसेलना ? परचक्रापासून हिंदुस्थानचें संरक्षण करून त्याच्या स्वातंत्र्याची ध्वजा फडकविणाऱ्या चंद्रगुप्ताची शूद्रांत गणना केली यापेक्षां त्यांना दुसरें कोणतें पारितोषक हवें होतें ? तो जैन होता म्हणून तर त्याची शूद्रांत गणना केली नसेल ना ? हिंदभूचें स्वातंत्र्य रक्षण करणारा पहिला वीर अहिंसावादी जैन होता. मग तो ब्राम्हणांच्या मतें शूद्र असो वा क्षत्रिय असो. त्याचे विस्मरण होणार नाहीं अशी उमेद आहे.

× × × × ×

मौर्य कुलोत्पन्न दुसरे जैनवीर

सम्राट् चंद्रगुप्तानंतर त्याचा मुलगा बिंदुसार हा इ. स. पूर्वी २९८ व्या वर्षी गादीवर बसला. अशोक हा बिंदुसाराचा मुलगा व त्यानें राज्याभिषेकानंतर ८ व्या वर्षी जैनधर्माचा त्याग करून बौद्धधर्माची दीक्षा घेतली. धर्मांतराचीं कारणें कोणतींहि असोत पण एक गोष्ट निर्विवाद आहे व ती ही कीं या आठ वर्षांत अशोकानें लढाया मारिल्या, मुलुख-गिरी करून दुसरा मुलूख आपल्या राज्यांत जोडिला. अशोक जैनधर्मी अहिंसावादी असतां हा विजय त्यानें मिळविला एवढी एकच गोष्ट प्रस्तुत प्रसंगीं लक्षांत ठेवणें जरूर आहे.

२६ वर्षे राज्यकारभार करून बिंदुसार इ. स. पूर्वी २७२ व्या वर्षी मरण पावला. चंद्रगुप्तानें मौर्य साम्राज्यास बळकटी आणिली होती. त्यामुळें बिंदुसार यास रणांगणावर जाण्याचा प्रसंगच आला नाहीं. परंतु चंद्रगुप्ताचें राज्य व्यवस्थित चालविणें, देशांत शांतता राखून परचक्राच्या भीतीपासून निर्भय राहणें, साम्राज्यांतील अन्यायी व गुन्हेगारांचें पारिपत्य करणें वगैरे राज्यव्यवस्थेंतील कर्तव्यकर्में करणें क्रमप्राप्तच होतें. अहिंसावादी व ' जगद् दुःखं ' असें मानणाऱ्याकडून एवढें मोठसाम्राज्य सांभाळलें गेलें हें अहिंसावादी व ' जगद् दुःखं ' असें मानणाऱ्याची कर्तबगारी अभूतपूर्व नव्हे काय? एखाद्यानें मिळविलेलें राज्य त्याच्या पणतूच्या नशिबीहि राहूं नये असा शाप श्री. दिवेकरांच्या स्तुतीस पात्र झालेल्या पेशव्यांना लागलेला दिसतो.

संप्रति

इ. स. पूर्वी २७२ ते इ. स. पूर्वी २३२ पर्यंत म्हणजे सुमारें ४० वर्षे अशोकानें राज्य केलें. प्रस्तुत विषयाच्या दृष्टीनें अशोकानंतर इ. स. पूर्वी २१६ पर्यंत राज्य केलेल्या मौर्यकुलोत्पन्न इतर राजांशीं आम्हांस कर्तव्य नाहीं. अशोकाचा नातू संप्रति हा इ. स. पूर्वी २१९ व्या वर्षी तक्तनशीन झाला व त्यानें फक्त ९ वर्षे राज्य केलें. राज्यपदारूढ होण्यापूर्वी व अशोकाच्या कारकिर्दीतहि ' युवराज ' म्हणून राज्यकारभारांत त्याचें बरेचसें अंग असे. हा स्वतंत्र विचाराचा व राजनीतिनिपुण होता. राज्याच्या खजिन्यांतील द्रव्यावर राजाची हुकमत नाहीं, तो प्रजेचा पैसा आहे व तो प्रजेच्या कल्याणासाठींच खर्चिला पाहिजे असें संप्रतीचें ठाम मत होतें. बौद्धसंघासाठीं या पैशाचा व्यय करण्याचें अशोकानें ठरविल्या वेळीं अशोकाच्या या कृत्याचा संप्रतीनें तीव्र निषेध केला.

बौद्धधर्मांत जें स्थान अशोकास देतां येतें तेंच स्थान संप्रतीस जैनधर्माच्या दृष्टीनें देण्यास कोणताहि प्रत्यवाय नाहीं. जैनधर्माचा हिंदुस्थानांत प्रसार होण्यासाठीं संप्रतीनें अनंत प्रयत्न केले. एवढ्यानें त्याचें समाधान न झाल्यानें त्यानें जैनधर्माच्या प्रसारासाठीं जैनमुनींना

हिंदुस्थानाबाहेरच्या मुलखांत पाठविलें होतें. संप्रतीनें अनेक जिनमंदिरे बांधविलीं.

मौर्य सम्राट संप्रति याच्या चरित्राची ओळख करून देतांना सुप्रसिद्ध जैन लेखक श्री. बाबू कामताप्रसादजी म्हणतात कीं मौर्यसम्राट संप्रति हा एक बाका वीर व धर्मात्मा नररत्न होऊन गेला. यानें दक्षिण हिंदुस्थानांत विजय मिळवून तेथें जैन धर्माचा पुनरुद्धार केला. भेदभावरहीत सर्वांना उपदेश करून त्यांनां जैनधर्मावलंबी केलें. अरबस्थान इराणादि देशांत जैन उपदेशक पाठवून तिकडेहि जैनधर्माचा प्रसार केला. मगधनरेश व मगधराज्य हीं अखेरपर्यंत हिंदुस्थानचें व जैनधर्मांचे आधारस्तंभ होते. या घराण्याच्या राज्यकाळांत हिंदुस्थानचा यशोदुंदुभी सर्वत्र पसरला होता.

मौर्य साम्राज्याची सत्ता झुगारून देण्याचें व आपलें स्वातंत्र्य जाहीर करण्याचें पहिलें श्रेय आंध्र घराण्याकडे जातें. कलिंग देशाचा सुप्रसिद्ध जैन राजा व योद्धा खारवेल यानेंहि या घराण्याविरुद्ध बंडाचें निशाण उभारून आपलें स्वातंत्र्य जाहीर केलें. या महामेघवाहन राजा खारवेलच्या चरित्राकडे आपण वळूं.



प्रकरण ४ थें.

महामेघवाहन महाराजा ऐल खारवेल

फार जुना इतिहास. यावेळीं यज्ञादिकांच्या नांवाखालीं हिंसा त्याज्य मानून ब्राम्हण मांसाहारनिवृत्त झाले होते. यावेळीं कौशल देशांत हरिवंश कुलोत्पन्न दक्ष राजा राज्य करीत होता. इला ही या दक्षराजाची राणी. या दोघांच्या उदरीं ऐलेय नांवाचा पुत्र व मनोहरी नांवाची कन्या अशी दोन अपत्यें झालीं. मनोहरी नांवाप्रमाणें मनोहर असल्यामुळें तिचा बाप दक्ष याची दृष्टी पापी झाली व बापलेक नवराबायको म्हणून राहूं लागले. राणी इला व पुत्र ऐलेय यांना हा अधम व दुर्लौकिकाचा प्रकार सहन न झाल्यानें त्यांनीं त्या देशास कायमचा नमस्कार केला व ते दुर्ग देशांत जाऊन तेथें त्यांनीं राज्य व इलावर्धन नांवाचें शहर स्थापन केलें. त्यानंतर अंगदेशावर स्वारी करून ऐलेय यानें तो देश आपल्या राज्यास जोडिला व जैनवीराला उचित अशा दिग्विजयास सुरवात केली. नर्मदेच्या पलीकडे दिग्विजय करून तेथें माहिष्मती नांवाचें शहर वसविलें. अखेर आपला मुलगा कुणिम याच्या स्वाधीन राज्य करून ऐलेय जैनमुनी झाला. या पराक्रमी व वीरशाली राजाचे स्मरणार्थ त्याचे वंशज आपल्या नांवामागें **ऐल** अशी सन्मानदर्शक पदवी लावूं लागले. ऐल या शब्दाचा आर्य शब्दाशीं संबंध असावा असा कोणी तर्क करितात.

ऐलवंशीय राजांनीं विंध्याचल पर्वतानजीक चेदिराष्ट्राची स्थापना केली. महाराज खारवेल (सं. क्षारवेल) यानें आपल्यास चेदिवंशज म्हणून संबोधिलें. खारवेल–यांतील ऐल पदवीवरून हा हरिवंशीय–चेदिवंशज–राजा होता असें स्पष्ट होत आहे.

चेदिराष्ट्राची राजधानी कौशला ही विंध्याचल पर्वताच्या पायथ्याशीं होती. या चेदिवंशांतील राजा क्षेमराज यानें कलिंग राजा नंदराज याचा पराभव करून कलिंग देशावर आपलें प्रभुत्व बसविलें व कुमारी पर्वतानजीक राजधानी स्थापन करून राज्यकारभार सुरूं केला. कुमारी-पर्वतानजीक राजधानी वसविणाऱ्या राजा क्षेमराजाचा महाराजा खारवेल हा मुलगा होय.

कलिंग देशाची राजधानी तोषाली ही बिहार प्रांतांतील खंड-गिरी, उदयगिरी भुवनेश्वर व धोली पर्वताच्या मध्यभागीं असावी असा इतिहासज्ञांचा कयास आहे.

महाराजा खारवेल याचें शिलालेखांकित चरित्र देण्यापूर्वी पुराणरत्न पं० गंगाधर शर्मा यांचें या खारवेलविषयीचें मत दिल्यानें वाचकांना त्याच्या मोठेपणाची बरीच कल्पना येऊन शिलालेखांतील माहितीचें महत्व कळून येईल.

पुराणरत्न आपल्या 'प्राचीन कलिंग' या पुस्तकांत लिहितात कीं:—

'कलिंगचे जैनराजे आपणास ऐर्य-ऐल असें म्हणवून घेत. महामेघवाहन अशी त्यांना पदवी होती. मौर्य साम्राज्याची स्थापना होण्यापूर्वीहि स्वतंत्र राजे म्हणून हे कलिंग देशावर राज्य करीत होते. वैदिक-धर्माच्या अनुयायांनीं या देशांतील लोकांना **वेदधर्म विनाशका:** असेंहि संबोधिले आहे. अशोकनें बौद्धधर्माचा प्रसार करण्यास सुरवात करण्यापूर्वी कलिंग व उत्कल या दोन देशांत बौद्धधर्मास प्रवेश मिळाला नव्हता. या राजघराण्याच्या कारकीर्दीत **उत्कल** देशांतहि जैनधर्माचा प्रसार विशेष झाला होता.'

'आर्यावर्तांतील कलिंग व उत्कल या दोन देशाखेरीज अखिल आर्यावर्त सम्राट् चंद्रगुप्ताच्या निशाणाखालीं होता. अशोक हा भारत-वर्षाचा प्रबल सम्राट मानिला जातो, परंतु त्यासहि कलिंग देश जिंकता आला नाहीं.'

कलिंग देश आपल्या कह्यांत आणण्यासाठीं अशोकानें त्या देशा

वर स्वारी केली, परंतु आपल्या देशाच्या स्वातंत्र्यासाठीं कलिंग देशवासियांनीं जें भीषण युद्ध केलें त्याला जगाच्या इतिहासांत क्वचितच तोड मिळेल. या युद्धासंबंधीं आपल्या अनुशासनांत अशोक लिहितो कीं:–' या युद्धामध्यें कलिंगदेशांतील एक लाख लोकांना बंदीवान करण्यांत आलें. सव्वालाख लोक जखमी झाले व याहीपेक्षां अधिक लोक रणांगणावर मृत्युमुखीं पडलें. '

या भीषण युद्धाचा परिणाम अशोकाच्या मनावर यावज्जीव झाला. अशोकाच्या जीवनक्रमांत या युद्धामुळें व या युद्धांतील अधर्ममूलक हिंसेमुळें आमूलाग्र परिवर्तन घडलें.

'मातृभूमीच्या रक्षणासाठीं, तिच्या स्वातंत्र्यासाठीं व धर्मासाठीं ज्या कलिंग देशांतील लहानमोठ्या वीरांनीं इतका आत्मयज्ञ केला त्यांचे कोणीहि स्वातंत्र्यसेवक व उपासक हार्दीक अभिनंदनच करील. ' पुराणरत्न पं. गंगाधर यांनीं दिलेलें वर्णन व अशोकाच्या अनुशासनांतील लिखाण यावरून कलिंग देशाच्या व त्या देशच्या राजाच्या मनाची व थोरवीची कल्पना येईल. अशा राजघराण्यांत व देशांत महामेघवाहन खारवेल याचा जन्म झाला. ओरिसा प्रांतांतील हत्तीगुंफा या ठिकाणीं खारवेलकालीन एक शिलालेख मिळाला आहे. या शिलालेखावरून खारवेलचा जीवनवृत्तांत कळून येणार असल्यानें त्याआधारें खालील माहिती दिली आहे.

यौवराज्य व राज्याभिषेक.

अनेक विद्यांत पारंगतता मिळविल्यानंतर वयाच्या सोळाव्या वर्षीं खारवेलास युवराजपद प्राप्त झालें. सोळा ते २५ वर्षें वयापर्यंत ९ वर्षें युवराजपदाचा उपभोग घेऊन वयाच्या २५ व्या वर्षीं खारवेल राज्याधिकारी झाला. या ९ वर्षांच्या कालांपैकीं कांहीं वर्षें गादी रिकामीच होती व खारवेल ह युवराज म्हणून–राजा म्हणून नव्हे–राज्यकारभार पाहत असे. वयास २४ वर्षें पूर्ण झाल्यानंतर त्यास राज्याभिषेक झाला. यावरून २४ वर्षें वयापूर्वीं राज्याभिषेकास राजा पात्र

नाहीं असा दंडक त्याकाली असावा असें दिसतें. अशोकाच्या राज्याभिषेकाच्या बाबतींतहि असाच प्रकार झाला होता. यावरून वरील विधानास पुष्टी मिळते.

खारवेलच्या राणीचें नांव धिसी अगर धृण्टि होतें व ती वज्रकुलोत्पन्न राजकन्या होती असें या शिलालेखांतील सातव्या ओळीवरून दिसतें.

कलिंगची लोकसंख्या

खानेसुमारी–लोकसंख्येची गणना करण्याची प्रथा प्राचीनकाळीं नव्हती अशी अनेकांची समजूत आहे ; परंतु कौटिल्य अर्थशास्त्र व मेगास्थिनिसचें प्रवासवृत्त यावरून राजकीय व आर्थिक कारणाकरितां व माहितीसाठीं मौर्यकाळीं खानेसुमारी केली जात होती असें दिसून येते. खारवेलच्या या शिलालेखांतील चौथ्या ओळीवरूनहि या विधानास पुष्टीच मिळत आहे. त्यावेळीं कलिंग-ओरिसा देशची लोकसंख्या ३५ लाख होती असें या शिलालेखावरून दिसते. सन १९२१ च्या खानेसुमारीवरून या प्रांताची लोकसंख्या ५० लाख आहे असें ठरलें आहे.

खारवेलचा दिग्विजय

राज्याभिषेकानंतर दुसऱ्या वर्षी खारवेलनें दिग्विजयास प्रारंभ केला. प्रतिष्ठान-पैठन-मूषिका-वनवासी, राष्ट्रिक, भोजक, मगध व पांड्य देशावर स्वाऱ्या करून त्या त्या देशाच्या राजाना आपले मांडलिकत्व कबूल करण्यास त्यानें भाग पाडिलें. यावरून पंजाब तें आसामपर्यंत व विंध्याचलापासून पांड्य देशापर्यंत खारवेलच्या साम्राज्याचा विस्तार झाला होता हें उघड दिसून येते. वर ज्या देशावर व प्रदेशावर स्वाऱ्या करून खारवेलनें विजय संपादन केल्याचें लिहिलें आहे, तो दिग्विजय अवघ्या १२ वर्षांच्या काळांतच मिळविला गेला, हें नेपोलियननें ऐकिलें असतें तर त्याचा गर्वहरण खास झाला असता.

श्री० बाबू कामताप्रसादजी जैन हे आपल्या ' जैन वीरों का इतिहास ' या पुस्तकांत लिहितात कीं, ' खारवेल हा भारतवर्षाचा सार्व-

भौम चक्रवर्ती व उद्धारक असा होऊन गेला. समरांगणावरील त्याचें युद्धनैपुण्य, सैन्याची रचना व भरारी ही पाहतां खारवेल यास भारतीय नेपोलियन ही पदवी सार्थ होईल असें अनेकांचे मत आहे. दिग्विजयाखेरीज इतर गोष्टींचा विचार करितां खारवेलची योग्यता नेपोलियनपेक्षां अनेक पटीनें खास अधिक भरेल. या भारतीय नेपोलियनला जन्म देण्याचा सन्मान इतर कोणत्याहि धर्मास नसून तो जैनधर्मासच आहे. '

नेपोलियनबरोबर तुलना करून खारवेल यास श्रेष्ठत्व दिलें जातें त्याचें कारण, राजकारणाइतकेंच त्यानें धर्मकारणहि साधलें हें होय. त्यानें कुमारी पर्वतावर अनेक जिनबिम्बें व जिनमंदिराच्या प्रतिष्ठा करविल्या. जैनमुनींच्या निवासस्थानासाठीं अनेक गुंफा बांधविल्या. जैनधर्माची प्रभावना करण्याकरितां देशोदेशींच्या जैनविद्वानांचें सम्मेलन भरवून अशोकाच्या बौद्धधर्म सम्मेलनाचें अनुकरण केलें. परदेशांत उपदेशक पाठवून जैनधर्माचा प्रसार केला व शेवटीं कुमारी पर्वतावर सल्लेखनाव्रत आचरून समाधिमरण साधिलें.

खारवेलचा कुलधर्म.

खारवेलचा कुलधर्म जैनधर्म होता व स्वतः खारवेल जैनधर्मावलंबी होता. वैदिक विधानानुसार खारवेलचा महाराज्याभिषेक झाला होता व त्यानें ब्राम्हणांना भूमिदानहि केलें होतें असें दिसून येते. बुडत्यास काडीचा आधार या न्यायानें खारवेलास वरील कारणामुळें हिंदुधर्मीयांत ओढण्याचा प्रयत्न होईल, परंतु राजाला इतर धर्म सांभाळावेच लागतात व हा विचार केला असतां जैनधर्मी असतांहि इतर धर्माचे अनुयायी, यांचा त्यानें सत्तेच्या जोरावर व धर्माच्या नांवाखालीं छळ केला नाहीं. या शिलालेखांतील १७ व्या ओळींत इतर धर्मीयांचा आश्रयदाता व सन्मानदाता असे खारवेलाचें वर्णन दिलें आहे. सुख, संपत्ति व ऐश्वर्य याबरोबरच खारवेलच्या राज्यांत प्रजेला धार्मिक स्वातंत्र्य होते हीहि गोष्ट प्रामुख्यानें नमूद करण्यासारखी आहे. खारवेलच्या धोरणाचा पुरःस्कार व अनुकरण हिंदूंनीं केलें असतें तर

काय झालें असतें याचा विचारच न करणें बरें. कलिंग देशाच्या या सम्राटानें इतकी परधर्मसहिष्णुता दाखविली तरी त्या देशांतील लोकांना ' वेदधर्म विनाशिका: ' अशी पदवी सादर करण्यास हिंदुधर्मीय मात्र चुकले नाहींत.

खारवेलचा काळ व शेवट

हत्तीगुंफामधील व स्वर्गापुरी-मंचपुरी येथील शिलालेखावरून इ. स. पूर्वी १३० वर्षापर्यंत खारवेलचा राज्यकाल होता असें निर्विवादपणें मानण्यांत येत आहे. प्राचीन कलिंग या पुस्तकांत असें लिहिलें आहे कीं, " राज्याभिषेकानंतर १३ वर्षे खारवेलनें युद्धें केलीं व त्यानंतर लढाई, राजकारण करून नंतर राज्याचा त्याग केला व जैनधर्मानुसार उर्वरित आयुष्य घालविलें. "

मौर्य चंद्रगुप्ताप्रमाणेंच स्वतःच्या बाहुबलावर सम्राट-चक्रवर्ती पदास पोंहोंचणारा हा दुसरा जैनधर्मीय सम्राट होऊन गेला. हिंदुधर्मीयांनीं एकटया चंद्रगुप्ताच्या कपाळावर शूद्रत्वाचा शिक्का मारून समाधान मानून घेतलें, तर अखिल कलिंग देशावर बहिष्कार पुकारून कलिंग देशच्या जैनराजाबद्दल त्यांनीं आपला द्वेष प्रदर्शित केला.

चंद्रगुप्त, अशोक, संप्रति व खारवेल हे अहिंसावादी राजे होऊन गेले. या काळास हिंदुस्थानचा सुवर्णयुग असें संबोधिलें जातें. यावरून जैन व बौद्ध अहिंसावादांत व त्यांच्या इतर तत्वांत गुलामगिरीचे अंकूर नसून, ते धर्म-स्वातंत्र्यपोषकच आहेत असें दिसून येईल.

गंग-राज्य वंश

यापूर्वीं मौर्य व कलिंग जैनवीरांचा अत्यंत त्रोटकसा वृत्तांत देऊन इ. स. पूर्व १६० वर्षापर्यंतच्या अहिंसावादी वीरांच्या शौर्यधैर्यादि, गुणांची, राजकारण व धर्मकारणाकरितां केलेल्या त्यागवृत्तीची जाणीव करून देण्याचा प्रयत्न केला आहे. अर्थातच जैनवीरांचीं आज उपलब्ध चरित्रें देणें हा प्रस्तुत पुस्तकाचा विषय नसून, जैनधर्मीय अहिंसावाद्यांना, योद्धे, राजकारणी होऊन नेटका संसार करितां येतो

हें अहिंसावादाचा तात्विकदृष्टयाच तेवढा विचार न करितां वीरमूर्तींच्या प्रत्यक्ष उदाहरणानें सिद्ध करण्याचा असल्यानें, त्या अनुरोधानेंच या चरित्रचित्राकडे पहावें. कोणतेहि चित्र रंगवितांना चितारी त्या चित्राची बाह्य रूपरेषा (Outlines) प्रथम आंखतो व तशी आंखणी झाल्यावर मग त्यांत इतर अवयव दाखवून रंग भरतो, तद्वतच हा प्रयत्न आहे.

गंगराज्यवंशाचा पूर्ववृत्तान्त.

सूर्यवंशीय इक्ष्वाकु धनंजय नांवाचा राजा व राणी गंधारदेवी यांचा पुत्र हरिश्चंद्र व हरिश्चंद्राची राणी रोहिणीदेवी-यांचा पुत्र भरत, या भरतराजाची स्त्री महादेवी गरोदर असतां गंगास्नानास गेल्यावेळीं गंगेतच तिला मुलगा झाला ह्मणून त्याचें नांव गंगदत्त असें ठेविलें. या गंगदत्ताचे वंशज गंगवंशी या नांवाबें ओळखिलें जाऊं लागलें. धनंजय, हरिश्चंद्र व भरत हे अयोध्येंस राज्य करीत होते.

या गंगवंशांतील राजा विष्णुगोप हा अहिक्षेत्र (संयुक्तप्रांत) येथें राज्य करीत असतां त्यास भागदत्त व श्रीदत्त असे दोन मुलगें झाले. भागदत्ताला कलिंग देशाचें राज्य मिळालें व त्यानंतरच्या राजांना कलिंगगंग असें संबोधण्यांत येऊं लागले. श्रीदत्त अहिलक्षेत्र येथेंच राज्य करूं लागला. श्रीदत्ताचे वंशांत पद्मनाभ या नांवाचा राजा होऊन गेला. राम व लक्ष्मण या नांवाचे त्यास दोन पुत्र झालें. राजकीय उलाढालीमुळें पद्मनाभाला आपल्या परिवारासह देशत्याग करावा लागला, परंतु ओळख पटून कुलक्षय होऊं नये म्हणून आपल्या या मुलांना ददिग व माधव ह्या नांवानें तो संबोधू लागला.

देशत्याग करून दक्षिणेंत आश्रयार्थ भटकत असतां जैनाचार्य सिंहनदींची व या बापलेकांची भेट झाली. आचार्यांनीं या उभयतां राजपुत्रांना केलेल्या उपदेशापैकीं प्रस्तुत विषयाशीं संबंध असणारा उपदेश हा कीं, " युद्धामध्यें विन्मुख होऊन पळून जाल तर तुमचा वंशक्षय होईल. " पराजित होऊन जिवंत राहण्यापेक्षां समरांगणावर

मृत्युलाहि कवटाळण्याबद्दल, जैनाचार्यांनीं केलेल्या या उपदेशाकडे वाचकांचें आम्ही मुद्दाम लक्ष्य वेधितों.

आचार्यांच्या आशिर्वादाच्या व प्रत्यक्ष मदतीच्या जोरावर दक्षिणेंत राज्य स्थापन करून कुवलाल–हल्लीचें कोलार (म्हैसूर) ही गंगराजांनीं आपली राजधानी केली. हा प्रसंग इ. स. १०३ च्या वर्षी घडला. या वंशांतील २३ व्या राजाच्या कारकिर्दीत इ. स. १००४ च्या सुमारास हें राज्य लयास गेलें.

म्हैसूर संस्थानांत हल्लीं **गंगदिकार** या नांवानें ओळखिले जाणारे जे लोक आहेत ते या राजवंशजापैकीं आहेत असें मानिलें जातें. या गंगवंशानें सुमारें ९०० वर्षें म्हैसूर प्रांतावर राज्य केलें, इतका दीर्घ-काळ राज्य करणारें हें एकच राजघराणें होय असें मानिल्यास तें खास चुकीचें होणार नाहीं.

शिलालेखादि साधनावरून गंगवंशीय कांहीं राजांचा कालनिर्णय करण्यांत आला आहे. तो या खालीं देऊन, नंतर या राजाच्या कारकि-र्दीतील वैयक्तिक व इतर गोष्टी दिल्या आहेत.

(१)	कोंगुणीवर्मा माधव	सन १०३
(२)	,, किरिया	
(३)	,, हरिवंश	२४७ तें २६६
(४)	,, विष्णुगोप	
(५)	,, तांदगळी	३५०
(६)	,, अवनीत	४२५ तें ४७८
(७)	.. दुर्विनीत	४७८ तें ५१३
(८)	,, मुश्कर अथवा मोक्कर	
(९)	,, श्री विक्रम	
(१०)	,, भूविक्रम श्री वल्लभ	६७९
(११)	,, शिवमार (प्रथम)	६७९ तें ७१३
(१२)	,, पृथ्वीपति अथवा मारसिंह	७१३ तें ७२९

(१३)	,, श्रीपुरुष अथवा परमांदी	७२६ तें ७७७
(१४)	,, शिवमार (द्वितीय)	७८० तें ८१४
(१५)	,, विजयादित्य	८१४ तें ८६९
(१६)	,, राचमल्ल सत्यवाक्य (प्रथम)	८६९ तें ८९३
(१७)	कोगुणीवर्मा नीतिमार्ग अथवा मरुळ नन्नियगंग	८९३ ते ९१५
(१८)	,, एरयप्पा-महेंद्रांतक	९२१ ते ९३०
(१९)	,, वट्टुग, गंग, गंगेय	९३० ते ९६३
(२०)	,, द्वितीय मारसिंह,-नीलंबकुलतिलक	९६३ ते ९७४
(२१)	,, राचमल्ल (द्वितीय)	९७४ ते ९९६
(२२)	,, गंगराज अथवा राक्षसगंग	९९६ ते १००४

राष्ट्रकूट राजाप्रमाणेंच गंगवंशीय राजे जिनधर्माचे निःसीम अनुयायी होते. सहधर्मीय म्हणून व इतर कारणामुळें या दोन्ही प्रबल राज्यघराण्यांत स्नेहसंबंध व सलोखा दीर्घकालीन होता. राष्ट्रकूट राजा तृतीय कृष्णराज याच्या बचावाकरितां गंगराज दुसरा मारसिंह यानें आपलें शक्तीसर्वस्व अनेकवार इरेला घातलें. गंगराज घराण्याची प्रथम राजधानी कुदलाल-हल्लींचें कोलार व नंतरचें तलकाड-तलकांड येथें हरिवंश राजानें नेली व तेथून तिचें श्रीपुरुषराजानें मान्यपुरास स्थलांतर केले. इ. सनाच्या ८ व्या शतकाअखेर या राजाची सतत भरभराट होऊन सातव्या शतकांत तें राज्य वैभवाच्या शिखरीं पोंहोंचलें होतें. गंगवंशीय राजा प्रथम राचमल्ल. (इ. स. ८६९ तें ८९३), राजा मारसिंह (इ. स. ९६३ तें ९७४) व राजा द्वितीय राचमल्ल (इ. स. ९७४ तें ९९६) यांच्या कारकिर्दींत या राजवंशानें फिरून आपलें गतवैभव मिळविलें, एवढेंच नाहीं तर गुजराथ व मथुरेवर स्वारी करून आपला दरारा व अंमल बसविला. उत्तरेप्रमाणें दक्षिणेंतहि विजय मिळविला. मारसिंह तर गुजराथचा राजा म्हणून प्रसिद्ध आहे. द्वितीय मारसिंह व द्वितीय राचमल्ल या दोघा वीरशाली राजांचा समर-केसरी व वीरवर राजा चामुंडराय हा सेनापती होऊन गेला. खारवेल यांस

हिंदी नेपोलियन मानल्यास सेनापती चामुंडरायास जर्मन सेनानी हिंडेनबुर्ग असें मानावें लागेल. राजा मारसिंहनें विंध्यावासी किरात राजांना पिटाळून लाविलें. मान्यखेट–हल्लीं मलखेड–येथील राजा कृष्णराज तृतीय याच्या सैन्याचें रक्षण केलें व कृष्णराजाचा शत्रू अल्लाह् यास धुळीस मिळविलें. या कृष्णराजाचा मुलगा इंद्रराज याला राज्याभिषेकहि राचमल्लनें केला. वनवासीच्या राजाला पकडून त्यास आपला मांडलिक बनविलें. मथुरेच्या राजांना शरण येण्यास भाग पाडिलें. नोलाव राज्य नष्ट केलें. या अचाट पराक्रमाबद्दल त्यास नोलाम्बकुलांतक असें संबोधिलें जातें. उच्छ्न्गीचा किल्ला हस्तगत केला. चालुक्य राजकुमार राजादित्य याचा पराभव केला. तापी, मान्यखेड, गोनूर वनवासी, उच्छ्न्गी व पामसी इत्यादि किल्ले आपले ताब्यांत घेतलें.

अनेक ठिकाणीं जिनमंदिरें बांधवून मानस्तंभ उभारलें. मरणापूर्वी श्रीअजितसेनाचार्य भट्टारकाकडून सल्लेखनाव्रत घेऊन बंकापूर (धारवाड) येथें समाधिमरण साधिलें.

या राजास खालील पदव्या दिल्याचे आढळून येत आहे, त्यावरून त्याच्या वीरादि सद्गुणांची कल्पना येईल. त्याः–गंगचूडामणि, नोलांबकुलांतक अगर नोलांबतंक, गुहियगंग चलदुत्तरंग मंडलीकत्रिनेत्र, गंगविद्याधर, गंगकंदर्प, गंगवज्र व गंगसिंह.

या वंशांतील प्रथम राजा माधव याचे मेघनंदी आचार्य हे गुरू होते. राजा अवनीत हा शघदिवाकर ग्रंथाचें कर्तें जैनाचार्य पूज्यपादस्वामी यांचा शिष्य होता. राजा मारसिंह द्वितीय यानें श्रीअजित सेनाचार्य भट्टारकाकरवीं सल्लेखनाव्रत घेतलें होते. राजा श्रीपुरुष यानें गजशस्त्र व राजा शिवमार यानें गजाष्टक नांवाचे ग्रंथ लिहिलें.

या राजवंशाचा वर जो त्रोटक वृत्तांत दिला आहे, त्यावरून या वंशांत वीरपुरुष, ग्रंथकार, व धर्मात्मे राजे होऊन गेले हें निर्विवाद सिद्ध होते. इ. स. १००४ मध्यें चोलवंशीय राजानें गंगराज्य बुडविलें; तथापि या काळानंतर गंगवंशीय राजांचा उल्लेख इ. सनाच्या १३ व्या शतकांच्या

अखेरपर्यंत पहावयास मिळतो. यावरून इ. सन १००४ नंतर गंगवंशीय राजांची स्वतंत्र राजांत गणना होत असावी व स्वतंत्र राज्य नष्ट झाल्यावर इतर निरनिराळ्या वेळीं व निरनिराळ्या राजांचे मांडलीक म्हणून ते राज्य करीत असावेत असें दिसते.

आतां गंगराज्यांतील सुप्रसिद्ध सेनानी, जिनभक्तवर, सुप्रसिद्ध ग्रंथकार व विद्वानांचा आश्रयदाता राजा चामुंडराय याच्या पुण्यमय व प्रातःस्मरणीय चरित्राकडें वळूं.



प्रकरण ५ वें.

समरकेसरी सेनापति चामुंडराय

ब्रम्हक्षत्र-कुलोत्पन्न वीरवर, कवीवर व धर्मवीर राजा चामुंडराय हा गंगवंशीय राजे मारसिंह व राचमल्ल यांचा मंत्रि व सेनापति होऊन गेला. यामुळें या दोघांहि राजांच्या कारकिर्दींत ज्या ज्या राजकीय व युद्धविषयक घडामोडी झाल्या त्यांत राजा चामुंडराय याचा प्रामुख्यानें संबंध येणें अपरिहार्यच होतें. मंत्रीपदावर आल्यानंतरचा त्याच्या आयुष्यांतील बहुतेक काळ रणक्षेत्रावर गेला. युद्धाची तयारी करणें, युद्ध करणें, युद्धानंतर युद्धांत मिळविलेल्या देशांची व्यवस्था करून तेथें शांतता, सुव्यवस्था राखणें वगैरे जबाबदारीचीं कामें मंत्री व सेनापति म्हणून राजा चामुंडराय यासच करावी लागत. अशा धामधुमीच्या काळांतहि त्यानें ग्रंथरचना केली, जिनमंदिरें बांधविलीं व श्रवणबेळगोळ येथील अद्वितीय, प्रचंड व मनोज्ञ अशी बाहुबली स्वामीची मूर्ती खोदविली. जगदोद्धारक आदि तीर्थंकर भगवान् ऋषभनाथाचे बाहुबली हे चिरंजीव व प्रथम 'चक्रवर्ती भरत' यांचें बंधू होत. भरतास मल्लयुद्ध, नेत्रयुद्ध व गदायुद्धांत श्री० बाहुबलीनें जिंकिलें होतें, यावरून श्री. बाहुबलीच्या शौर्याची, सामर्थ्याची व वीरत्वाची कल्पना येईल. भरत चक्रवर्तीच्या देशासच भारतवर्ष ही संज्ञा प्राप्त झाली आहे. वीरोपासक चामुंडरायानें वीरवर बाहुबलीचें चरित्र आपल्यापुढें ठेविलें असल्यास नवल नाहीं, ' गुणीगुणंवेत्ति ' हेंच खरें. ह्या सर्व गोष्टी लक्षांत घेतां श्री बाहुबलीचें स्मारक श्री चामुंडरायनेंच केलें हें योग्यच आहे.

राजा चामुंडराय हा श्रीभट्टारक अजित सेनाचार्य व सिद्धांत चक्रवर्ती श्री० नेमिचंद्राचार्य यांचा शिष्यवर असून, सुप्रसिद्ध कन्नडकवी व कविच-क्रवर्ती रन्न याचा आश्रयदाता व हितचिंतक होता. राजा चामुन्डरायानें 'चामुन्डरायपुराण' या नांवाचा चोवीस तीर्थंकर स्तुतिपर ग्रंथ कन्नड भाषेंत लिहिलेला उपलब्ध असून कन्नड वाङमयांत या ग्रंथास दिलेलें उच्चस्थान अद्याप अढळ आहे. चामुंडरायास मिळालेल्या अनेक पदव्यांत सत्यनिष्ठेबद्दल त्यास 'सत्ययुधिष्ठर' ही पदवी प्राप्त झाली होती, याचेंहि वाचकांना विस्मरण होणार नाहीं. राजकारण करितांना व इतर अशाच कार्यांत अगर थट्टामस्करींतहि सत्ययुधिष्ठर चामुंडराय असत्य बोलत नसे. राज-सेवा व जनसेवा करून त्यानें पुण्यसंचय केला व इहलौकिकहित साधिलें; पारलौकिक हित साधण्यासाठीं श्रीभद्रबाहुबली स्वामीची मूर्ती निर्माण केली व अखेर अतुल वैभवाचा व संसाराचा त्याग करून सल्लेखन-व्रत आचरून सद्‌गति मिळविली.

सेनापति चामुंडराय यास मिळालेल्या पदव्या व त्या मिळतांना त्याजकडून झालेली कामगिरी याचा वृतांत दिल्यानें त्याचें चरित्रसार मिळेल म्हणून त्या खालीं दिल्या आहेत.

१ समरधुरंधर-पाताल देवाचा कनिष्ट बंधू वज्जल देव याचा पराभव केल्यामुळें चामुंडराय 'समर धुरंधर' झाला.

२ वीरमार्तंड-कोलंब युद्धांत यश मिळविल्यानें ही पदवी दिली गेली.

३ रणराजसिंह-उच्छृन्ग किल्ला हस्तगत करितांना राजा राजा-दित्य याच्याशीं जें भीषण युद्ध केलें, त्या युद्धाच्या स्मरणार्थ ही पदवी अर्पण झाली.

४ वैरीकुलकालादंड:-बागुरचा किल्ला सर करून त्रिभुवनवीरास यमसदनीं पाठविल्यानें हा बहुमान मिळाला.

५ भुजमार्तंड:-वास, सीवर व कुनकादि राजांचा युद्धांत पराभव केल्याचें निदर्शक ही पदवी आहे.

६ समरपरशुराम-चलदंगगंग, गंगभट्ट व मुद्राचय वगैरेंची रणक्षेत्रांत मुंडकी उडविल्याबद्दल ही पदवी प्राप्त झाली.

७ सत्ययुधिष्ठरः- सत्य व एकवचनी हे गुणदर्शक.

८ राजाः- श्री भद्रबाहु बाहुबलीची अद्वितीय मूर्ती निर्माण केल्याबद्दल व दानख्यातिबद्दल.

सारांश, जैनधर्मीयांतील चामुंडराय हा महान पराक्रमी सेनापति दक्षमंत्री, कुशल राजकारणी, उत्कृष्ट ग्रंथकार, वाङ्मय व वाङ्मयोपासकांचा आश्रयदाता, व्रती व धर्मात्मा होऊन गेला.

आतांपर्यंत मौर्यकुलोत्पन्न चंद्रगुप्त, संप्रति, कलिंगदेशाधीश चक्रवर्ती खारवेल, गंगवंशीय राजा मारसिंह, राचमल्लादि वीर व वीर केसरी चामुंडराय यांचा परिचय करून दिला आहे. हे सर्व अहिंसावादी व जिनधर्मभक्तपरायण होते. या वीरशिरोमणींनीं शत्रूंचें निर्दालन केलें होतेंच, परंतु त्यांचें चरित्रवर्णन वाचून जैनधर्मीय-अहिंसा वादावरील आक्षेपकांच्या आक्षेपांचें खंडन होणार नाहीं काय ?

होयसल राज्यांतील जैनवीर सेनापति गंगराज

होयसालवंशीय राज्यघराणें इ. सनाच्या ११ व्या शतकांत अत्यंत प्रबल होतें. या घराण्यांतील राजा विष्णुवर्धन हा अत्यंत शूर, राजकारणीं व प्रभावशाली राजा होऊन गेला. यानें आपल्या राज्याचा अनेकपटीनें विस्तार केला. व चोलराजांनीं गंगवंशीयांकडून हिरावून घेतलेलें राज्य चोलाकडून जिंकून घेऊन आपल्या राज्यास जोडिलें. आमचा चरित्रनायक **गंगराज** हा या विष्णुवर्धन नरेशाचा सुप्रसिद्ध सेनापति व मंत्री होता. या राजाप्रधानांची जी काव्यमय माहिती देण्यांत आली आहे, त्यावरून दोघांच्याहि योग्यतेची खरीखुरी कल्पना येणार आहे, ' ज्याप्रमाणें इंद्राला वज्राचें, बलरामाला नांगराच, विष्णुला चक्राचें, शक्तिधर अर्जुनाला गांडीव धनुष्याचें सहाय्य, त्याचप्रमाणें विष्णुवर्धन राजाला सेनापति व मंत्री गंगराज याचें सहाय्य होत असें. या काव्यमय तुलनेखेरीज, वीरकेसरी चामुंडराय यास जशा गुणनिदर्शक

अनेक पदव्या मिळाल्या होत्या, त्याहूनहि संख्येनें अधिक व अधिक योग्यतेच्या पदव्या समरधुरंधर गंगराज यास त्याच्या बहुविध गुणावर लुब्ध होऊन अर्पण करण्यांत आल्या होत्या. यावरून वीरकेसरी चामुंडराय पेक्षांहि समरधुरंधर गंगराज यांचें चरित्र अधिक तेजस्वी व ओजस्वी होतें असें दिसतें. गंगराजाच्या पित्याचें नांव बुधमित्र असून तो कौंडिन्य-गोत्रीय असून जैन मूलसंघाचा उपासक व प्रभावक होता.

समाधिगण पंचमहाशब्द, महासामन्ताधिपति, महाप्रचंडनायक, वैरिभयदायक, गोत्रपवित्र, बुधजनमित्र, श्रीजैनधर्मामृतांबुधिप्रवर्द्धन सुधाकर, सम्यक्त्वरत्नाकर, आहारभयभैषज्यशास्त्रदाव विनोद, भव्यजन हृदयप्रमोद, विष्णुभुवर्द्धन भूपाल होयसल महाराजराज्याभिषेक पूर्णकुंभ, धर्महर्म्यौ-धरण मूलस्थंभ इत्यादि इत्यादि. यावरून या पराक्रमी, धर्मनिष्ठ व विद्वान सेनापतीची योग्यता केवढी होती हे कळून येईल. अशा धर्मवीराचें व कर्मवीराचें चरित्र प्रस्तुत पुस्तकांत यापेक्षां अधिक विस्तारपूर्वक देणें शक्य नाहीं याबद्दल खेद होत आहे.

गंगराजाचा स्वामी विष्णुवर्धन यास मिळालेल्या पदव्यांचा उल्लेख केल्यानेंहि अंगीकृत कार्यभाग उरकणार आहे, विष्णुवर्धनाच्या पदव्या पुढीलप्रमाणें आहेत:-

महामंडलेश्वर, समाधिगत पंचमहाशब्द, त्रिभुवनमल्ल द्वारावतीपुरवराधीश्वर, सम्यकत्वचूडामणी, भुजबल, वीरांगद इत्यादि. वर उल्लेखिलेल्या पदव्याखेरीज या राजाच्या पराक्रम व विजयसूचक अनेक दुसऱ्याहि पदव्या आहेत. बंकापूर जि. धारवाड येथें इ. स. ११४२ मध्यें राजा विष्णुवर्धन सल्लेखनाव्रत घेऊन मरण पावला.

उत्तम हुल्लादि जैन वीर.

या घराण्यांतील राजा नरसिंहदेव याचा सेनापति व मंत्री वीरहुल्लराज हा फार प्रसिद्ध होऊन गेला. शिलालेखांतून दिलेल्या माहितीवरून धर्मप्रभावनेच्या कार्यांत सेनापती गंगराज याच्यापेक्षांहि वीर हुल्लराज यास श्रेष्ठत्व दिलें जातें व यामुळेंच त्यास 'उत्तम हुल्ल' असें संबो-

धण्यांत येतें. राजनीति शास्त्रांत बृहस्पती व राज्यप्रबंधांत योगंधरायण यांच्यापेक्षां वीर हुल्ल सरस होऊन गेला असें वर्णिलें आहे. बल्लाळ नरेशाचा सेनापती रेचिमय्य हाहि जैनधर्मीयच होता. गंगराज, हुल्ल, रेचिमय याखेरीज या राज्यघराण्याची व जैनधर्माची सेवा करून राज्य-विस्तार व धर्मप्रसार करणारे राचरस, भद्रादित्य, भरत, मरयिने वगैरे जीं अनेक वीररत्नें होऊन गेलीं, त्यांच्या नांवाचा प्रस्तुतप्रसंगी ओझरता उल्लेख करूनच समाधान मानणें भाग आहे.

विजयनगर राज्यांतील जैनवीर.

होयसल राजघराण्याचा शेवट इ. स. १३२६ मध्यें मुसलमानांनीं केला असा एक इतिहास आहे; परंतु The Historical Inscriptions of South India ' या पुस्तकांत होयसलराजाची जी वंशावळ दिली आहे, त्यावरून या घराण्यांतील राजा तिसरा बल्लाळ यास घियासुद्दिन यानें ८।९।१३४२ रोजीं हालहाल करून ठार मारिल्याचा वृत्तांत दिला आहे. मरणसमयीं हा बल्लाळ ८० वर्षांचा होता. राज्य-नष्टता व वध या दोन्ही बाबतींत १६ वर्षांच्या काळाचें अंतर असणें अशक्य नाहीं. वरील पुस्तकांत चौथ्या बल्लाळ राजाचा इ. स. १३४३ हा राज्याभिषेक काल म्हणून देऊन विजयनगर राजांनीं त्याचें राज्य, आपल्या राज्यास जोडिलें असें कथन केलें आहे. यावरून १३४२ नंतरहि कांहीं दिवस निदान थोडया मुलखावर तरीं होयसालांची राज्यसत्ता चालत असावी असें मानण्यास हरकत नाहीं. (पहा पान ३५१-५२)

मुसलमानांच्या या आक्रमणामुळें दक्षिण हिंदुस्थानांत एकच खळबळ माजून राहिली व मुसलमानांच्या राज्यक्रांतीबरोबरच दाक्षि-णात्यांच्या विचारांत क्रांति झाली. विजयनगरच्या साम्राज्याची स्थापना हें विचारक्रांतीचें नंतरचें फळ होय. सर्व जातीच्या व धर्माच्या, सर्व वर्णाच्या व संस्काराच्या हिंदी लोकांत संघटना होऊन ऐक्याच्या साम-र्थ्याचा एकजीव करून मुसलमानांना विरोध केल्याविना धर्मस्वातंत्र्य व देशस्वातंत्र्य लाभणें अशक्य आहे, अशी खात्री पटल्यामुळें हें

साम्राज्य स्थापन करण्यांत जरी ब्राम्हणांचें पुढारीपण होतें, तरी सामर्थ्यवान जैनसमाजाला दुखविणें अगर या नव्या राज्याच्या राज्य-कारभारांत त्यांना वगळणें शक्य व इष्टहि नव्हतें. राजकारणाचा भाग म्हणून असो, वा त्या कालापूर्वी वैभवशिखरावरून अस्ताचलाकडे झुकलेल्या जैनधर्माच्या प्रभावाचा जनतेच्या मनावरील पगडा नष्ट झालेला नव्हता म्हणून असो, अगर सर्व धर्माकडे राजांची दृष्टी सम असावी लागते म्हणून म्हणा; कोणत्या कां कारणांनीं होईना या नव्या राज्याच्या राजांनीं जैनधर्माकडे सहानुभूतीनें पाहिलें. राजकुमार **उग्र** यानें तर जैनधर्माचा उघड स्वीकारहि केला होता असें इतिहास सांगतो. इतके सांगितल्यावर आतां मूळ कथानकाकडे-या साम्राज्यां-तील-जैनवीरांकडे वळूं.

बैचप्प हे दुसरे जैनधर्मीय सेनापति होते. सेनापति इरुगप्प हा बैचप्पाचा मुलगा. बैचप्पा हा हरिहर व बुक्क या दोन राजांचा मंत्री व सेनापति होता.

इरुगप्प दुसऱ्या हरिहर राजाचा पराक्रमी सेनापति होता. जैनधर्म-प्रभावनेसाठीं यानें अनंत श्रमसायास घेतलें.

सेनापति बैचप्पाचा मुलगा इरुगप्प यास बापानंतर सेनापतीपद मिळालें. दुसऱ्या हरिहरच्या वेळीं हा मंत्री व सेनापति होता. यावरून या नव्या राज्याच्या स्थापनकालीं व राज्यांच्या तीन पिढ्यांत सेनापतीच्या जबाबदारीचें श्रेय जैनधर्मीयांच्या पदरीं होतें. विजयनगर साम्राज्य स्थापून तें स्थिर, वीर्यशाली व बलवान् करण्यास जैनधर्मीय सेनापतींचा पराक्रम स्वदेश व स्वातंत्र्यप्रेमच कारणीभूत झालें.

सेनापति बैचप्पा हा ता. २९।१०।१३८० रोजीं लढाईत कामास आला व त्यानंतर इरुगप्प हा विजयनगर राज्याचा सेनापति झाला. यावरून इ. सनाच्या १५ व्या शतकाच्या सुरवातीपर्यंत तरी विजयनग-रच्या विजयी सैन्याची सूत्रें अहिंसावादी जैनांच्या हातीं होती असा इतिहास आहे. सेनापति इरुगप्पाच्या मरणाचा काळ उपलब्ध झालेला

नाहीं. जैनधर्मीयांच्या हातून दुसऱ्या धर्मीयांच्या हातीं सेनापतीपद गेल्यानें तर इ. स. १५६५ मध्यें तालीकोटच्या लढाईंत विजयश्रीनें मुसलमानांच्या गळयांत माळ घातली नसेल ना? अहिंसावादाच्या आक्षेपकांनीं याचें उत्तर शोधावें ?

कोंकण-युद्धांत बैचप्पानें खरीखुरी मर्दुमकी गाजविली व त्या युद्धांतच त्याचें देहवसान झालें. जैनवीर व सेनापति बैचप्पाबद्दल गोंत्रे प्रांतांत मिळालेला वीरगलावरील लेख वाचून एका थोर इंग्लिश गृहस्थानें काढलेलें सहजोद्गार मननीय आहेत. 'समरभूमीवर वीरोचित मृत्यूचा लाभ झाल्यानें बैचप्पानें स्वर्ग व जिनपाद समीप केलें,' अशा अर्थाचा हा लेख आहे. बैचप्पा जैनधर्मानुयायी होता व त्यानें या लढाईंत शेंकडों लोकांना कंठस्नान घातलें होतें. जैनधर्मीयांचें हें कृत्य धर्मबाह्य होय अशी या साहेबमजकुरांची समजूत असल्यामुळे ते म्हणतातः– An extraordinary reward indeed for a Jain, who is said to have sent many of the Kokanigas to destruction." बैचप्पानें लढविलेल्या या लढाईचा परिणाम मात्र असा झाला कीं त्या देशांत मुसलमानांची सत्ता स्थिर अशी कधींच झाली नाहीं. सेनापति बैचप्पा हा २९।१०।१३८० इ. रोजीं मरण पावला.

विजयनगर राज्यसंस्थापक हरिहर (पहिला) व त्याच्या नंतरचे विजयनगरचे राजे यांना मुसलमानी सत्तेस विरोध करण्याच्या कामीं सर्व प्रकारें जैनधर्मीयांची मदत झाली. होयसल घराण्याची प्रेरणा व सहानुभूति या नव्या राज्यस्थापनेच्या मुळाशीं असल्यानें हरिहर यास आपली सत्ता वाढविणें सहजसाध्य झालें.

२३० वर्षांच्या कालानंतर विजयनगरचें साम्राज्य नष्ट झालें; तथापि विजयनगर साम्राज्याखालीं असलेले सर्व राजे, सरदार व मांडलिक यांनीं मुसलमानांचें आधिपत्य तत्क्षणीं पत्करिलें अगर त्यांचीहि राज्यें नष्ट झाली असें मात्र झालें नाहीं. विजयनगर साम्राज्यांतील जैनराजे स्वतंत्रपणें आपापल्या राज्याचा कारभार पाहूं लागले. तुळुवदेशांत

अशा राजांची संख्या अधिक होती. त्यांत कारकळचे भैरसू, ओडियार, मूडबिद्रीचे चौटर, नंदावरचे बंगर, अल्दनगडीचे अल्दर, सावनतूर व भुतार वगैरे ठिकाणचे लहानमोठे जैन राजे व मांडलिक स्वतंत्र राजे झाले.

राष्ट्रकूट राज्यघराण्यांतील जैनवीर राजा अमोघवर्ष

इ. स, ७५० च्या सुमारास राष्ट्रकूट राज्य स्थापन होऊन तें इ. स. ९७३ पर्यंत भरभराटींत होतें. हें राजघराणें जैनधर्मी होते, निदान त्यांतील कांहीं राजे तर निस्सीम जिनभक्त होते हे निर्विवाद आहे. अशापैकींच एका वीरवराचा परिचय करून देण्याचा आहे.

राष्ट्रकूट राजा गोविंद याचा तिसरा मुलगा अमोघवर्ष हा आपल्या बापाच्या पश्चात् सिंहासनारूढ झाला व त्यानें बहुत वर्षे राज्य केलें. सिंहासनारूढ झाल्यानंतर ५२ व्या वर्षांतील एक शिलालेख उपलब्ध झाला आहे. त्यांत या ५२ वर्षांच्या कारकीर्दीत अंग, वंग, मगध, मालवा, चित्रकूट व वेंगी देशांचे राजे अमोघवर्ष राजाची सेवा करीत होते असा उल्लेख आहे ; अर्थातच वरील देशांच्या राजांनीं अमोघवर्षाचें मांडलिकत्व मान्य केलें होतें असें दिसतें. हा शिलालेख इ. स. ८६६ मधील आहे. अमोघवर्षाची कारकीर्द जितक्या दीर्घ कालाची आहे. तितकीच ती राजकीय व युद्धविषयक घडामोडींनीं भरलेली आहे. या राज्याच्या कालांतील दानविषयक जितके शिलालेख व ताम्रपट मिळाले आहेत तितके शिलादिलेख इतर कोणत्याहि राजाचे अगर राज्यघराण्याचे अद्याप उपलब्ध झालेले नाहींत. या दानपत्रावरून राष्ट्रकूट राजांनीं जिनधर्मप्रभावनेसाठीं अनेक देणग्या दिल्याचें दाखलें मिळतात. यावरून हें राजघराणें जैनधर्मीयच होतें असें ठरते.

अमोघवर्षाचे गुरु

राजा अमोघवर्ष याचे गुरु महापुराणाचे कर्ते श्री जिनसेनाचार्य हे होत. श्रीगुणभद्रसूरि आपल्या उत्तरपुराणांत (महापुराणाचा उत्त-रार्ध) म्हणतात कीं:–' श्री जिनसेनाचार्य हे अमोघवर्ष राजाला पूज्य व मंगल होते. ' यावरून राजा अमोघवर्ष हा दिगंबर जैनमतानु–

यायी होता हें दिसून येईल.

मि. विन्सेंट स्मिथ आपल्या सुप्रसिद्ध इतिहासांत लिहितात कीं:--'राजा अमोघवर्ष हा दिगंबर जैनधर्माचा निस्सीम भक्त होता. वृद्धावस्थेंत राज्यपदाचा त्याग करून त्यानें जैनसाधूचें व्रताचरण केलें. यानें इ. स.८१५तें इ. स. ८७७ पर्यंत म्हणजे ६२ वर्षें राज्य केलें. वेंगी राजांशीं लढण्यांतच याची अनेक वर्षें गेलीं.' राजा अमोघनें नाशिकहून मान्यखेड ('मलखेड, निजाम संस्थान) येथें आपली राजधानी नेली. या राजवटींत जिनसेन, गुणभद्रादी आचार्य व प्रसिद्ध पंडीत उदयास येण्याचें एक प्रमुख कारण म्हणजे या घराण्याचा जैनधर्मीयांना असलेला आश्रय हेच होय.

रत्नमालिका या नांवाचा उपदेशपर संस्कृत ग्रंथ व कविराजमार्ग नांवाचा अलंकारशास्त्रावरील कन्नड ग्रंथ असे दोन ग्रंथ राजा अमोघवर्षानें लिहिलें आहेत. रत्नमालिकेंत आपल्या स्वत:संबंधीं उल्लेख करितांना राजा अमोघवर्ष म्हणतो:--

विवेकात्यक्त राज्येन राज्ञेयं रत्नमालिका ।
रचिताऽमोघवर्षेण सुधियां सदलंगकृति ॥

राजा अमोघचे हे दोन्ही ग्रंथ हल्लीं उपलब्ध आहेत. जैनाचार्य-रचित तामीळ भाषेंतील कुरल ग्रंथावर इतर धर्मीय आपला वारसा व मालकी हक्क सांगतात; तद्वतच रत्नमालिका या ग्रंथाचें कर्तृत्व कोणी शंकराचार्या-कडे देतात, तर श्वेतांबरपंथीय आपल्या आचार्याकडे घेतात. श्री जिनसेन-चरित्र उत्तरपुराण व पार्श्वाभ्युदय काव्य वगैरेंवरून राजा अमोघवर्ष हा दिगंबर आम्नायी होता हें निर्विवाद होय.

एका अरब व्यापाऱ्यानें इ. स. ८५२ मध्यें लिहिलेल्या एका पुस्त-कांत-प्रवासवृत्तांत-जगांतील चार बड्या राजांचा उल्लेख केला असून त्यांत हिंदुस्थानच्या एका राजाचें वर्णन दिलें आहे. इ. स. ८५२ च्या सुमा-रास हिंदुस्थानांतील ज्या राजाच्या वैभवाचें त्यांत वर्णन आहे तें राजा अमोघवर्षाच्या वैभवाशीं जुळतें व जमतें आहे. यावरून अमोघवर्षाच्या वैभवाची व मोठेपणाची कल्पना येईल.

सारांश, यापूर्वी वर्णिलेल्या वीरवराप्रमाणें राजा अमोघवर्ष हा जैनधर्मीय असूनहि त्यास पराक्रमी व वीरशाली राजा होतां आले. कन्नड व संस्कृत या दोन्ही भाषेवर त्याचें उत्कृष्ट प्रभुत्व होतें. पारलौकिक हितासाठीं राज्यत्याग करून संन्यासवृत्तीनें राहून त्यानें आपणास सद्गतीस पात्र करून घेतलें. ज्या जैनधर्मांत अशीं नररत्नें उत्पन्न झालीं, त्या अहिंसावादी जैनधर्मानें हिंदुस्थानला स्त्रैण बनविलें असें म्हणणाऱ्यांची मूर्खांतच गणना केली पाहिजे.

अमोघवर्षानंतरचा कृष्णराज (द्वितीय) हा मोठा पराक्रमी राजा होऊन गेला. या कृष्णराजानंतरचा इंद्र (तृतीय) यानें कनोजवर स्वारी करून तेथील राजाला कांहीं काळ पदच्युत केलें होतें. कृष्णराज (तृतीय) हाहि प्रबल व बलाढ्य राजा होऊन गेला. इ. स. ९४९ सालीं यानें राजादित्य चोळ यास लढाईंत धुळीस मिळविलें. या कृष्णराजाच्या काळीं पुष्पदन्त, सोमदेव व इंद्रनंदी वगैरे आचार्य होऊन गेले. गंगवंशीय राजांवर आलेल्या संकटाचें परिमार्जन करण्यासाठींच राष्ट्रकूट नरेशांना अनेक वेळां लढाया माराव्या लागल्या. गंगवंशीयांची माहिती देतांना या दोन राज्यघराण्यांतील स्नेहसंबंधाचा उल्लेख आला असल्याचें वाचकांच्या लक्षांत असेलच.

अकराव्या शतकाच्या सुरवातीसच हें राज्य लयास गेलें. या या दुःखद प्रसंगाचें स्मरण होऊन आचार्य पुष्पदंत यांनीं पुढील उद्गार काढिलें आहेतः-

दीनानाथधनं सदाबहुधनं प्रोत्फुल्लवल्लीवनम् ।
मान्याखेटपुरं पुरंदरपुरीलीलाहरं सुंदरम् ॥
धारानाथ नरेंद्र कोपशिखिना दग्धं विदग्धप्रियम् ।
क्वेदानीं वसतिं करिष्यति पुनः श्री पुष्पदन्तः कविः ॥

जैनकवी, आचार्य व पंडितादिकांना आश्रय देणाऱ्या जैनधर्मीय राजांचा राजाश्रय तुटल्यावर व आश्रेते राजे देशोधडीस लागल्यावर मी कवी यापुढें कोठें राहूं असें उद्गार पुष्पदंतांनीं काढिलें असल्यास

त्यांत नवल तें काय?

शिलाहार जैनराजे

शिलाहारवंशीय राजांनीं कोल्हापूर येथें राज्य केलें. ते कांहीं काळ चालुक्यांचे आश्रित असावेत असें दिसतें. कोंकणच्या शिलाहाराप्रमाणेंच यांच्या ध्वजावर सुवर्णगरुडच होता. कोल्हापुरचे शिलाहार राजे जैनधर्मीय होते असें ग्याझटिअरमध्ये प्रतिपादन केलें आहे. ते जैनधर्माचे अनन्य व निस्सीम भक्त होते. या वंशांतील राजा भोज (द्वितीय) व कळचुरी घराण्याचा राजा यांच्यांत घनघोर युद्ध झालें. बहामनी राज्याच्या स्थापनेनंतर हें राज्य लयास गेलें. कोल्हापूर, मिरज, शेडबाळ (जि० बेळगांव) या गांवीं या राजघराण्याचे शिलालेख मिळाले आहेत. इ. स. ११२३ व ११८८ सालीं लिहिलेल्या तेरदळ येथील शिलालेखावरून या शिलालेखकालीं (११२३) कोल्हापुरास निंबरस नांवाचा राजा राज्य करीत असून, तो चालुक्य राजा सहावा विक्रमादित्य याचा सामंत असावा असें दिसतें. निंबरसाचा समकालीन गोंकरस हा तेरदळ भागचा दंडनायक होता व सौन्दत्ति येथें दुसरा कार्तवीर्य हा चालुक्याचा महामंडलेश्वर म्हणून राज्य करीत होता. निंबरस, गोंकरस व कार्तवीर्य हे निस्सीम जिनभक्त होते हें तेरदळ येथील शिलालेखावरून स्पष्ट होत आहे. शिलाहार राजकालीन अनेक जिनमंदिरें कोल्हापुरास हल्लीं अस्तित्वांत आहेत.

पांड्यवंश

पांडयवंशज राजे जैनधर्मी होते. या वंशांतील चौथा राजा उग्रपेरुवलूटी यानें ग्रीक देशाचा बादशाहा ऑगस्टस् याच्या दरबारीं आपला वकील पाठविला होता. हा काळ इ. स. १२८ तें १४० च्या दरम्यानचा आहे. या वकीलाबरोबर जैनधर्माचा उपदेश करण्यासाठीं एक नग्न जैनमुनीहि गेले होते. याच घराण्याच्या उपशाखेंतील एक राजा भूतलपांडय (इ. स. १२५०) हा जैन होता. या शाखेंतील दुसरेहि राजे जैनधर्मी होते. वीरपांडय हा यांतील प्रसिद्ध राजा होऊन

गेला. श्रवणबेळगोल येथील श्री गोमटेशच्या मूर्तीसारखी दुसरी प्रचंड मूर्ति यानें इ. स. १४३१ मध्यें कारकळ येथें स्थापन केली. मदुरा येथीरा सर्वच पांड्यराजे जैनधर्मीयच होते, असें मात्र इतिहास ग्वाही देत नाहीं. मात्र या वंशांतील अनेक राजे जैनधर्मीय होते यांत शंका नाहीं.

चोल राजवंश.

या वंशाचे राजे आरंभी जैनधर्मीय होते. धर्मांतरानंतर यांतील कांहीं राजे जैनधर्माकडे सहानुभूतीनें पाहणारे होते. कुर्ग व म्हैसूरच्या मध्यवर्ती प्रदेशांत चंगलवंशीयांचें राज्य होतें व हे राजे चोलराजांचे मांडलिक असतांहि ते कट्टर जैनधर्मीय राहूं शकले. चोलराजांनीं केलेल्या अनेक लढायांत चंगलवंशीय राजांनीं भाग घेऊन वीरोचित युद्धें करून चोलवंशीय राजांची सत्ता वाढविण्यास प्रामुख्यानें मदत केली. चंगलवंशीय राजे हे चोलराजांचे महामंडलीक व मंडलेश्वर होते.

याशिवाय पल्लव, कलभ्र, सांतार वगैरे प्रसिद्ध राज्यघराणीं व धरणीकोटा, कारकाळ, मूडबिद्री, नंदावार, अल्दनगडी, मुल्की वगैरे ठिकाणचीं लहानमोठीं राज्यें व राजे जैनधर्मीय होते. दक्षिण हिंदुस्थानांतील अगदीं दक्षिणेकडच्या या राजवंशाखेरीज सौन्दत्ती, बेळगांव, रायबाग, तेरदळ, कोल्हापूर, कऱ्हाड वगैरे ठिकाणीं अनेक जैनराजांनीं राज्यें केलीं आहेत. चालुक्य, राष्ट्रकूट, कदंब, कलचुरी वगैरे राजघराणीं तर सुप्रसिद्धच आहेत. सन १९२२–२३ सालच्या एपिग्राफी रिपोर्टांत नमूद केलें आहे कीं, कांचींचे कांहीं पल्लव राजे, कांहीं पांड्य राजे, पश्चिम चालुक्य राजे, गंगवंशीय राजे व राष्ट्रकूट राजे निस्सीम जैनधर्मीय होते. प्रथम पुलकेशी, विजयादित्य व विक्रमादित्यादि पश्चिम-चालुक्य राजे प्रसिद्ध जैनधर्मी राजे होत. कलचूरी राजा विज्जल व पल्लव राजा महेंद्रवर्मा व कांहीं होयसल राजेहि जैन होते. इ. सनाच्या दुसऱ्या शतकापासून नंतर सुमारें १२००।१३०० वर्षांच्या काळांत दक्षिण हिंदुस्थानांत जैनधर्म, जैनराजे, जैनसेनापति, जैनपंडित, जैनवाङ्मय, जिनमं-

दिरें, जैनकलाकौशल्य यांची नौबत अखंड झडत होती. शैव, वीरशैव व वैष्णव यांनीं आपापल्यापरीं भल्याबुऱ्या मार्गाचें अवलंबन करून जैनसंस्कृती हाणून पाडून ती खणून काढण्याचा सतत प्रयत्न केला. परंतु एकट्या जैनधर्मानें सर्व दृष्टीनें सुमारें ६००।७०० वर्षें तरी मुळींच दाद दिली नाहीं. त्यानंतर म्हणजे इ. सनाच्या दहाव्या व अकराव्या शतकांत निरनिराळ्या ठिकाणीं त्यांना यश येऊं लागलें. जैनधर्माचा सूर्य अस्ताचलाकडे जसजसा वळूं लागला, तसतसा हिंदुस्थानच्या राजकीय क्षितिजावर मुसलमानांचा अर्धचंद्र झळकूं लागला. जैनधर्माचा दक्षिणेंतील राजकीय अस्तकाल व मुसलमानांचा उदयकाल ही दोन्ही एकसमयावच्छेदें करून पहावयास मिळतात. मुसलमानांच्या या उदयकाळापूर्वीं सुमारें दोनशें तीनशें वर्षें वनराजांची शिकार उठवून व त्याला अडचणीच्या जागीं गांठून जसें मारण्यांत येते, तसाच प्रकार जैनधर्मीयांच्या बाबतींत होत होता. खिडारांत गांठण्याच्या कामांत शैवांनीं, वीरशैवांनीं व वैष्णवांनीं किती व कोणत्या प्रमाणांत भाग घेतला होता याचें चित्र रेखाटण्याचा हा प्रस्तुत प्रसंग नव्हे. सांगण्याचा हेतू एवढाच कीं, शैव, वीरशैव, वैष्णव व जैन यांच्यामध्ये धर्म व राज्यसत्तेसाठीं चाललेल्या झगड्यामुळें दक्षिण हिंदुस्थानचा देह खिळखिळा झाला होता. आपसांतील यादवीमुळें दक्षिण हिंदुस्थान अशक्त, तेजोहिन व बलहीन झाला होता. अहिंसावादामुळें तो स्त्रैण बनला नव्हता अगर अहिंसावादामुळें स्वतःचें संरक्षण करण्यास तो निकामीं झाला नव्हता. 'जगत् दुःखं' या तत्वाचें अहोरात्र मनन करून संसार क्षणभंगुर आहे म्हणून मुसलमानांच्या हातीं सत्तेचें उदक सोडण्यास जैनधर्मीय तर कधींच तयार नव्हते. शैववैष्णवाशीं झुंजतांना जैनांना अहिंसावादाची आठवण झाली नव्हती अगर ऐहिक वैभव क्षणभंगुर म्हणून जैनांनीं आपल्या राज्याचें तर्पण शैववैष्णवांना केलें नव्हतें. मग ते मुसलमानांच्या हातावर त्याचें उदक सोडण्यास तरी कां तयार होतील?

पण विचार करितो कोण? जायबंदी व घायाळ झालेल्या वनरा-

जाच्या कराळ दाढेंत शिरून मशकानेंहि खुशाल गुंजारव करीत आपली आढचता मिरवावी असाच प्रकार जैनधर्माच्या बाबतींत हल्लीं होत आहे.

अहिंसावादी हिंदुस्थानला मांसाहारी मुसलमानांनीं चीत केलें हें वादासाठीं क्षणभर खरें मानिलें तरी मुसलमानांना इंग्रजांनीं कां जिंकावें? मुसलमान मांसाहारनिवृत्त थोडेंच होते? हिंदुस्थानला गिळंकृत करण्यासाठीं ग्रीक, फरेंच, पोर्तुगीज व डच लोकांनीं प्रयत्न केलें व या कार्यांत इंग्रजांनाच यश कां मिळालें? इंग्रजी सत्तेपूर्वीहि मराठेशाही, देवगिरीचे यादव व विजयनगरचे राजे यांचे मुसलमानांशीं झालेले झगडे हें कशाचें द्योतक? १७६१ च्या पानिपतच्या लढाईत मराठ्यांचा मोड झाला व अहमदशहा अबदाली विजयी झाला, याचेंहि कारण पेशवेसेनापती मांसाहारनिवृत्त होते असेंच म्हणण्यास रा. ब. वैद्य अगर ब्रम्हश्री दिवेकरशास्त्री तयार आहेत काय?

उत्तर हिंदुस्थानांतील जैनवीरांचा अल्पसा परिचय करून देण्यापूर्वी विजयनगरराज्य, गंगराज्य, कदंबराज्य व नालगोकंड राज्यांत ज्या वीरांगनांनीं राज्यकारभार करून तरवार गाजविली अशा ऐतिहासिक वीरमाता, वीरकन्या व वीरांगना यांच्या चरित्राविना या विषयाची पूर्तता होणार नाहीं, असें वाटल्यावरून तशीं कांहीं चरित्रें खालीं दिलीं आहेत.

(जैन स्त्री–वीर--रत्नें)

१ सवाई अहिल्याबाई.

जैनवीर सम्राट खारवेल याची अर्धांगी ही खरीखुरी अर्धांगी होती. वजिरी देशच्या क्षत्रिय राजाची ही राजकन्या. दिग्विजय करण्यास खारवेलनें सुरवात केल्यावर वजिरी देशावर स्वारी केली. त्या देशाचें सैन्य व खारवेल याचें सैन्य यांच्यामध्यें तुंबळ युद्ध झालें. राजकन्येनें या युद्धांत स्त्रियांची सेना उभारून खारवेलशीं झालेल्या घनघोर युद्धांत भाग घेतला. युद्धांत खारवेल विजयी

झाला. सलोख्याचा तह घडून आल्यानंतर, खारवेलचा या राज-कन्येशीं विवाह झाला. विवाहानंतरच्या खारवेलच्या राजकारणांत व धर्मकारणांत राणी प्रामुख्यानें भाग घेत असे. स्त्रीसैन्य उभारून पेशव्याशीं सामना करण्यास उद्युक्त झालेल्या पुण्यश्लोक अहल्याबाई होळकर इचे नांव सर्वश्रुत आहे. अहल्याबाईवर लढाईचा प्रत्यक्ष प्रसंग तरी आला नाहीं, परंतु खारवेलच्या राणीनें प्रत्यक्ष-रणक्षेत्रांत उडी घेतल्याचें ऐकून वाचकांना या सवाई अहल्याबाईबद्दल खास आदर वाटेल. अहल्याबाईप्रमाणेंच ही धर्मनिष्ठ व दानशूर होती असेंहि शिलालेखावरून सिद्ध होत आहे.

२ वीरांगना सावियव्वा

गंगराज्यांतील सरदार वायक याची कन्या व वीरवर लोकविद्याधर याची पत्नि सावियव्वा ही आपल्या पतिसमवेत लढाईवर जात असे. ही घोड्यावर बसण्यांत व तरवार चालविण्यांत कुशल होती. एकदां लढाई हातघाईवर आली असतां हिनें आपला घोडा शत्रूसैन्यांतील एका बड्या सरदाराच्या हत्तीवर घातला, विजयश्रीनें खैर केली. शत्रूंच्या घातूक भाल्याचा मारा सावियव्वेच्या मर्मस्थळीं लागला. या आघातानें तिला मूर्च्छा आली. मरणान्त श्री जिनेंद्रभगवंताचें नामस्मरण करीत तिनें इहलोकीची यात्रा सम्पविली. या अजरामर कृत्याचें स्मारक. श्रवण-बेलगोल येथील जिनमंदिरांतील एका शिलालेखांत खोदलेलें पहावयास मिळतें.

३ राणी भैरवदेवी

राणी भैरवदेवी ही विजयनगर राज्यांतील सरदार चप्पा याची मुलगी. विजयनगरचें साम्राज्य नष्ट झाल्यावर या बाईनें आपलें स्वतंत्र राज्य स्थापन केलें. या राज्यस्थापनेनंतर कित्येक वर्षें मातृ-प्रधान राज्य समजून स्त्रीवंशजांनीं राज्यकारभार केला. सतराव्या शतकाच्या सुरवातीस जरसप्पा येथें राणी भैरवदेवी राज्य करीत असता तिच्या राज्यावर वेदनूरचा राजा वेंकटप्प्या नायक ह्यानें स्वारी

केली. स्वदेशाचें संरक्षण करण्याकरितां झालेल्या लढाईंत राणी स्वतः भाग घेऊन मर्दुमकी गाजवीत असतां मारली गेली.

४ जक्कमव्वे (व्वा)

नालगोकंड देशाचा अधिकारी नागार्जुन याची वीरांगना जक्कम्मव्वे (व्वा) इच्याकडे, नागार्जुनाच्या पश्चात्त कदंबराज आकाळवर्ष यानें, नाळगोकंड देशाचा राज्यकारभार सोंपविला. नागार्जुन हा नाळगोकंड देशच्या सुभेदारीवर होता. आपल्या ताब्यांतील देशांत शांतता व सुव्यवस्थता ठेवण्याची जबाबदारी सुभेदारावर असते. जक्कमव्वाची वीरता व युद्धनैपुण्य जाणून आकाळवर्षानें ही जबाबदारीची जागा तिला दिली व तिनें ती जबाबदारी उत्तम रीतीनें अनेक वर्षें पार पाडली. आपला अंतःकाळ समीप आला आहे असें दिसतांच आपल्या मुलीकडे तिनें राज्यकारभार सोपविला व जैनतीर्थावर जाऊन तिनें इ. स. ८४० मध्यें समाधिमरण साधिलें. एका उपलब्ध शिलालेखांत ती वीर उत्तम युद्धशक्तियुक्ता व जिनेंद्र–शासनभक्ता होती, असें तिचें वर्णन दिलें आहे.

वर दिलेल्या चार वीरांगनांच्या चरित्रांपैकीं दोन चरित्रनायिकेंच्या घराण्यांत स्त्रियांनीं पिढ्यानपिढ्या राज्यकारभार केल्याचा वृत्तांत दिला आहे; बाकीच्या दोन स्त्रियांनीं मर्दाप्रमाणें लढाया मारिल्याचा वृत्तांत आहे. थोड्याशा परिश्रमांती, अशा अनेक जैनधर्मानुयायी अबलाहि सबला होत्या असा इतिहास मिळणें शक्य आहे.

विदेशी जैनवीर.

जैनधर्मप्रसारकांना हा भारतीय व तो विदेशी हा भेदभाव माहीत नव्हता. प्रत्येक मनुष्यमात्राला धर्मोपदेशक करून त्याचें आत्मबल वाढवून त्याच्या आत्म्याच्या कल्याणासाठीं कल्याणप्रद सुमार्गाला लावणें हें जैनधर्मीय उपदेशकांचें ध्येय होतें. विदेशी वीरांच्या मनावर अशा उपदेशाचा परिणाम झाल्याचीं कांहीं उदाहरणें आहेत, त्यापैकीं दोघा विदेशी वीरांची वाचकांना ओळख करून देत आहे.


बादशहा महेंद्र

बादशहा महेंद्र (Manander) नांवाचा एक नामांकित राजा होऊन गेला. हिंदुस्थान ही त्याची जन्मभूमी. हिंदी संस्कृतीचें ज्ञान त्यास होतें व जैनधर्मावर त्याची श्रद्धा होती. मथुरा, साकेत व माह्यमिका येथवर त्यानें आपल्या पराक्रमानें आपल्या राज्याचा विस्तार केला होता. आपला कुलधर्म सोडून तो जैनधर्मी झाला व नंतर जैनधर्म सोडून तो बौद्ध झाला असें मानिलें जातें.

नहपान

महेंद्राशिवाय जैनधर्माचा स्वीकार करणारा विदेशी क्षत्रिय वीर नहपान एक होय. उत्तरवयांत हा जैनमुनी झाला.. भूतबली या नांवानें त्यास जैनधर्मीय वाखाणूं लागलें. या भूतबलीनें अवशेष अंगज्ञानाचा उद्धार केला. या धर्मकार्यामुळें धार्मिक जैनइतिहासांत त्याच्या नांवाचा सादर उल्लेख केला असल्यास त्यांत नवल नाहीं. पश्चिमोत्तर भारत व माळवापर्यंत यानें आपल्या राज्याचा विस्तार केला होता.

विदेशीयांनीं हिंदभूमीवर जय मिळवून आपली सत्ता चालविली परंतु जैनधर्मानें या जेत्या लोकांचें मन हरण केलें ; हिंदूधर्माला तें श्रेय मिळवितां आलें नाहीं.



प्रकरण ६ वें.

अग्निकुलोत्पन्न जैनवीर

हिंदूधर्माच्या दृष्टीनें परमार, परिहार, चालुक्य अथवा सोळांकी व चव्हाण हे अग्निकुलोत्पन्नवंश होत. जैनधर्माच्या प्रसारास आळा घालण्यासाठीं ब्राह्मणांनीं अग्निकुल निर्माण केलें अशी पुराणांतरीची आख्यायिका आहे. अर्थातच हिंदुधर्म संरक्षणासाठीं व प्रसारकार्याच्या मदतीसाठीं या कुलांचें अस्तित्व मानण्यांत येऊं लागलें. हा काल सुमारें २६००।२७०० वर्षांपूर्वीचा म्हणजे भगवान पार्श्वनाथ तीर्थंकरांनीं जैनधर्माच्या केलेल्या प्रभावनेच्या वेळचा असावा असें मानण्यांत येते. कदाचित् भगवान पार्श्वनाथांनीं उपदेशिलेल्या धर्मास ज्यांनीं विरोध केला त्या विरोधाचें पारितोषक म्हणून ब्राम्हणांनीं या कुलांना उचलून धरून अग्निकुलोत्पन्न अशा मोठ्या नांवाखालीं त्यांना वाखाणण्यास सुरवात केली असावी. परंतु या विरोधी कुळांचा विरोध थोड्याच काळांत ओसरून त्यापैकीं परमार व सोळांकी कुलोत्पन्न लोकांनीं प्रथम जैनधर्माचा स्वीकार केला व नंतर इतर कुलांनीं थोड्याच दिवसांत त्यांचें अनुकरण केलें. अंतिम तीर्थंकरांच्या निर्वाणसमयीं हें अग्किुलोत्पन्न जैनधर्मी झालें होतें. जैनधर्मीय अहिंसातत्वाचा स्वीकार केल्यानें जर कोणी भित्रा, भीरू व अकर्मण्य होत असतां तर या रजपूत क्षत्रियांनीं आपला कुलधर्म सोडून जैनधर्माचा स्वीकार करितांना या अघोर परिणामाचा विचार केला नसतां काय ?

या रजपूत क्षत्रियांच्या धर्मपरिवर्तनानंतर थोड्याच वर्षांनीं

ड्यारिअस (Darius), शिकंदर, सेल्यूकस यांनीं हिंदुस्थानावर स्वाऱ्या केल्या व त्याप्रसंगीं झालेल्या दारुण युद्धांत याच धर्मांतरित जैन रजपुतांनीं मर्दुमकी गाजविली नाहीं काय ? शिकंदरादिकांच्या स्वाऱ्या व अंतिम तीर्थंकरांचा मोक्षकाल यांत फारच थोडे अंतर आहे. अर्थातच त्याकाळीं जैनधर्माला मालिन्य आलेलें नव्हतें. भगवान महावीर व महात्मा गौतमबुद्ध यांची शिकवण अगदीं ताजी होती. अशावेळीं झालेल्या परकीयांच्या स्वाऱ्या पाहून अहिंसावाद्यांनीं हिंदुस्थानच्या स्वातंत्र्याचें उदक स्वाऱ्या करणाऱ्यांच्या हातावर न सोडितां त्यांना चांगलाच हात दाखविला. परमार वंशांतील उत्पल राजानें जैनधर्माचा प्रथम स्वीकार केला व नंतर त्यावेळच्या इतर ३६ कुलांनीं ह्मणजे सव्वालाख लोकांनीं जैनधर्माचें अनुयायित्व पत्करिलें. ओसियानगर-हल्लीचें जोधपूर-येथें हा दीक्षा-विधी झाल्यानें या जैनधर्मीयांना पुढें ओसवाल जैन या नांवानें ओळ-ण्यांत येऊं लागलें. या ओसवाल जातींतच पुढें भामाशाह, आशाशाह, विमलशहा, वस्तुपाळ व तेजपालादि नररत्नें होऊन गेलीं. कासीमच्या पहिल्या स्वारीस प्रतिकार करण्यांत याच ओसवाल जातींतील ४० हजार पुरुषांनीं व १२ हजार स्त्रियांनीं खुशीनें आत्माहुती दिली.

परमार वंशजांनीं इ. सनाच्या दहाव्या शतकांत धारा येथें राज्य केलें. या राजांच्या कारकीर्दींत जैनधर्माची उन्नति झाली. प्रसिद्ध राजा भोज हा याच कुळांतील होता. राजा भोज विद्येचा जसा भोक्ता होता, तसाच तो पराक्रमीहि होता. या वंशांतील नरवर्मा नांवाचा राजाहि मोठा पराक्रमी होऊन गेला. राष्ट्रकूट राज्यास उतरती कळा याच धाराधीशांनीं आणिली. राष्ट्रकूट घराण्यासंबंधी माहिती देतांना एका जैनपंडितानें काढलेले उद्‌गार यापूर्वींच दिलें आहेत.

मेवाडोद्धारक भामाशाहा

मेवाडचा नरकेसरी महाराणा प्रताप याच्या विपत्तकालीं त्याला आपली गडगंज संपत्ती देऊन सैन्य उभारण्यास मदत करणारा भामाशाहा हा राणा प्रतापचा मंत्री असून तो धर्मानें जैन होता. मन, वचन व कायेनें

भामाशाहानें राणा प्रताप यास मदत केली व यामुळेंच भामाशाहास मेवाडचा उद्धारक असें संबोधण्यांत येते.

मेवाडच्या राण्याचे अनक सेनापति व मंत्री जैनधर्मीय होते. त्यापैकीं भामाशाहा याची मवाडोद्धारक म्हणून स्तुतिस्तोत्रें आजवर गायिलीं जातात.

मेवाडचा राणा कुळरक्षक आशाशाह

मेवाडचा राणा विक्रमाजित् याचा वध करूनहि बनबीरची रुधिर-तृष्णा शांत झाली नाहीं, म्हणूनच कीं काय कोण जाणे त्यानें या राजकुलाचा नष्टांश करण्याची प्रतिज्ञा केली. राणा विक्रमाजिताचा मुलगा उदयसिंह याचा प्राण वांचवून मेवाडच्या राजकुलाचा नष्टांश होऊं नयें म्हणून उदयसिंहाची दाई पन्ना हिनें आपल्या पोटचा गोळा राजपुत्र उदयसिंहाच्या-ऐवजीं बनबीरनें धाडलेल्या मारेकऱ्याच्या हातीं कसा बळी दिला वगैरे हकिगत सर्वश्रुत आहे. उदयसिंहाला बरोबर घेऊन आश्रयार्थ पन्नादाई दारोंदार हिंडली, परंतु बनबीराच्या घोर प्रतिज्ञेच्या भीतीनें कोणाकडूनहि पन्नादाईस आश्रय मिळेना. शेवटीं कमलनेरमध्यें राज्य करीत असलेल्या व वर उल्लेखिलेल्या आशाशाहकडे पन्नादाई आश्रययाचनेसाठीं गेली. आशाशाह आपल्या मातेसह असतां पन्नानें आशाशाहाची भेट घेऊन मेवाडचा प्राण-मेवाडचा बालराजा-उदयसिंह यास त्याचे मांडीवर घालून मेवाड-राणाकुलज्योत बालराजाचें संरक्षण करण्याची विनंति केली. आपल्या स्वामीचें संरक्षण करणें आपलें कर्तव्यकर्मच आहे व तसें करितांना कोणतेहि दुर्धर संकट ओढवलें तरी पर्वा करूं नकोस असें आशाशाहच्या मातेनें त्यास सांगितलें. मातेच्या मदतीमुळें उदयसिंहास आशाशाहनें आश्रय दिला म्हणूनच, आशाशाहास **मेवाड-राणाकुळरक्षक** या नांवानें ओळखितात.

गुजराथ-संरक्षक दानवीर वस्तुपाल व तेजपाल

इ. स. १२१९ तें १३०४ पर्यंत सोळंकी वंशांतील 'बघेल' या नांवाच्या एका शाखेनें गुजराथेंत राज्य केलें. या घराण्यांत वीरधवल नांवाचा महान पराक्रमी राजा होऊन गेला. या पराक्रमी राजाचा

सेनापति व मंत्री वस्तुपाळ हा युद्धनिपुण, राजकारणपटु, विद्याव्यासंगी, दानशूर व जिनधर्मभक्तपरायण म्हणून विख्यात आहे. तेजपाळ हा वस्तुपाळाचा भाऊ. वस्तुपाळ व तेजपाल म्हणजे रामलक्ष्मणाची जोडी. देव-गिरीचा यादव राजा सिंघण यानें गुजराथेवर स्वारी केली. परंतु वरील बंधूद्वयानें त्याचा पराभव केल्यामुळें गुजराथ जिकण्याची त्याची महत्वाकांक्षा लयाला गेली. संग्रामसिंहानें खंबायतेवर स्वारी केल्यावेळीं वस्तुपाल हा खंबायतचा सुभेदार होता. या दोघां बंधूनीं संग्रामसिंहाचा मोड करून रणभूमीवरून पळून जाण्यासहि त्यास अवसर मिळूं दिला नाहीं. दिल्लीचा बादशाहा अल्तमश यानें मेवाड सर केल्यावर मिळालेल्या विजयानें उन्मत्त होऊन गुजराथवर स्वारी कर-ण्याचा घाट घातला व तो सैन्यासह गुजराथवर चाल करून जाण्यास निघाला. राजकारणी वस्तुपालानें मुसलमानांना विरोध करण्यासाठीं इतरांशीं सख्य व ऐक्य घडवून आणिलें. आपला विरोधीपक्ष बलवान् झाल्याचें पाहून निराशेनें अल्तमश यास परत जावे लागले. वस्तुपाळाच्या कर्तबगारीनें यावेळीं गुजराथचें संरक्षण झालें. या बंधूद्वयांनीं गुजराथच्या सर्वांगिण सुधारणेसाठीं सडका, विहीरी व धर्मशाळा जागोजागीं बांधविल्या, देशांत शांतता व सुबत्ता प्रस्थापित केली, अनेक जिनमंदिरें बांधविलीं व अनेक जिनमंदिरांचा जीर्णोद्धार केला. अबू पहाडावरील जिनमंदिरें या बंधूंच्या कल्पकतेची, दानशूरत्वाची व धर्मभक्तीची साक्ष आजहि देत आहेत. सुप्रसिद्ध ताजमहाल व अबूपहाडावरील ही जिनमंदिरें यांची शिल्पकलेच्या दृष्टीनें तुलना करून त्यांत श्रेष्ठकनिष्ट अशी नंबरवारी लावणें शिल्पकलाविज्ञानांनाहि अशक्य झाले आहे. ताजमहालच्या पूर्ततेपूर्वी सुमारें दोनतीनशें वर्षे अगोदर या मंदिराची पूर्तता झाली आहे. संवत १२९५ मध्यें वस्तुपाळ व त्यानंतर तेजपाळ दिवंगत झाले.

चालुक्य-सोळंकी-जैनराजे.

या घराण्यांतील पुलकेशी-राजाने विजापूर जिल्ह्यांतील वातापि -हल्लीचें बदामी-गांवीं इ. स. ५५० च्या सुमारास आपली राजधानी

करून आसपासच्या मुलखावर आपली सत्ता प्रस्थापित केली. या घराण्यांतील कीर्तिवर्मा, मंगलीश, पुलकेशी (द्वितीय) वगैरे राजांनीं आपल्या राज्याचा बहुत विस्तार केला. द्वितीय पुलकेशी राजाचे कारकीर्दींत इ. स. ६३४ मध्यें लिहिलेला एक शिलालेख बदामी गांवापासून १४ मैलांवर असलेल्या ऐहोल गांवीं मिळाला आहे. या शिलालेखांतील वर्णित जिनमंदिर इ. स. ६३४ मध्यें बांधून पुरे झालें आहे. हें मंदीर व हा शिलालेख या भागांतील सर्वांत प्राचीन व महत्वपूर्ण आहे असें तज्ञांचें मत आहे.

इ. स. ६१७ च्या सुमारास या घराण्याचे पूर्व व पश्चिम चालुक्य असे दोन भाग झाले. दुसऱ्या पुलकेशीच्या मरणानंतर पल्लव राजाकडून पश्चिम चालुक्य राज्यास अत्यंत त्रास झाला व पल्लवांनीं या चालुक्याच्या राज्यांतील कांहीं भाग आपल्या ताब्यांतहि घेतला ; परंतु नंतरचा राजा विक्रमादित्य यानें आपला मुलूख परत मिळविला, एवढेंच नव्हे तर पांड्य, चोल, केरल, कलभ्र राजांवर जय मिळवून कांची येथील पल्लव राजांना शरण येण्यास भाग पाडिलें. पल्लव राजे हिंदूधर्मीय होते. पल्लव व चालुक्यामधील लढायांच्या मुळांशीं धर्मद्वेष होता असें समजलें जातें.

सोळंकी जैनवीर (गुजराथ)

गुजराथच्या सोळंकी राजापैकीं राजा मूलराज, सिद्धराज, जयसिंह वगैरे जैनधर्मी पराक्रमी राजे होऊन गेले. विशेषतः या घराण्यांतील **राजा कुमारपाल** अत्यंत प्रसिद्ध असा होऊन गेला. कुमारपालनें गुजराथेंत एक उत्कृष्ट व आदर्शनीय जैनराज्य बनवून जैनधर्माची अमूल्य सेवा केली. त्यानें इ. स. ११४३ तें ११७४ पर्यंत राज्य केलें. पं. गौरीशंकर ओझा या सुप्रसिद्ध इतिहासज्ञांच्या मतें राजा कुमारपाल हा महाप्रतापी व जिनधर्मपरायण राजा होऊन गेला. संवत १२०७ च्या एका शिलालेखांत कुमारपाल राजाच्या राज्यविस्ताराचें व त्यानें जिंकलेल्या लढायांचें जें वर्णन दिलें आहे, त्यावरून दक्षिणेकडे कोल्हापूर, उत्तरेस

काश्मीर, पूर्वेस मगध व पश्चिमेस सिंध व पंजाब या चतुःसीमेंतील राजेलोक कुमारपालाची आज्ञा शिरसावंद्य मानीत असत असें दिसते.

या राजाच्या राजधानींत १८०० कोटयाधीश होते असें वर्णन मिळत आहे. यावरून त्याच्या राज्यांतील संपत्ती व सौख्य यांची कल्पना येऊन त्या ठिकाणीं शांतता कशी नांदत होती हें दिसून येईल.

राजा कुमारपालनें जैनधर्मप्रभावनेसाठीं खर्चिलेल्या रकमेची जी माहिती दिली जाते, त्याचे आंकडे देऊन वाचकांना न शिणवितां त्यानें या कार्याकरितां पाण्यासारखा पैसा खर्च केला एवढें म्हटल्यास त्याच्या दानधर्माची वाचकांना यथार्थ कल्पना येईल असें आम्हांस वाटतें.

याशिवाय सम्राट विक्रमादित्य, आंध्रदेशीय वीर सम्राट सातकर्णि, गुप्तवंशीय राजा पुष्पमित्र, गुजराथचा वल्लभी राजा शिलादित्य, कलचुरी राजा बिज्जल, गुजराथचे कांहीं राष्ट्रकूट राजे, श्रावस्तीचा जैनवीर राजा सुद्ध्वज, परमारवंशीय राजा भोज, एलिचपुरचा जैनयोद्धा राजा ईल, नाडोलचा राजा अश्वराज, हस्तिकुंडीचे राजे विदग्धराज, व राजा धवल ; जैनवीर कक्कुक, बिकानेरचे दिवाण करमचंद, जोधपुरचें दिवाण कृष्णदासजी, जयपुरचे दिवाण अमरचंद, नगरकोटचें (पंजाब) दिवाण, जनरल इंद्रसेन वगैरे अनेक जिनानुयायांनीं वीरोचित पराक्रम करून आपल्या देशाचें व धर्माचें रक्षण केलें आहे. अशा वीरवरांच्या नांवाचा नुसता उल्लेख करावयाचा झाल्यास ह्याप्रकारचें स्वतंत्र पुस्तकहि अपुरेंच पडेल.

हिंदभूचा प्रत्येक अणुरेणु जैनवीरांच्या पादस्पर्शानें पुनीत झाला आहे. हिंदभूच्या व आपापल्या देशाच्या, राजाच्या व धर्माच्या संरक्षणाकरितां रक्ताचा सडा हिंदभूवर सांडून तिला बलवान व सामर्थ्यवान करण्याचें श्रेय हजारों जैनवीरांना आहे. शौर्यादि गुणाची संपत्ति ही कोणा विशिष्ट जातीची, धर्माची अगर राष्ट्राची संपत्ति नाहीं ; तसेंच भित्रेपणाचा मक्ता अगर सनदहि कोणा एका राष्ट्रास अगर समाजास कधीं देणगी म्हणून देण्यांत आलेली नाहीं. आतांपर्यंत दिलेल्या माहिती-

नंतरहि जैनधर्मीय अहिंसातत्वावर जे आक्षेप कोणी घेतील ते स्वतः भ्याड, संशयी अदूरदृष्टी, परम असहिष्णु असून आपल्यावरून जग ओळखतात असें म्हणावें लागेल.



प्रकरण ७ वें

हिंदुस्थानचा खरा उत्कर्ष व अपकर्ष काल

श्री दिवेकरशास्त्री यांनीं आपल्या पुस्तकास 'आर्य-संस्कृतीचा उत्कर्षापकर्ष' हेंच नांव सार्थ कां आहे हें सांगतांना **आर्य** म्हणजे कोण, त्यांची संस्कृति म्हणजे काय व उत्कर्ष आणि अपकर्ष यांची व्याख्या कोणती याबद्दल आपल्या पुस्तकाच्या पान २।३ व ४ वर खुलासा केला आहे. तो प्रस्तुत चर्चेच्या दृष्टीनें मान्य करून त्यांच्या आक्षेपांचा फोलपणा दाखविण्याचा ह्या ठिकाणीं प्रयत्न केला आहे, तो कितपत साध्य झाला आहे हें वाचकांनीं ठरवावें.

आर्यः—मानववंशशास्त्र व मस्तिष्कशास्त्रदृष्टचा विचार करून ज्ञात्यांनीं ज्या मानववंशाला 'आर्य वंश' असें मानिलें आहे, त्या वंशापैकीं आर्यावर्तांतील किंवा भरतखंडांतील मानववंश ; तथापि श्री० दिवेकर यांनीं द्रविडियन लोकांना वगळून आर्यसंस्कृतीचा व आर्यांचा तेवढाच विचार केला आहे असें मात्र नाहीं.

संस्कृतिः—म्हणजे 'मानवी मनावरील ठसे–मानवी मनावर जे ठसे उमटून भाषा, शास्त्र, शस्त्र, कला, कौशल्य, धर्म, समाज, इत्यादि सर्व मानवी घडामोडीमध्यें अनेक रूपानें परिस्फुट होतात, त्या सर्व ठशांना म्हणजे संस्कारसमुच्चयांना संस्कृति असें म्हणतां येईल.' तसेंच 'संस्कृति म्हणजे धर्म असेंहि म्हणतां येईल,' असें रा. दिवेकर लिहितात व पुढें म्हणतात कीं, 'आर्यसंस्कृतीचा

उत्कर्षापकर्ष याऐवजीं आर्यधर्माचा म्हणजे वैदिक धर्माचा उत्कर्षापक" असेंहि समजतां येईल.' (पहा पान ३) त्यांनीं आपल्या पुस्तकांत मात्र धर्माच्या उत्कर्षापकर्षाबरोबरच राजकीय व सामाजिक उत्कर्षापकर्षाचा विचार केला आहे. आणि उत्कर्ष-वैयक्तिक उत्कर्ष-या शब्दाचें प्रवचन करून व तें प्रवचन जरा सैल सोडून रा. दिवेकरांनीं समाजाकडें लाविलें आहे.

वैयक्तिक उत्कर्ष म्हणजे " कार्यक्षेत्र मिळून व्यक्तीच्या प्रज्ञा, पौरुष, पराक्रम, धैर्य, शील या गुणांची परिणती होणें, तत्वज्ञान, द्रव्य, उपभोग, संतति यांचा अनुभव त्या व्यक्तीला येणें व वैयक्तिक गुणांची कुचंबणा न होणें हा होय. "

" याच्या उलट ना विद्या, ना द्रव्य, ना संतति, ना समाधान, ना मान, अशा स्थितींत परावलंबी जिणें ज्या व्यक्तीला काढावें लागतें तो त्या व्यक्तीचा पूर्ण अपकर्ष होय. समाजाचा उत्कर्ष म्हणजे समाजाला चतुर्विध पुरुषार्थाची निष्प्रतिबंध प्राप्ती होणें हा होय. " (पहा पान ४) याप्रमाणें आर्य, संस्कृति व उत्कर्षापकर्ष यांची फोड करून या आर्य-संस्कृतीचा उत्कर्षकाल, स्थैर्यकाल व अपकर्षकाल कोणता व त्याचीं कारणें कोणतीं याचें विवेचन करितांना ' ख्रिस्तपूर्व चार हजार वर्षें तें ख्रिस्तपूर्व ८०० वर्षें-म्हणजे तीन हजार वर्षें आर्यसंस्कृति ही उत्कर्षाच्या उच्चस्थानी होती म्हणून हा काल उत्कर्षकाल होय,' असें ब्रम्हश्री म्हण-तात. ख्रिस्तपूर्व ८०० वर्षें व ख्रिस्तोत्तर ८०० वर्षें म्हणजे सुमारें दीड-हजार वर्षें ही **कांहींच्या** मतें उत्कर्षाचींच होत ; परंतु या दीडहजार वर्षांत अपकर्षाचींच बीजें रुजत होती, ' असें रा. दिवेकरांनीं आपलें निःशंक मत दिलें आहे. (पहा पान ५). याबद्दलचा आपला मत-भेद देतांना दिवेकर म्हणतात कीं, ' साक्षात् अपकर्षाचें स्वरूप दिसणें व सूक्ष्मरूपानें त्याचें बीज रुजत असणें यांत जरी फरक असला तरी चिकित्सकास बीजाचें महत्व अधिक वाटतें. म्हणून हा काळ ख्रिस्तपूर्व ८०० तें ख्रिस्तोत्तर ८०० ह्मणजें सुमारें दीड हजार वर्षांचा काळ-

अपकर्षाचाच ह्मटला पाहिजे.' (पहा पान ५ व ६)

या दीडहजार वर्षांच्या काळास कांहीं 'उत्कर्षाचा काळ' म्हणत असतां दिवेकरांच्या चिकित्सकबुद्धीला तें पटलें नाहीं. मतभेद व्यक्त करितांना त्यांच्या चिकित्सकबुद्धीला जीं कारणें दिसलीं असतील तीहि त्यांनी दिलीं नाहींत. या काळांत त्यांना 'साक्षात्' अपकर्षाचें स्वरूप दिसून आलें नाहीं म्हणूनच ते म्हणतात कीं सूक्ष्मरूपानें अपकर्षाचें बीज रुजत होतें. तें सूक्ष्म बीज त्यांच्या चिकित्सकबुद्धीला कां दिसलें व तो काल हाच कां याचें विवेचन करण्याचा प्रयत्न यापुढें करूं.

आंतरः कोपिहेतुः

ब्रम्हश्री दिवेकरांनीं ख्रिस्तपूर्व ८०० तें ख्रिस्तोत्तर ८०० म्हणजे सुमारें दीडहजार वर्षांच्या या काळांत अपकर्षाचें बीजारोपण झालें असें जें चिकित्सकबुद्धीनें ठरविलें त्यांत 'आंतरः कोपिहेतुः' असावा असा आम्हांस दृढ संशय आहे. ख्रिस्तपूर्व इ. सनापूर्वी-सुमारें ५२६ वर्षापूर्वी भगवान महावीर व भगवान् महावीरापूर्वी सुमारें २०० वर्षें भगवान् पार्श्वनाथ होऊन गेले असा कालनिर्णय करण्यांत आला आहे; म्हणजे ख्रिस्तपूर्व ७२५ वर्षें भगवान् पार्श्वनाथ होऊन गेले व त्याच सुमारास अपकर्षाचें सूक्ष्म बीजारोपण होण्यास सुरवात झालीं असें दिवेकराचें ठाम मत बनलें आहे. जैनतीर्थकरांच्या काळाशीं हा मेळ केवळ काकतालीय आहे असें कोणी म्हणतील, परंतु तें चुकीचें होईल. जैनधर्मीयांच्या मतें चोवीस तीर्थंकर होऊन गेले व त्या सर्वांनीं अहिंसावादाचा जोरानें पुरःस्कारच केला असें जैन मानितात. परंतु इतिहासवेत्ते फक्त भगवान पार्श्व व महावीर यांनाच ऐतिहासिक विभूती मानितात. जैनधर्मीय अहिंसावादाचा जोरानें पुरःस्कार करून वैदिकधर्मीयांच्या यज्ञयागांतील हिंसेचें उच्चाटन करण्याचें पहिलें श्रेय भगवान पार्श्वनाथ यांचेकडेच येतें व यामुळेंच श्री. दिवेकरांनीं ख्रिस्तपूर्व ८०० वर्षांपासूनच्या पुढील काळास अपकर्षाच्या बीजारोपणाचा काळ असें म्हटलें असावें. महात्मा बुद्धाच्या अहिंसावादाच्या काळाला अनुसरून हें लिखाण असतें तर बीजारोपणाचा

काळ खिस्तपूर्व ४००।५०० वर्षें असावा असें त्यांनीं झटलें नसतें काय?

खिस्तोत्तरहि ८०० वर्षांचाच काल ठरवितांनाहि श्री. दिवेकरांनीं आपली मेख ठेविलीच आहे; कारण याच सुमारास मुसलमानांनीं उत्तर हिंदुस्थानावर चढाई करून हिंदुस्थानांतील अफाट संपत्तीची लूट करून नेण्याची प्रथा प्रथम पाडिलीं. संपत्ति मिळवितां मिळवितां संपत्तीसह देशच मिळवावा असें त्यांना वाटलें व त्यांत त्यांना यश येऊन मुसलमान हिंदुस्थानांत सत्ताधीश म्हणून स्थायीक झाले. बौद्धधर्माचा शेवटचा मोठा आश्रयदाता गुप्त हर्ष या घराण्याचा शेवट इ. स. ६४७ मध्यें झाल्यानें त्याबरोबरच सार्वभौमपद धारण करणारें घराणेंहि तेंच शेवटचें म्हणून ठरलें गेलें व यानंतर जैनधर्माचा रवि मध्यान्हापासून च्युत होऊन तो पश्चिमभागाकडे झुकत चालला. हे स्थित्यंतर लक्षांत घेऊनच श्री. दिवेकरांनीं इ. सनानंतर ८०० वर्षांचा काळ हा अपकर्षाचा काळ म्हणून ठरविला असावा असें म्हणण्यास कोणताच प्रत्यवाय राहत नाहीं.

आपल्या पुस्तकाच्या पान ४ व ५ वर ' उत्कर्षाची व्याख्या ' देतांना श्री. दिवेकर म्हणतात कीं, ' हिंदुस्थानावर जर मुसलमान व इंग्रज समाजांनीं आक्रमणें केलीं नसतीं व हिंदुसमाज आजवर कोणत्याहि समाजाच्या कक्षेंत गेला नसतां तर त्याचा उत्कर्ष अनादिसिद्धच आहे असें म्हणतां आलें असतें. परंतु **अनेक कारणामुळें** हिंदुसमाजाला मुसलमान व इंग्रज यांच्या सत्तेचें दास्य पत्करावें लागल्यामुळें **त्या कालापासून** हिंदुसमाजाच्या अपकर्षास प्रारंभ झाला असें समजले पाहिजे. ' **अवतरण चिन्हांतील** ' त्या कालापासून ' या शद्बावरून मुसलमानाच्या आक्रमणानंतर आर्यसंस्कृतीच्या अपकर्षास आरंभ झाला असें प्रतिपादन करण्याचा शास्त्रीबुवांचा इरादा दिसतो. तो इंग्रजी अम्मलाला उद्देशून लिहिलेला दिसत नाहीं. यापुढें याचा अधिक खुलासा करितांना दिवेकर लिहितात कीं, ' परकीयांच्या स्वाऱ्या झाल्या नसत्या व होऊनहि त्यांना थप्पड लगावतां आली असती तर वेदकालापासून हिंदुसमाजाचा सारखा उत्कर्ष झाला व होत आहे असें म्हणतां आलें असतें. पण शिकंदराच्या

स्वारीपासून तों आजपर्यंत आलेल्या परकीय पाहुण्यांना येथें मुक्तद्वार आहे; इतकेंच नव्हे तर त्यांचें सत्तासर्वस्वहि आहे.' श्री. दिवेकरांच्या या विचारसरणीवरूनहि इ. सनाच्या अलीकडे व पलीकडे ८ शें वर्षांचा काल त्यांनीं कां धरला असावा याबद्दल आम्ही जें अनुमान बांधिलें आहे तेंच खरें असावें अशी वाचकांची खात्री होईल.

कावीळ दृष्टि

श्री० दिवेकरांनीं वैयक्तिक उत्कर्ष हाच समाजाचा उत्कर्ष असें प्रतिपादिलें आहे. या उत्कर्षांत प्रज्ञा, पौरुष, पराक्रम, धैर्य व शीलादिकांना कार्यक्षेत्र मिळणें वगैरे गोष्टींचा अंतर्भाव केला आहे. पान ४० वर हेंच प्रतिपादन त्यांनीं दुसऱ्या शब्दांत केलें आहे. ते ह्मणतात, 'समाजांतील कर्त्या व्यक्ती ज्या समाजांतून पुढें येतात, त्यांची पूर्वपरंपरा चांगली उज्ज्वलच असावी लागते.' यावरून ज्या समाजांत शौर्यवीर्यादि पराक्रम करणाऱ्या कर्तबगार व्यक्ती जन्मतात, उदयास येतात व त्यांच्या या राष्ट्रहितैषी, समजोपयोगी गुणांचें योग्य चीज होते तो समाज उत्कर्षित होतो व जेथें संतती, संपत्ति, मानसन्मान व सौख्यसंतोष यांचा अभाव असतो तो समाज अपकर्षानें ग्रासलेला असतो असें मानण्यास हरकत नाहीं. इ. स. नंतर ८०० वर्षें पर्यंतच्या काळास वरील कसोटी लाविल्यास श्री. दिवेकरांना आपलें मत खास बदलावें लागेल.

ख्रिस्तपूर्व ८०० ते ख्रिस्तोत्तर ८०० वर्षांच्या काळांतील हिंदुस्थानच्या परिस्थितीचा विचार करितांना श्री. दिवेकरांनीं उत्कर्षापकर्षाची जी व्याख्या व जी कसोटी दिली आहे, त्यांचाच उपयोग केल्यास कोणता निष्कर्ष काढतां येईल याशीं विचार कर्तव्य आहे.

तत्पूर्वी श्री. दिवेकरांचीच विचारसरणी व तिजवरून निघणारीं तर्कशुद्ध अनुमानें विचारांत घेतलीं तरीहि हिंदुस्थानांत मुसलमानांची व तदनंतर इंग्रजांची सत्ता स्थिर होण्याचीं प्रमुख कारणें अहिंसावाद व 'जगत् दुःखम्' ही तत्वें नाहींत असेंच सिद्ध होणार आहे. 'ख्रिस्तपूर्व चार हजार तें ख्रिस्तपूर्व ८०० म्हणजे तीन हजार वर्षें आर्यसंस्कृति ही

उत्कर्षाच्या उच्च स्थानी होती, ' असें पान ५ वर दिवेकर म्हणतात.

दिवेकरांचें हें प्रतिपादन व विधान नितांत सत्य आहे असें मानिल्यानंतर अपकर्षाला सुरवात केव्हां होते, यासंबंधी श्री. दिवेकरांनीं जी साधार माहिती दिली आहे, त्यांतच हिंदुस्थानच्या अपकर्षाचीं कारणें स्पष्ट दिसून येत आहेत. पान ७१ वर दिवेकर म्हणतात कीं, ' भारतीय युद्धापासून पाणिनीपर्यंतच्या (ख्रिस्तपूर्व ३००० तें ख्रिस्त-पूर्व ८००) स्वास्थ्याच्या काळांत ही अवनतीचीं बीजें रुजलीं.' संतोष व स्वास्थ्य ही उत्कर्षाचीं कारणें केव्हांहि होत नाहींत-म्हणूनच " असंतोषः श्रियोमूलम् " असा सिद्धांत आहे. उन्नतीचें मागून अवनति, उत्कर्षानंतर अपकर्ष, सुखामागून दुःख असा जगाचा चक्रनेमिक्रम आहे. ' चढेल तो पडेल ' या साध्या म्हणींतहि मोठा सिद्धांत गोंवलेला आहे. इ. सनापूर्वी ८०० तें तत्पूर्वी चार हजार म्हणजे दरम्यानच्या सुमारें तीन हजार वर्षें उत्कर्षाच्या उच्च स्थानी असलेल्या हिंदुस्थानचा अपकर्ष झाला, त्याची अवनति झाली अगर त्याला दुःख प्राप्त झालें तर चढलेला हिंदुस्थान पडला ; चक्रनेमिक्रमाच्या फेऱ्यांतून वैदिक आर्यसंस्कृतीचा हिंदुस्थानहि सुटला नाहीं अगर त्या तीन हजार वर्षांच्या काळांत संतोष व स्वास्थ्य यांचें अखंड वास्तव्य हिंदुस्थानांत झाल्यानें ' असंतोषः श्रियोमूलम् " या सिद्धांताचा अनुभव आला असें कां मानूं नये ? सारांश, दिवेकरांच्या मताप्रमाणेंच उत्कर्षानंतर अपकर्ष आला ; स्वास्थ्य व संतोष यामुळें हिंदी लोक चैनी, आळसी व विलासप्रिय झाले, व चक्र-नेमिक्रमाच्या फेऱ्यानें हिंदुस्थानाला झपाटलें असें होत नाहीं काय ? ' अहिंसावाद ' व ' जगन्मिथ्या वाद ' हीं अपकर्षाचें कारणें नाहींत, नव्हेत व होणार नाहींत हेंहि त्याबरोबरच उघड आहे.

समाजाच्या अपकर्षाचा दुसरा एक नैसर्गिक सृष्टिनियम (सिद्धांत) शास्त्रीबवांनीं आपल्या पुस्तकांत पान ५० वर दिला आहे. ते लिहितात कीं, ' जगामध्यें प्रवृत्तिनिवृत्तीचीं आंदोलनें चक्रनेमिक्रमानें होत असतात निवृत्तीचा किंवा प्रवृत्तीचा अतिरेक झाला कीं; समाजाचा अपकर्ष होतो.

असा नियम आहे. चक्रनेमिक्रमाच्या या सिद्धांतास शास्त्रीबुवा अखेरपर्यंत चिकटून राहते तर उगाच अहिंसावाद, जगन्मिथ्यावाद यांचा कीस काढण्याची जरूरी तरी त्यांना कोठें होती ?

या चक्रनेमिक्रमाचें सोदाहरण कथन पान६०वर त्यांनीं दिलें आहे व तें भारतीय युद्धासंबंधीचें आहे. भारतीय युद्धाच्या वेळीं पृथ्वीला जो भार झाला होता त्याचेंहि सुंदर वर्णन शास्त्रीबुवांनीं दिलें आहे. ते म्हणतात कीं, 'नर्मदेच्या उत्तरेकडे व दक्षिणेकडे आर्यांनीं राज्यें स्थापिलीं होती. देश सुपीक व सपाट, अन्न रुचकर व सकस, हवा निरोगी आणि उत्साहवर्धक अशी असल्यामुळें आणि पुरुषांना वाटेल तितकीं लग्नें करण्याची मुभा असल्यामुळें प्रजा हां हां म्हणतां वाढली, म्हणून पृथ्वीला झालेला भार नाहींसा करण्याकरितां आपसांत यादवी सुरूं झाली. श्रीकृष्णांनीं हा भूभार कमी केला.' भारतीय युद्धाचे वेळीं प्राज्ञा, शौर्य, धैर्य, पराक्रम, पौरुष, द्रव्य, उपभोग, संतति व संपत्ति ही अमूप होती. हा उत्कर्षाचा खरा काल होता. असा काल आला कीं, भूमातेला हा भार असह्य होऊन यादवी माजते व यामुळें भूभार कमी होतो. असाच प्रकार मुसलमानांच्या स्वाऱ्यांच्यावेळीं तर नव्हताना ?

सारांश, शास्त्रीबुवांच्या प्रतिपादनाचा निष्कर्ष हाच कीं जगामध्यें प्रवृत्तिनिवृत्तीचीं आंदोलनें चक्रनेमिक्रमानें होत असतात. (पान ५०) उन्नतीचे मागून अवनति, उत्कर्षानंतर अपकर्ष, सुखामागून दुःख असा जगाचा चक्रनेमिक्रम आहे. साध्या म्हणींत बोलावयाचें तर 'चढेल तो पडेल ' इत्यादि. (पान७१) चक्रनेमिक्रम म्हणजे दुसरें तिसरें कांहीं नसून नैसर्गिक घडामोड. या क्रमाला तोंड देणें अगर तोड काढणें, या चक्राचा क्रम चुकविणें हे मानव शक्तीच्या आंवाक्याच्या बाहेर आहे; तद्वतच या चक्राचा फेरा कव्हां, कोठें, कोणावर व कोणत्या स्वरूपांत येईल हें अगाऊ जाणणेंहि मानवी ज्ञानाच्या कक्षेच्या बाहेर आहे. चक्रनेमिक्रमाचा वरवंटा फिरून गेल्यानंतर त्याच्या आगमनाच्या कारणांचा विचार मानवी मन व बुद्धी आपापल्या परी करीत असतात. रामरावण-युद्धाचें कारण सीता-

हरणादि अन्याय असोत वा नसोत, परंतु शास्त्रीबुवांच्या मतें, **आसुरी संस्कृतीचा आर्यसंस्कृतीवर अनिष्ट परिणाम होऊं नये ह्मणून राम-रावण युद्ध झालें** व भारतीय युद्धाचेंवेळीं पृथ्वीला झालेला भार नाहींसा करण्याकरिता आपसांत यादवी सुरू झाली. श्रीकृष्णांनीं हा भूभार कमी करण्याकरितां भारतीय युद्ध लढविलें.

उत्कर्ष स्थैर्यकाल

भारतीय युद्धानंतर पाणिनीच्या काळापर्यंत (इ. स. पूर्वी ३००० तें इ. स. पूर्वी ८०० च्या) २२०० वर्षांच्या कालाला शास्त्रीबुवा आर्य-संस्कृतीचा उत्कर्षस्थैर्यकाल असें संबोधितात. (पहा पान ७०) उत्कर्षकाल व उत्कर्षस्थैर्यकाल ठरवितांना शास्त्रीबुवा त्या त्या काला-संबंधी कशी परस्परविरोधीं विधानें करितात हें त्यांच्या पुस्तकांतील पान ५ वरील व पान ७० वरील जें उतारें वर दिले आहेत, त्यावरून स्पष्ट होत आहे. या कालांत क्षत्रियामध्यें शौर्य, ईश्वरभक्ति व स्वाभि-भाव (स्वाभिमान) हे गुण असल्यामुळें प्रत्येकाला सम्राट होण्याची इच्छा असे. कोणाहि क्षत्रियानें सार्वभौमत्वाची खटपट करावी, एकानें दुसऱ्या राजास जिंकण्याचा प्रयत्न करावा, असा प्रकार चालूं असल्यामुळें राष्ट्रांत अशा तऱ्हेच्याच अनेक राजकीय उलाढाली होत असत, इतकीच माहिती या कालासंबंधीं शास्त्रबुवांनीं दिली आहे. चंद्रगुप्तापूर्वींचा हिंदुस्थानचा इतिहास अज्ञात आहे असें इतर इतिहासज्ञ मानित असतां ब्रम्हश्री दिवेकरांनी या मौर्य घराण्याच्या उदयापूर्वींचा शेंकडों वर्षांचा इतिहास कोठून पैदा करतां आला ?

भारतीय कालाच्या अखेरीस आल्यानंतर शास्त्रीबुवांच्या विचा-रामध्यें चलबिचल झालेली दिसतें. आर्यसंस्कृतीच्या अपकर्षाचें बीजारो-पण भारतीय युद्धाच्या कालापासून तो पाणिनीपर्यंतच्या स्वास्थ्याच्या कालांत (इ. स. पूर्वी ३००० तें इ. पूर्वी ८००) झालें अगर तें बीजारोपण पाणिनीच्या कालापासून म्हणजे इ.स. पूर्वी८० तें इ.स. नंतर ८०० या दीडहजार वर्षांच्या काळांत झालें, याबद्दल शास्त्रीबुवांचीं मतें

आंदोलनें खावूं लागलीं. आम्ही या आक्षेपांचा अधिक खुलासा अधिक करण्याच्या भानगडींत न पडतां खुद्द शास्त्रीबुवांच्याच शब्दांत बीजारोपणाच्या कालाचें वर्णन दिलेस तें जास्त इष्ट होईल असें वाटतें.

स्वतःविरोधी दिवेकर

पान ५	पान ७१
' शकपूर्व ८०० तें शकोत्तर ८०० या दीडहजार वर्षांच्या काळांत **अपकर्षाचींच बीजें** रुजत होतीं असें आमचें मत आहे. '	' प्रस्तुत लेखकाच्या मतें भारतीय युद्धापासून पाणिनीपर्यंतच्या स्वास्थ्याच्या काळांत ही **अवन-तीचीं बीजें** रुजलीं. '

भारतीय युद्ध ख्रिस्तपूर्व ३००० वर्षें अगोदर झालें व ख्रिस्तपूर्व ८०० वर्षें हा पाणिनीचा काल असें दिवेकरांनीं मानिलें आहे. यावरून अपकर्षाच्या बीजारोपणाच्या कालाचा थांग लावितां लावितां ब्रम्हश्री बेभान झाल्यानें परस्परविरोधी विधानें करून स्वतःस हास्यास्पद करून घेत असल्याचे स्पष्ट दिसत आहे. भारतीय युद्धापासून तो पाणिनीपर्यंतच्या कालाला (इ. स. पूर्वी ३००० तें इ. स. पूर्व ८००) उत्कर्षस्थैर्यकाल असें श्री. दिवेकर संबोधितात. यावरून अपकर्षाच्या बीजारोपणाचा निश्चित काल कोणता हें दिवेकरांना ठरवितां आलें नाहीं हें उघड दिसत आहे.

आर्यसंस्कृति कोणत्या काळांत उत्कर्षाच्या उच्चस्थानी होती, तिचा उत्कर्षकाल कोणता, उत्कर्षाचा स्थैर्यकाल कोणता, कोणत्या कालांत अपकर्षाचीं अगर अवनतीचीं बीजें रुजलीं याबद्दल शास्त्रीबुवांच्या मनांत घोंटाळा उत्पन्न होऊन त्यांच्याकडून परस्परविरोधी मतें कां दिली गेली असावी याची अनेक कारणें असावीत. उत्कर्षापकर्षकाल, त्याचीं कारणें वगैरेंबद्दल विद्वानांची मतें शास्त्रीबुवा धुंडत असावेत व तसें करितांना त्यांनीं पान ५ वरील मत उसनें घेतलें असावे; मात्र त्याचा विसर पान ७० व पान ७१ वरील मजकूर लिहितांना झाला असावा अगर अशा मतांचा कसाबसा समन्वय करण्याकरितां उत्कर्षस्थैर्यकालास ब्रम्हश्रींनीं जन्म

दिला असावा, अथवा अहिंसातत्वाच्या माथीं दोष मारण्याचा मोह आवरतां न आल्यानें या १५०० वर्षांच्या काळांत अवनतीचें व अपकर्षाचें बीजारोपण झाल्याचें कावीळ ब्रम्हश्रींना झालें असावें! शास्त्रीबुवांच्या या परस्परविरोधी मतांची व्युत्पत्ति अशाच कारणांनीं लावणें प्राप्त आहे.

सारांश, आतांपर्यंत जें विवेचन केलें त्यावरून शास्त्रीबुवांना कोणत्या काळांत आर्यसंस्कृतीच्या अपकर्षाचें बीजारोपण झालें हें निश्चितपणें सांगतां आले नाहीं हें दाखविण्याचा आम्ही प्रयत्न केला आहे. ज्या कालाला आर्यसंस्कृतीचा उत्कर्षकाल असें इतर कांहीं संबोधितात त्याच कालांत अपकर्षाचें बीजारोपण झालें असें म्हणताना त्याबद्दलची कोणतीहि कारणें श्री. दिवेकरांनीं न देतां मुग्धताच स्वीकारली आहे, हें आम्ही उघडकीस आणिलें आहे "चढेल तो पडेल" हा साधा सिद्धांत या अपकर्षाचें मुळाशीं आहे हें दिवेकरांच्या प्रतिपादनावरूनच सिद्ध होत आहे, याची जाणीव वाचकांना करून दिली आहेच. उत्कर्षाची ह्मणून जीं लक्षणें दिवेकरांनीं दिली आहेत ती भारतीय युद्धापासून तों पाणिनीच्या काळापर्यंत अस्तित्वांत होतीं वगैरेबद्दलची माहिती प्रायः शास्त्रीबुवांच्या शब्दांतच दिली आहे.

अपकर्षाचा खरा काल कोणता?

इ. स. पूर्वी ८०० तें इ. सनानंतर ८०० वर्षें म्हणजे सुमारें दीडहजार वर्षांच्या काळांत तरी आर्यसंस्कृतीचा अपकर्ष झाला अगर कसें, झाला असल्यास त्याचीं कारणें कोणती व त्यास सुरवात केव्हां झाली वगैरेबद्दल यापुढें विचार करूं.

श्री. दिवेकर यांनीं इ. सनापूर्वी ८०० तें ख्रिस्तशकापर्यंतच्या या ८०० वर्षांतील व तत्पूर्वीच्या समीपवर्ती कालांतील राजकीय सामाजिक व धार्मिक परिस्थितीचें दिलेलें वर्णन आम्हांस मान्य नाहीं; तथापि शास्त्रीबुवांनीं जें वर्णन दिलें आहे तें खरें असें मानिलें तरी अपकर्षाचें खापर अहिंसातत्व व जगन्मिथ्यावाद यांच्या डोक्यावर

फोडितां येणार नाहीं हें उघड दिसत असल्यानें प्रथम त्यांनीं केलेल्या वर्णनाचा विचार करून नंतर या १५०० वर्षांच्या काळांत खरी वस्तुस्थिति कशी होती याचें विवेचन करण्याचें योजिलें आहे.

राजकीय परिस्थिति.

ब्रम्हश्री दिवेकरांच्या आर्यसंस्कृतीच्या उत्कर्षस्थैर्यकालांत–म्हणजे भारतीय युद्धापासून तो ख्रिस्तपूर्व ८०० वर्षें –पाणिनीच्या काळापर्यंत– ' सूर्यवंशी, चंद्रवंशी व अग्निवंशी राजे पंजाब, मध्यदेश, अयोध्या व सौराष्ट्र या भागांत राज्य करीत होते. या क्षत्रियांमध्यें शौर्य व स्वाभिमानादि गुण असल्यामुळें प्रत्येकाला सम्राट होण्याची इच्छा असे. कोणत्याहि क्षत्रियानें सार्वभौमत्वाची खटपट करावी, एका राजानें दुसऱ्यास जिंकण्याचा उपक्रम करावा असा प्रकार चालला होता व आर्यसंस्कृति वैभवाच्या पूर्ण शिखरावर विराजमान झाल्यावेळीं आपसांतील कलहामुळें भारतीय युद्ध उत्पन्न झालें व त्यांत प्रमुख क्षात्रतेजें विलीन झालीं होतीं ' असें ब्रम्हश्री म्हणतात. (पहा पान ७०) यावरून भारतीय युद्धांत प्रमुख क्षात्रतेजें विलीन झाली व त्यानंतरच्या कालांत कोणाहि राजास सम्राट होण्याची महत्वाकांक्षा व्हावी व एकानें दुसऱ्यास जिंकण्याचा प्रयत्न करावा असा उपक्रम सुरू असल्यानें निरनिराळ्या राजामध्यें स्नेहसंबंध, सलोखा, ऐक्य व राष्ट्रनेता सम्राट यांचा पूर्ण अभावच होता असें मानावें लागत आहे.

उपनिषदांतील यज्ञनिंदा, तिचीं कारणें व परिणाम

उपनिषत्कालीं प्रवृत्तिपर वैदिकधर्मावरील विश्वास डळमळूं लागला होता. उपनिषदांमध्यें यज्ञकर्माची जी निंदा आढळते, तीवरून लोकांना यज्ञसंस्थेपासून परावृत्त करण्याचें कार्य ब्रम्हवेत्यांनीं सुरू केल्याचें दिसते. (पहा पान ७४)

' ब्रम्हवेत्यांनीं लोकांना यज्ञापासून परावृत्त करून ज्ञानमार्गाकडे नेण्याचें कार्य जेव्हां सुरू केलें तेव्हांपासूनच यज्ञ अनावश्यक मानिले गेले. यज्ञाला उत्सवाचें स्वरूप आले, यज्ञासाठीं खर्च भारी येऊं लागला,

खटाटोप फार पडूं लागला, ऋत्विजांत भांडणें सुरूं झालीं, भिक्षुकांत मत्सर वाढला. यामुळें हें यज्ञ नकोत असें लोकांना झालें होतें.' खरी स्थिती अशी असतां, यज्ञ, यज्ञांतील हिंसा यांचा व शौर्यवीर्यादि गुणांचा बादरायण संबंध शास्त्रीबुवांनीं जोडिला आहे.

यावरून निवृत्तीमार्गाकडे जनतेचा ओघ उपनिषत्कालींच जाऊं लागला होता हें स्पष्ट आहे. निवृत्तिपरवृत्ति, संन्यासवृत्ति व जगन्मिथ्यात्व यांत भेद कोणता? यानंतर त्रैवर्णिकाची स्थिति तरी स्पृहणीय होती अगर कसें तें पाहतां या त्रैवर्णिकामध्यें शुक्लभास्करवर्ण व कृष्ण-संतति असे दोन ठळक विभाग पडलें. कालांतरानें या दोन वर्गांत मत्सर, प्रति-कार व स्पर्धा उप्तन्न झाली. वैशंपायन व याज्ञवल्क्य हें या स्पर्धेचें सुप्रसिद्ध उदाहरण होय. या स्पर्धेचें अखेर पर्यावसान असें झालें कीं कृष्णपक्षाभिमान्यांनीं मूळच्या सनातन वैदिकधर्माचा द्वेष आरंभिला आणि उपनयनादि संस्कार करण्याचें सोडून देऊन ते व्रात्य बनले. उपसनामार्गांत नानाप्रकारचे योगाचार व अनाचर शिरले होते व द्वैत माजले होते. आर्यसंस्कृतीवर इस्लामसंस्कृतीचा पगडा बसण्यास हिंदूच्या पावित्र्यविषयक भ्रामक समजूतीही कारणीभूत झाल्या. यावेळी धार्मिक वेडगळ समजुतींचा बुचबु-चाट होता. सारांश, भारतीय युद्धामुळें प्रमुख क्षत्रिय घराणीं नष्ट झालीं. जीं शिल्लक राहिलीं त्यांत ऐक्य, एकोपा, सहकार्य, सहचर्य यांचा अभाव होता असें नसून सार्वभौमपदासाठीं एकाच्या नरडीचा घोट दुसरा राजा घेऊं पाहत होता. ऋत्विजांत कलह, भिक्षुकांत मत्सर, त्रैवर्णिकांत वैर अशा अनेक कारणामुळें हिंदराष्ट्ररूपीं विराट देह सडावयास लागला होता. अशा स्थितींत परकीयांना प्रतिकार करण्याचें सामर्थ्य या जीर्ण व जरापीडित देहांत राहिलें नसल्यास नवल नाहीं. मुसलमानांना यश येण्याची हीं व अशीच दुसरीं कारणें असतां आपल्या पूर्वजांच्या पापावर पांघरूण घालण्याकरितां ब्रम्हश्री वडाची साल पिंपळाला लावून नामा-निराळे होत आहेत.

खरी वस्तुस्थिति

ई. स. पूर्व ८०० तें इ. सनानंतर ८००

इ. सनापूर्वी ५२६ वर्षांच्या सुमारास भगवान महावीर व त्यापूर्वी २०० वर्षे भगवान पार्श्वनाथ होऊन गेले. महावीरानंतर सुमारें दोनशें वर्षांनीं म्हणजे इ. सनापूर्वी ३२५ वर्षें जगज्जेत्या शिकंदर बादशाहानें हिंदुस्थानावर स्वारी केली, पण त्यानंतर दोन वर्षांनीं तो मयत झाला व अवघ्या एकच म्हणजे इ. सनापूर्वी ३२२ व्या वर्षी चंद्रगुप्त मगधाधीश झाला. शिकंदरच्या राज्याचा राज्याधिकारी सेल्युकस यानें इ. सनापूर्वी ३१२ व्या वर्षी हिंदुस्थानावर स्वारी केली व इ. सनापूर्वी ३०३ वर्षांच्या सुमारास सेल्यूकस व मौर्यसम्राट चंद्रगुप्त यामध्यें तहनामा झाला. मौर्य घराण्यांतील तिसरा प्रबल व प्रतापी राजा सम्राट संप्रति हा इ सनापूर्वी २०७ व्या वर्षी मरण पावला. कलिंगाधिपती महामेघवाहन सम्राट खारवेल याचा अंतःकाल सुमारें इ. सनापूर्वी १३० वर्षें असा मानला जात आहे. इ. सनाच्या दुसऱ्या शतकाच्या सुरवातीपासून तो इ. सन ८०० वर्षापर्यंत १५ गंगराजांनीं राज्य केलें. कदंब, चालुक्य, राष्ट्रकूट वगैरे अनेक राजघराणीं, मुसलमानांच्या हिंदुस्थानावरील प्रथम स्वारीपर्यंत, उदयास आलीं होतीं. राष्ट्रकूट वंशांतील प्रतापी राजा अमोघवर्ष हा तर इ. सन८१५व्या वर्षी सिंहासनारूढ झाला. चालुक्यवंशीय राजे-प्रथम पुलकेशी, कीर्तिवर्मा, मंगलीश व दुसरा पुलकेशी वगैरे पराक्रमी व प्रसिध्द राजे-इ. सनाच्या ९ व्या शतकापूर्वी होऊन गेले. मौर्य घराण्याचा उदय होण्यापूर्वी सुमारें ३२० वर्षें अगोदर मगध देशांत शिशुनाग वंशस्थापक महापराक्रमी राजा शिशुनाग यानें इ. सनापूर्वी ४८० वर्षांपर्यंत राज्य केलें. या शिशुनागानंतर याच्या वंशांतील राजे विंदूसार--बिंबसार, नंदिवर्धन वगैरे विख्यात राजे होऊन गेले. इराणचा राजा दारा (Darias) व बिंबसार हे समकालीन होते. उदयगिरीच्या हत्तीगुंफेंतील शिलालेखांत ज्या नंदराजाचा उल्लेख आहे तो नंद

व नंदिवर्धन ही एकच व्यक्ती असें मानिलें जात आहे. मगध देशांत नाग-वंश राज्य करीत असतां वैशाली येथें प्रजासत्ताक राज्य होतें व भगवान् महावीर यांचा या प्रजासत्ताक राज्याशीं संबंध होता.

इ. स. पूर्वी ८०० ते इ. स. नंतर८००वर्षांतील सुमारें दीड हजार वर्षाच्या कालांतील प्रख्यात राज्यघराणीं व त्या घराण्यांतील सम्राट व इतर राजे यांच्यापैकीं कांहींचा वर उल्लेख केला आहे, त्यावरून हा काल हिंदुस्थानच्या उत्कर्षाचा होता अगर अपकर्षाचा होता हें वाचकांनीं ठरवावें. याच काळांत उत्कृष्ट वाङमय निर्माण झालें. भारतदेश संपत्तीनें समृद्ध झाला. शेती व व्यापारवृद्धीसाठीं अनेक यशस्वी प्रयत्न झाले. या कालांतील कलाकौशल्य व शिल्पकला यांचे वैशिष्टय आज मितीसहि अबाधित आहे. ख्रिस्तपूर्व व ख्रिस्तोत्तर ८०० वर्षांच्या कालांतील राजकीय परिस्थितीची सोदाहरण थोडीशी कल्पना दिल्यानें मुसलमानाच्या हिंदुस्थानांवरील प्रथम आक्रमणापूर्वीं हिंदुस्थान बलवान् होता अगर निर्बल होता, आपलें संरक्षण करण्यास तो समर्थ होता अगर असमर्थ होता, त्यावेळचें जैन अहिंसातत्वी तरवार पराजित कीं ती म्यानांत घालीत, नेटका संसार करून इहलोकीचें कल्याण हस्तगत केल्यावर संसार असार मानून पारलौकिक हितासाटीं संसारत्याग करीत कीं, मुंज होण्यापूर्वींच ब्रम्हचर्याचें व्रत घेण्यासारखी घिसाडघाई करून संसार न करितांच संसार असार म्हणून त्याचा त्याग करीत असत वगैरेबद्दल वाचकांना स्पष्ट कल्पना येईल

बोलका आरसा

वरील गोष्ट सिद्ध करण्यासाठीं मौर्यसम्राट चंद्रगुप्त याचेंच उदाहरण घेऊं. चंद्रगुप्त हा इ. स. पूर्व चौथ्या शतकांत होऊन गेला. कौटिलीय अर्थशास्त्र व चंद्रगुप्ताचे दरबारीं असलेला ग्रीक वकील मेगस्थीतीस यानें लिहून ठेवलेल्या वृत्तांतांचे इतरांनीं घेतलेले उतारे यावरून विश्वसनीय माहिती उपलब्ध झाली आहे. चंद्रगुप्त अकार्मण्य नव्हता. तो अहिंसावादी जैनधर्मीय होता. चांडगा संसार करून अखेरीस पारलौ

किक सुखासाठीं आपल्या खालील साम्राज्याचा त्यानें त्याग केला. जैनधर्माचे दृष्टीनें तो आदरणीय व आर्शदवत् जैनवीर व मुनी होऊन गेला.

चंद्रगुप्ताचें सैन्यबल

चंद्रगुप्ताच्या सैन्यांत ९००० शिक्षित लढाऊ हत्ती, ८००० रथ, ३००००घोडेस्वार, व ६०००००पायदळ होते. महातामुद्रां प्रत्येक हत्तीवर चार म्हणजे ३६००० धर्नुधर व प्रत्येक रथांत सारथ्यासह तीन इसम मिळून२४०००योद्धे असत. यावरून त्याच्या वट्ट सैनिकांची संख्या६९०००० होती असें दिसतें. पायदळांत सहा प्रकारचे सैनिक असत. अनेक तऱ्हेचीं युद्धोपयोगीं हत्यारानीं युक्त अशी त्याची सेना होती. राज्यांत अनेक किल्ले होते. सैन्याचें आधिपत्य एका मंडळाकडे असून त्यांत निरनिराळ्या दर्जाचे अधिकारी होते. यावरून चंद्रगुप्ताच्या व त्याबरोबरच हिंदुस्थानच्या सामर्थ्याची कल्पना येईल अशी आशा आहे.

शिकंदरच्या राज्याचा उत्तराधिकारी सेल्यूकस यास दांती तृण धरून शरण येण्यास भाग पाडणारा व शिकंदरनें हिंदुस्थानच्या पश्चिम सरहद्दीपलीकडील जिंकलेला मुलूख आपल्या राज्यास जोडणारा व सेल्यूकसच्या लाडक्या कन्येचा धर्मपत्नि म्हणून स्वीकार करणारा चंद्रगुप्त जैनधर्मीय होता. तसेंच या ग्रीक लोकांच्या आक्रमणाच्या वेळीं सम्राट चंद्रगुप्तानें ग्रीक लोकांच्या रक्तानें माखलेल्या आपल्या विजयी हातानें हिंदभूच्या कपाळीं रक्ताचा विजयी कुंकूमटिळा लावून तिला स्वातंत्र्याचें चुडेदान वाहिलें. अबुल कासिमच्या हिंदुस्थानावरील आक्रमणाचे वेळीं हल्लींच्या 'आगरवाल' जैनांच्या पूर्वजांनीं **-मातापित्यांनीं** आपल्या जन्मभूमीच्या स्वातंत्र्यरक्षणार्थ जी आत्माहुती दिली, जें बलीदान केलें त्याबद्दल त्यांना चंद्रगुप्तासारखें यशस्वी फल मिळालें नाहीं हें खरें, परंतु त्यामुळें त्या आत्मयज्ञाची किंमत कदापि कमी होणार नाहीं. कासिमच्या स्वारीच्या वेळी स्वदेश व स्वधर्मसंरक्षणासाठीं चाळीस हजारापेक्षांहि अधीक आगरवाल वीरपुरुषांनीं समरांगणावर आपलें प्राण अर्पिलें.

आपल्या शीलसंरक्षणार्थ त्यांच्या बारा हजार स्त्रियांनीं आपले प्राण समाधानानें अग्नीला अर्पण केलें. मात्र सिंधप्रांतावर याच कासमनें स्वारी केल्यावेळीं ' तेथील ब्राम्हणांपैकीं कांहींनीं आत्महत्या केली व एक हजार ब्राम्हणांनीं प्रायश्चित्तादाखल क्षौर करवून घेतले पण प्रतिकार केला नाहीं ' हें ब्रम्हश्रीच आपल्या पुस्तकाच्या पान १२६ वर लिहितात. आगरवाल जैनांच्या पूर्वजांपैकीं बारा हजार स्त्रियांनीं आत्माहुति दिलीं तर कांहीं ब्राम्हण पुरुषांनीं आत्महत्या केलीं. हीं दोन्हीं चित्रें पाहून अहिंसावादी जैन स्त्रिया अधिक भीरू कीं वैदिकधर्मानुयायी हे ब्राम्हणपुरुष अधीक शूर हें वाचकांनींच ठरवावें .ग्रीक व मुसलमान या दोघांच्याहि उत्तरहिंदुस्थानावरील स्वाऱ्यांच्या वेळीं जैनांनीं कोणता पराक्रम दाखविला व इतरांकडून कोणते शतकृत्य घडले हें वर नमूद केलेंच आहे. मुसलमानांच्या दक्षिण हिंदुस्थानावरील प्रथम स्वारीच्या वेळीं देवगिरीच्या यादवांनीं काय केलें व यादव राज्याच्या दक्षिण भागांतील जैनराजांनीं व जैन सेनापतींनीं काय केलें याचा विचार करता उत्तरेतील व दक्षिणेंतील जैनांत जसा फरक नाहीं तसाच सिंधी ब्राम्हणांत व दक्षिणी हिंदूधर्मीयांत फरक नाहीं हें मागील प्रकरणांत जीं चरित्रें दिलीं आहेत त्यावरून दिसून येईल.

सम्राट चंद्रगुप्त हा जैनधर्मीय होता व त्यानें जैनमुनीदिक्षा घेऊन सल्लेखनाव्रताचें पालन करून मरण साधिलें. वगैरेबद्दलची त्रोटक माहिती यापूर्वीच दिली आहे. चंद्रगुप्तानंतर १५०वर्षांनीं उदयास येऊन दिग्विजय करून सम्राटपदास पोंचलेल्या व राज्यत्याग करून उर्वरीत आयुष्य जैनधर्मप्रमाणें घालविणारा चंद्रगुप्ताच्याच तोडीचा महाराजा ऐल खारवेल होऊन गेला. खारवेल हा हिंदुस्थानचा नेपोलियन होता. सम्राट मौर्य संप्रती म्हणजे बौद्धधर्माचा प्रसार करणारा मौर्य अशोकच होय. एका वंशांत, एका समाजांत, एका देशांत, एका धर्मांत एकाहून अधिक उज्वल परंपरा राखणाऱ्या अशा या तीन महान् विभूती --चंद्रगुप्त, अशोक व संप्रती--मौर्य कुळांत जन्मास आल्या. अशी उज्वल

परंपरा राखणारी भूमी, व संस्कृति त्रिवार वंदनीय असतां ब्रम्हश्रींनीं ती निंदनीय ठरवावी हा काळाचा महिमा कीं नावडतीचें मीठ आळणी हें वाचकांनींच ठरवावें. अशा या उज्वल कुलांतील राजाचा विश्वासघातानें खून करून तो वंश नष्ट करणारा राजमंत्री पुष्पमित्र मात्र ब्राम्हण होता!!

या पुस्तकाच्या तिसऱ्या प्रकरणांत सेनापती गंगराज वीरकेसरी चामुंड, सेनापती बैचप्पा आदि दक्षिण हिंदुस्थानांतील व राजा कुमारपालादि उत्तर हिंदुस्थानांतील अनेक नररावांचा, वीरवरांचा त्रोटक परिचय करून दिला आहेच. यावरून हिंदुस्थान पारतंत्र्य गर्तेत रुतला याचें कारण जगन्मिथ्यावाद अगर जैनांचा अहिंसावाद हें नाहीं हें उघड होईल. जैनधर्मीय अहिंसेचें सत्यस्वरूप देतांना तात्विकदृष्ट्याहि अहिंसातत्वामुळें अहिंसाधर्माचा अनुयायी भित्रा, भीरू व स्त्रैण होत नाहीं हें दाखविलेंच आहे. '**देह मर्त्य आहे, आत्मा अमर आहे**, देहावर ममत्व ठेवूं नका, आत्म्याचें कल्याण करा, आत्मकल्याण होत असतां देह गेला तरी त्याची फिकीर करूं नका,' अशी शिकवण देणारा धर्म आपल्या अनुयायांत वीरशौर्यादि गुण उत्पन्न करील कीं त्यांना बृहन्नडा बनवील? प्राणाची कुरवंडी करूनहि स्वातंत्र्यसंरक्षणास उद्युक्त करणारी ही शिकवण आहे कां परचक्र आलें असतां रेशमी मुगट्यांचा तट करून व देवदेवतादिकांवर अहोरात्र जलधारा करून त्याचे निवारण करण्याचीं आत्मघातकी शिकवण आहे?

प्रकरण ८ वें

दक्षिण भारताच्या अपकर्षांचा काल व कारणें.

इ. सनाच्या ८ व्या शतकाच्या अखेरीस व इ. सनाच्या १४ शतकाच्या सुरवातीस दक्षिण हिंदुस्थानची संस्कृती कशी होती याबद्दल थोडक्यांत माहिती देण्याचे योजिलें आहे; हेतू हा कीं इ. सनाच्या सातव्या आठव्या शतकाअखेर जैनधर्म हा भारतात सार्वधर्म होता व त्यानंतर त्या धर्माच्या व त्या धर्मानुयायांच्या द्वेषास प्रारंभ झाला व त्यानंतर सुमारें चारशें वर्षें हें धर्मयुद्ध अव्याहत चालूं राहून शैव, वैष्णव व वीरशैव, जैनधर्म व जैनधर्मीय यांच्या जागीं आले. या चारशें वर्षांच्या काळांत जैनधर्मीयांचा अनन्वित छळ झाला; त्यांच्या कलेचा लोप झाला; त्यांची संस्कृति मागें पडली. जैनधर्मीय राजे व राज्यें एकामागून एक नष्ट झालीं. हाच दक्षिण भारताच्या अपकर्षाचा काळ होय. दक्षिण हिंदुस्थानच्या या निर्बल परस्थितीचा फायदा घेण्याची प्रबल इच्छा उत्तर हिदुस्थानांतील मुसलमानांना झाल्यास नवल नाहीं. दक्षिण हिंदुस्थानच्या दुर्बलतेचा फायदा मुसलमानांनीं घेतला तो काल व कलचुरी घराण्यांतील प्रबल राजा बिज्जल याच्या विश्वासघाताच्या वधाचा काळ एकच आहे. आपल्या स्वामीच्या विश्वासघाताचें हें श्रेय (! !) वीरशैव धर्मप्रसारक बसवाकडे जाते व मौर्य घराण्यांतील राजाचा असाच विश्वासघातानें वध करण्याचा बहुमान (! !) पुष्पमित्र या ब्राम्हणास मिळत आहे. बसव व पुष्पमित्र हे दोघेहि मंत्रिपदावर होते. म्हैसूरकडील जैनधर्मीय गंगराज्यहि याच सुमारास नष्ट झालें. अशा अंतस्थ कलहामुळें व यादवीमुळें मुसलमानाना फावलें. व मुसलमान इस्लाम संस्कृति सगळ्यानांच

गिळंकृत करणार हें जाणून हताश झालेल्या दक्षिणेंतील अवशेष राजांनीं एका झेंड्याखालीं (Confederation) जमून आपलें मरण कांहीं दिवस लांबणीवर टाकिलें. मुसलमानांच्या दक्षिणेंतील राज्यविस्तारास व धर्मप्रसारास तोंड देण्याची कल्पना काढून तीस मूर्त स्वरूप देण्याचें श्रेय **होयसाल-वंशीय** राजा **तृतीय बल्लाळ** यासच आहे. विजयनगर साम्राज्याचा पाया वरील राजा बल्लाळनें घातला. राजा तृतीय बल्लाळ हा जैनधर्मी नव्हतां, असें इतिहासज्ञ मानीत नाहींत. राजा बल्लाळनें काढलेल्या कल्पनेस मूर्त स्वरूप देतांना ज्या राज्यकार्यधुरंधरांना राजानें पाचारण केलें होते त्यांत सेनापती (दंडनायक) बैचप्पा याच्या नांवाचा उल्लेख आहे व या बैचप्पाची ओळख इतरत्र वाचकांना करून दिलीच आहे उत्तर हिंदुस्थानांतहि गुजराथसंरक्षक जैनवीर बंधुद्वय वस्तुपाल व तेजपाल यांनीं विजयनगरच्या या प्रयत्नापूर्वीं संघटनेचा असाच यशस्वी प्रयत्न केला होता. या वरून हिंदभूच्या स्वातंत्र्यरक्षणांत जैनांनीं घेतलेल्या भागाची कल्पना येईल व या कालापर्यंत तरी अहिंसावादाचें कल्पिलेलें अनिष्ट परिणाम दिसत नव्हते हें उघड होईल.

इ. स. च्या ८ व्या शतकापूर्वी—

इ. सनाच्या ८ व्या शतकाच्या सुरवातीस हिंदुस्थान व विशेषतः दक्षिण हिंदुस्थान कसा होता याचें चित्र, मि. सूर्यनारायणराव बी. ए., एम्. आर. ए. एस्. यांनीं The never to be forgotten Empire या आपल्या प्रसिद्ध पुस्तकांत पान ९३–९४ वर रेखाटले आहे; त्यांत ते लिहितात कीं:-

" Writing about the civilization of India that there were powerful monarchies in the South, that they were well civilised in the arts of life and that they had the noble object of furthering in the interests of trade and commerce, are borne out by th solicitude which the early monarchs showed in sending

ambassadors to different European courts with the object of extending their trade." etc.

" सारांशः- हिंदुस्थानच्या संस्कृतीसंबंधानें लिहावयाचें झालें तर दक्षिण हिंदुस्थानांत प्रबल राज्यघराणीं अस्तित्वांत होतीं, व त्यांची संस्कृति सर्वांगसुन्दर होती. निरनिराळ्या युरोपियन दरबारीं आपले वकील इकडील राजांनीं पाठविलें होतें. यावरून व्यापारवृद्धीसाठीं राजांनीं घेतलेली काळजी व वाहिलेली चिंता स्पष्ट होत आहे. या राजांनीं बॅबिलोनखेरीज पृथ्वीवर इतरत्र कोठेंहि पहावयास मिळणार नाहींत अशी तळीं, कालवे व पाटबांधारे बांधून शेतीस उत्तेजन दिलें होतें. कलाकौशल्यपूर्ण उत्कृष्ट देवालयें व इमारती निर्माण करून कलेचा उत्कर्ष व कारागिरांची वाढ केलीं." वरील पुस्तकाच्या विद्वान संपादकांनीं दुसरा एक उतारा पान ९५ वर उद्धृत केला आहे. वरील उताऱ्यांत हिंदुस्थान व डेक्कन यांचा उल्लेख केला आहे व या पुढील दुसऱ्या उताऱ्यांत कर्नाटकांतील संस्कृतीचाच उल्लेख आहे. "From the 5 th century the history of the Carnrtic, is, of all, the clearest portion and is well illustrated by the inscriptions of the ruling families, the absense of which in other localities is so much to be regretted. The country appears to have been well peopled, and well cultivated, and the sea-coast afforded means of communication by sea with Egypt & Arabia. From the christan era up to the 7th century, **The Jain faith was the prevailing religion,** and as in Guzarat and other localities, where it existed, its richly decorated temples remain as proofs, not only of the highest architectural skill of the period, but of a refinement in taste which perhaps

stands almost unrivalled."

सारांश:-कर्नाटक देशांत भरपूर लोकवस्ती होती. शेती भरभराटींत होती व इ. सनाच्या ७ व्या शतकापर्यंत **कर्नाटकांत जैनधर्म हा सार्वधर्म होता.** यावरून इं. सनाच्या आठव्या शतकापर्यंत उत्तर व दक्षिण हिंदुस्थानांत सौख्य, संतति व संपति अमूप व अखंड होती हे सिद्ध होतें. शौर्यवीर्यादि पराक्रम करणाऱ्या व कर्तबगार लोकांची परंपरा अखंड होती. भाषा, शास्त्र, कला, कोशल्य इत्यादिकांची अहर्निश उन्नतीच होत होती. रा. दिवेकरांनीं उत्कर्षनिदर्शक ज्या कारणांची कसोटी दिली आहे ती सर्वच कारणें भरपूर प्रमाणांत या काळांत अढळ होत होती. जैनधर्माच्या अपकर्षाबरोबरच भारताच्या अपकर्षाला सुरवात झाली, याचें कारणहि उघड आहे. प्रो. डॉ शेषगिरीराव एम्. ए., एम्. आर. ए. एस्. म्हणतात कीं:- 'Jain religion is a religion of strength. It is not a religion of idlers.' भावार्थ:- "जैनधर्म हा बलदायक व शक्तिवर्धक धर्म आहे." डॉ. गौर म्हणतात:-- "गौतमबुद्धाच्या विचारसरणीनेंच हिंदीराष्ट्र प्रबल होईल. गौतमबुद्धाच्या विचारसरणीमुळें हिंदी लोकांत संघटन निर्माण झालें व त्या संघटनेच्या जोरावर हिंदी लोकांत परकीयांचा पराभव करण्याचें सामर्थ्य उत्पन्न झालें हें चंद्रगुप्तानें सेल्युकस निकोटरचा पराभव केला त्यावरून दिसून येत आहे. ही स्थिती पुढें हर्षकाळापर्यंत म्हणजे जवळजवळ एक हजार वर्षे टिकली. पण त्याविरुद्ध प्रतिक्रिया सुरू झाली व त्या प्रतिक्रियेनंतर अवघ्या १०० वर्षांत हिंदुस्थानावर मुसलमानांची स्वारी झाली. तींत मुसलमान विजयी झाले व हिंदुस्थान परकीय अम्मलाखालीं सांपडला." (पुणे, सकाळ ता. २१।५।३४) हर्ष घराण्याचा शेवट इ. स. ६४७ मध्यें झाला व कासमनें इ. स. ७११ हिंदुस्थानावर पहिली स्वारी केली. डॉ. गौर यांचें हें वरील मत उत्तर हिंदुस्थानांतील परिस्थितीबद्दलचें आहे हे विचारी वाचकांनीं ताडिलें असेलच. दक्षिण हिंदुस्थानावर मुसलमानांनीं इ. स. १२९६

मध्यें पहिली स्वारी केली व यापूर्वी सुमारें शंभर वर्षे इ. स. ११९५ मध्यें मुसलमान उत्तर हिंदुस्थानांत स्थिर झाले होते. यावरून अपकर्ष करणारा धर्म कोणता व अपकर्षाचा काल कोणता हें वाचकांनींच ठरवावें.

आठव्या शतकानंतर

यानंतर विजयनगरच्या निशाणाखालीं दक्षिणेंतील राजांना एकत्रित होण्यास जीं कारणें घडलीं तीं व विजयनगर साम्राज्य भरभराटीस यावयास या काळीं कशी अनुकूल परिस्थिती होती यासंबंधी विवेचन करतांना श्री. सूर्यनारायणराव पान ७३ वर लिहितात कीं:-

It will be seen from a careful perusal of the History of the ancient dynasties in the Deccan and Southern India, that the constant & ruinous wars, which these several dynasties maintained among themselves and against other invedors, had very considerably weakened the irconstitutions and unfitted them for exercising, with any show of vigour, control over their own territories, or over those which were brought under their subjection by right of conquest or forcible annexation. The fabric of the ancient royal stock of kings was too much rotten and shattered by old age and interminable wars, to afford any race, scope for proper military organization or able generalship. The political body was feeble and bloodless, the sinews of war had wasted away, and it was therefore thoroughly unfitted to stand the rush of fierce Mohamedan conquerors from the North, amongst whose armies, there was a noble spirit of

union, a great religious zeal to conquer and punish the infidels and an able generalship to harmonize the whole into one solid body and led them against any odds without fear, without hesitation and with irresistable valour, before which no feeble and half-hearted combination of old Hindu Princess could hope to stand with any chances of success."

सारांश:-सतत, अखंड व आपसांतील घातुक लढायामुळें, व बाहेरून स्वाऱ्या करणाऱ्याशीं लढावें लागल्यामुळें, दक्षिण हिंदुस्थानांतील राजेलोकांची स्वसंरक्षण व प्रतिकारशक्ती जवळ जवळ नष्टच झाली होती. सतत युद्धामुळें व वार्धक्यामुळें राजयष्टी जीर्ण झाली होती.

हिंदुस्थानचें सर्व बल एकवटून, एका पुढाऱ्याच्या राष्ट्रझेंड्याखालीं योद्धयांना उभे करून परचक्रापासून आपलें संरक्षण करणें शक्य आहे, एरव्हीं नाहीं. याचें प्रत्यंतर हिंदुस्थानास दोन वेळां आलें. डारिअस् व शिकंदर यांना जें थोडेंबहुत यश मिळालें, त्याचें कारण तें त्यावेळीं हिंदुस्थानांत सम्राट -सार्वभौम-एकछत्री राज्य करणारा राजा कोणीच नव्हता, हे आहे. म्हणूनच या स्वाऱ्यांच्या वेळीं ही उणीव व चूक दिसून आली व चंद्रगुप्तानें ती चूक दुरुस्त करून सार्वभौम राज्य उभारलें. इ. सनापूर्वीं सुमारें चारशें तें गुप्त हर्षाच्या म्हणजे इ. स ६४७ पर्यंतच्या सुमारें एक हजार वर्षांच्या काळांत बरेच सार्वभौम राजे होऊन गेले व त्याच कालांत परकीयांनीं हिंदुस्थानाकडे ढुंकूनही पाहिलें नाहीं. कासिमच्या सिंध प्रांतावरील स्वारीच्या वेळीं, (इ स. ७११) शहाबुद्दीन घोरीच्या स्वाऱ्यांच्या वेळा व अल्लाउद्दीन खिलजी व त्याचा शूर सरदार मलिक काफूर याच्या दक्षिण हिंदुस्थानावरील स्वाऱ्यांच्या काळीं सार्वभौम राजा कोणीच्च नव्हता. अलेक्झांडरच्या स्वारीनंतर चंद्रगुप्तानें जशी चुकीची दुरुस्ती केली तशाच्च दुरुस्तीचा उपक्रम विजयनगर साम्राज्य स्थापून करण्यांत आला. मराठेशाहीचा राज्यविस्तारही याच धोरणाचें

द्योतक होय. आज ज्ञात इतिहासावरून राजांचा संघ निर्माण करून परचक्रास विरोध करणारी संघशक्ती(Con-federation-Federation) निर्माण करण्याचें श्रेय सम्राट चंद्रगुप्त, वस्तुपाल, तेजपाल, होयसाल, राजा तृतीय बल्लाळ व दंडनायक वैचपादि यांना आहे व हे सर्व, अहिंसावादी व जिनानुयायी होते हें नमूद करण्यास कोणत्या अहिंसावाद्यास अभिमान वाटणार नाहीं ?

वर जो उतारा उद्धृत केला आहे, त्यावरून मुसलमानांच्या दक्षिणेंतील स्वाऱ्यापूर्वी ह्मणजे इ. सनाच्या दहाव्या, आकराव्या व बाराव्या शतकांत दक्षिण हिंदुस्थानची राजकीय परिस्थिति किती अनुकंपनीय झाली होती हें कळून येईल.

या अनुकंपनीय स्थितीचा फायदा घेऊन इस्लामी संस्कृती व मुसलमान हे आपल्या संस्कृतीला व देशाला ग्रासून टाकतील असें वाटल्यानें विजयनगरचें राज्य स्थापन झालें. ह्मणजे या राज्याच्या संस्थापनेसहि हें राज्य बलवान् झाल्यानंतर त्याच्या नाशासहि मुसलमानच कारणीभूत झालें. जगन्मिथ्यावाद व अहिंसातत्व यांच्या मानीव दुष्परिणामाचीं पाळेंमुळें या साम्राज्याच्या २५० वर्षांच्या कालांतहि खणून न काढितां आली, याचीहि कारणें वरील तत्वें आहेत असें मानिल्यास सामान्य हरिअप्पास विजयनगर साम्राज्याचा पहिला हरिहर राजा कसें होतां आले हा दिवेकरांच्या मतें कूट प्रश्न ठरेल काय ? हा चक्रनेमिक्रम आहे. विजयनगर साम्राज्याला धुळीस मिळविणाऱ्या दक्षिणेंतील मुसलमानांना दिल्लीचा बादशाहा औरंगजेब कर्दनकाळ झाला व पुढें दिल्लीचें तक्तहि मराठ्यांच्या ताब्यांत आलें ; तीच मराठेशाही बुडवून इंग्रज सत्ताधिश झाले. या घडामोडींतील सर्वच राजे मांसाहारी होते. जित व जेत्या मुसलमानांना जगन्मिथ्यावाद व अहिंसातत्व यांची ओळखहि नव्हती हें सांगणेंहि नलगे !

धर्मद्वेष व धर्मयुद्धें

उत्तर हिंदुस्थानांतील राजेरजवाड्यांची मुसलमानांच्या

स्वाऱ्याच्या वेळीं जशी अनुकंपनीय स्थिती होती, तशीच हुबेहुब परिस्थिति मुसलमानांच्या स्वाऱ्या होण्याच्या सुमारास दक्षिण हिंदुस्थानांत होती. इकडील राजेरजवाड्यामध्यें अखंड युद्धें चालली होतीं व त्यामुळें हा देश खिळखिळा झाला होता याबद्दल वाद नाहीं. अशा युद्धांच्या मुळांशीं कारणें तरी कोणती होतीं ? आपलें सत्तावर्चस्व व्हावें म्हणूनहि कांहीं युद्धें झालीं, पण त्याहिपेक्षां सत्तावर्चस्व मिळवून त्या नव्या प्रदेशांत व प्रजेंत आपल्या धर्माचा प्रसार करावा या भावनेनें प्रेरित होऊनच अनेक युद्धें झालीं. दुसऱ्या दृष्टीनें विचार करितां हीं युद्धें धर्मयुद्धेंच होत. द. हिंदुस्थानांत इ. स. च्या ८ शतकापर्यंत जैनधर्म हा सार्वधर्म-राष्ट्रधर्म व राजधर्म होता ; यामुळें जैनांना इतरांचा द्वेष करण्याचें कारणच राहिलें नव्हतें. जैनधर्माला या उच्चस्थानापासून च्युत करून त्या जागीं आपल्या धर्माला स्थान मिळावें म्हणून शैव, वैष्णव व वीरशैवादिकांनीं आपली सर्व पुण्याई खर्चिली. यावेळीं जैनधर्मद्वेषी लोकांकडून जैनधर्मीयांचा जो अनन्वित छळ झाला त्याचें वर्णन वाचून असे स्पष्ट म्हणतां येईल कीं मुसलमानांच्या धर्मवेडेपणाच्या निर्दय व क्रूर कृत्याबद्दल हिंदूंना तरी मुसलमानांना नावें ठेवण्याचा मुळींच अधिकार पोंहोचत नाहीं. जैनांच्या बाबतींत हिंदूंनीं सुमारें चार शतकें जें वर्तन केलें त्याचेंच अनुकरण मुसलमानांनीं केलें असें फार तर म्हणतां येईल. दोघेंहि एका माळेचेंच मणी. यांत काळेबेरें निवडण्यांत अर्थ नाहीं. हिंदूंनीं अशा निर्दय कृत्यांची चित्रांकित नोंद करून वंशपरंपरागत जागृत स्मारकें करून ठेविलीं आहेत. या बाबतींत हिंदूंच्या दृष्टीनें मुसलमान मागासलेले खास आहेत.

या धार्मिक, राजकीय व सामाजिक असहिष्णुत्वाचा अनिष्ट व अपेक्षित असाच परिणाम झाला. उत्तर हिंदुस्थानांतील राजेरजवाड्यां मधील दुही, ईर्षा, असूया, दुसऱ्यांच्या अपकर्षांत व अडचणींत आपला उत्कर्ष व संतोष मानण्याची प्रवृत्ती, राष्ट्रनेत्या सम्राटाचा अभाव वगैरे कारणांनीं मुसलमानांना उत्तर हिंदुस्थान मुक्तद्वार बनलें. मुसलमानांच्या दक्षिण हिंदुस्थानांतील स्वाऱ्यांच्या वेळींहि प्रायः अशीच परिस्थिति

होती. या सुमारास द. हिंदुस्थानांत धर्माच्या नांवाखालीं जैनांचा अनन्वित छळ झाला होता. सर्वांवरील संकट म्हणून मुसलमानांच्या वाढत्या सत्तेला विरोध करण्यासाठीं हिंदू व जैन हे जरी त्यावेळीं एका निशाणाखालीं गोळा झाले होते तरी जैनाविषयींची तेढ नष्टच झाली होती असें नाहीं. विजयनगर घराण्यांतील दूरदृष्टी व सुप्रसिद्ध बुक्करायानें अशा तेढीचें दुष्परिणाम ताडिलें व राज्याचें आधारस्तंभ जें जैनधर्मीय त्यांना संतुष्ट राखण्यासाठीं व त्यांच्या सामर्थ्याचा उपयोग करून घेण्यासाठीं दरबारांतील जैन व वैष्णव पुढाऱ्यांमध्ये एक संस्मरणीय तहनामा घडवून आणून विजयनगर राज्यांत जैन व वैष्णव धर्म हे दोन्ही समान आहेत व त्या त्या धर्माच्या अनुयायांनीं परस्परांशीं गुण्यागोविंदानें, व बंधुभावानें वागावें व आपापल्या मताप्रमाणें वागावे अशी द्वाहि फिरविली. विजयनगरच्या राज्याच्या उत्कर्षकालांतहि असा तहनामा घडवून व तत्प्रीत्यर्थ दरबार भरवून जैन व वैष्णव पुढाऱ्यांचे हात स्नेहाचें व ऐक्यबुद्धीचें दर्शक म्हणून एकमेकांचे हातांत दिलें. राजे लोकांत हरहमेशा तहनामे होतात ; परंतु आपल्या प्रजेमधील या दोन भिन्न धर्मीयांत सहिष्णुता उत्पन्न करून ती वाढीस लावावी व राज्यास बळकटी आणावी म्हणून राजानें हा जो संस्मरणीय तह घडवून आणिला. त्याला तसेंच जबर कारण असल्याखेरीज राजाला मध्यस्थाची भूमिका घेण्याचें कारण कोणतें? राजकारणांतील व व्यवहारांतील प्रत्यक्ष सहिष्णुतेचें महत्व राजाला कळलें होतें हें एकच कारण या तहनाम्याच्या मुळांशीं असावें. प्रो. पुणतांबेकर यांनीं " नागरिकनीति " या आपल्या पुस्तकांत पान १४६ वर सहिष्णुतेचें महत्व खालीलप्रमाणें वर्णिलें आहे. ते ह्मणतात:-"खऱ्या धार्मिकतेच्या दृष्टीनें हे सहिष्णुतेचें तत्व मान्य करून आचरणांत आणिलें पाहिजे. जे नागरिक या तत्वाच्या विरुद्ध वागतात ते राष्ट्रभक्त व मानवप्रेमी नाहींत. ते राष्ट्राचे, खऱ्या धर्माचे, नीतीचे व मानवजातीचे शत्रू आहेत. त्यांच्या कठोर व कनिष्ट दुर्नीतीमुळें लोकांचे कल्याण व प्रगति कुंठित होते." प्रो. पुणतांबे,

कर यांनीं असहिष्णुतेचें जे दुष्परिणाम वर्णिलें आहेत, ते जैनांच्या छळामुळें हिंदुस्थानला आलेल्या अनुभवावरूनच वर्णिलें असावेत कीं काय अशी जबर शंका येते.

प्रकरण ९ वें

अपकर्षाची कारणपरंपरा

रजपूतकाळ

ग्रीक लोकांच्या पराजयानंतर सुमारें एक हजार वर्षेपर्यंत हिंदुस्थानाकडे डोळा उघडून पाहण्याची कोणाहि परकीयांची छाती झाली नाहीं. हिंदुस्थानावर स्वारी करण्यांत आपला नाश आहे याची त्यांना खास जाणीव झाली असावी. मौर्य घराण्यानंतर महामेघवान खारवेलचें घराणें, उदयास येऊन सम्राटपदास पोंहचलें. गुप्त राज्यघराणें, विक्रमादित्य, राजा हर्षवर्धन वगैरे विजयशाली राजे व राज्यघराणीं होऊन गेली. गुप्तघराण्याचा अंत इ. स. ६४७ सालीं झाला. गुप्तांच्या कारकिर्दीत मौर्य अगर खारवेलकालीन सत्तेप्रमाणें जरी एकछत्री राज्य हिंदुस्थानांत राहिले नव्हतें, तरी अधिराज्य म्हणून तसाच प्रसंग आल्यास एका निशाणाखालीं हिंदुस्थाननें जमणें अशक्य नव्हतें. याचेंच प्रत्यंतर म्हणजे ज्या हूणांनीं सर्व युरोपभर धुमाकूळ घालून जेथें विजय संपादिला त्याच हूणांना हिंदुस्थानावरील स्वारींत पराभूत व्हावें लागले. ख्रिस्तपूर्व ८०० तें इ. सन ८०० या काळास इतिहासज्ञ सुवर्णयुग असें म्हणतात तर ब्रम्हश्री दिवेकर त्यास अपकर्षाचा काळ असें निःशंकपणें म्हणतात. यापुढील कांहीं काळांत हिंदुस्थानांत व विशेषतः उत्तर हिंदुस्थानांत प्रवेश करण्याच्या दरवाज्याच्या आसपासच्या भागांत लहान लहान रजपूत राजे राज्य करूं लागले. तेथें भारतीय युद्धानंतरच्या काळांतील इतिहासाची पुनरावृत्ति झाली. परकीयांच्या स्वाऱ्यांची भीति नाहींशीच झाली होती. शिकंदर-सेल्यूकसच्या

स्वाऱ्यांचें विस्मरण पडण्याइतका दीर्घकाळ लोटून गेला होता व हूणा-वरील जयामुळें फाजील आत्मविश्वास उत्पन्न झाला होता. या लहानसान रजपूत राजांमध्यें आपसांत कलह सुरू झाले, राज्यसत्तेसाठीं ईर्ष्या, असूया वगैरेनीं राजदरबारीं ठाण दिलें होतें, मी सूर्यवंशी, तू चंद्रवंशी व तो अग्निवंशी असा आपल्या वंशाबद्दलचा दुराभिमान व दुसऱ्या वंशाबद्दलचा द्वेष माजून राहिला होता. परभारे एखाद्याचा नाश झाल्यास त्यांत दुसऱ्यांनीं समाधान मानावें इतक्या विकोपाला या द्वेषाची मजल गेली होती. राजे भोगप्रिय असल्यानें विलासांत मग्न झाले होते. बाहुबल दाखवून सम्राट् म्हणवून घेण्याची महत्वाकांक्षा न धरितां दिग्विजयाचे द्योतक अश्वमेधयज्ञ अगर राजसूययज्ञ करूनच दिग्विजयी झालों असा बहाणा करून नाटकी सम्राट् होण्याची महत्वा-कांक्षा उत्पन्न झाली होती. राष्ट्रधर्म, राज्यधर्म व समाजधर्म यांनाच काय पण वैयक्तिक व्यवहारधर्मालाहि राजेलोक पारखे झाले होते. जन्मभर अन्यायानें व अनीतीनें पैसा मिळवून कंजूषपणानें द्रव्यसंचय करावा व मृत्युपत्रानें आपल्या पश्चात् त्याचें दान करावें असाच हुबेहुब प्रकार यावेळच्या राजे लोकांच्या यज्ञाच्या मुळाशीं दिसतो. स्त्रियांचा व संपत्तीचा अभिलाष यांनीं राजे लोकांच्या विलासमंदिरावर कळस चढविला होता. रजपूत राजांत व त्यांच्या प्रजेंत क्षात्रतेज नव्हते असें नाहीं, परंतु त्याचा दुरुपयोग होऊन या शक्तीचा ऱ्हास होत चालला होता. राजे कट्टर अहिंसावादी होते अगर प्रजाहि अहिंसावादाच्या खुळ-चट कल्पना उराशीं बांधून होती अशीहि परिस्थिति नव्हती. कारण गुप्त घराण्याच्या अखेरच्या काळांत उत्तर व दक्षिण हिंदुस्थानांत बौद्ध व जैनधर्माला ओहटी लागली होती व शंकराचार्यादिकांचा संन्यास वादाच्या तत्वज्ञानाचा प्रसार होत होता. हें तत्वज्ञान तर या अपकर्षाच्या प्रमुख कारणापैकीं एक कारण तर नसेल ना ?

हिंदुस्थानावरील मुसलमानांच्या पहिल्या स्वारीचें आधिपत्य कासीमकडे होते. या स्वारीच्या (इ. स. ७११) मुळाशीं राज्यलोभ

अगर द्रव्याभिलाष नसून मक्केच्या यात्रेस जाणाऱ्या मुसलमानांना सिंधमधील हिंदूंनीं लुटल्यामुळें ही स्वारी झाली. गुप्तघराण्याच्या अंतानंतर हा काल सुमारें ५० वर्षांचा आहे. सिंध प्रांतांत त्यावेळीं राज्य करीत असणाऱ्या दाहरनें लढाई लढविलीं. दाहर लढाईंत मारला गेल्यावर दाहरच्या वीरपत्नीनें सैन्याचें आधिपत्य स्वीकारून चढाईचा लढाई दिलीं, परंतु रणदेवता तिलाहि वश झाली नाहीं. दाहरच्या दोघी मुलींना कासिम खलिपाकडे घेऊन गेला. त्यांनीं कासिमविरुद्ध खलिपाचें मन कलुषित केल्यानें कासिमचा खलिपानें वध केला. कोणत्याना कोणत्या तरी उपायांनीं आपल्या बापाच्या वधाचा सूड या मुलींनीं उगविला.

या पहिल्या चकमकींतील अपजयाची जीं कारणें दिली आहेत, त्यांत शत्रूपक्षाला फितूर होऊन हिंदूंच्या हालचालींची बित्तं बातमी देणाऱ्या हिंदूची कारवाई हें एक होतें. या देशद्रोही कारणाशिवाय फाजील आत्मविश्वास व त्यामुळें येणारा बेसावधपणा वगैरे कारणें आहेत. यावेळीं जो प्रकार घडला त्याचीच पुनरावृत्ति शहाबुद्दीन घोरीच्या स्वाऱ्यांच्या वेळीं झाली. सिंधवर विजय मिळवून कासिम मुलतानकडे वळला. मुलतान सर झाल्यावर राजपुतान्याकडे त्याचा मोर्चा फिरला. यावेळीं चितोड राजाचा सेनापति बाप्पा रावळ यानें कासिमचा पराभव करून त्यास पिटाळून लाविलें. शूर रजपुतांनीं मुसलमानांना यावेळीं जोरानें तोंड दिलें नसतें तर मुसलमानांची सत्ता तेराव्या शतकांत स्थिर होण्याऐवजीं ती ८ व्या शतकांतच स्थिर झाली असती. गुलामगिरी पांचशें वर्ष थोपवून धरण्याचें श्रेय रजपुतानांच आहे. कासिमच्या पराजयानंतर सुमारें २५० वर्षें हिंदुमुसलमानांत लढाया झाल्याचा दाखला उपलब्ध नाहीं. गिझनी घराण्याचा सबक्तगीन व पंजाबचा राजा जयपाळ (ब्राम्हण) यामध्यें दोनदां लढाया झाल्या व त्यांत जयपाळचाच मोड झाला. हा काळ इ. स. ९८० चा होय. या सबक्तगीनचा मुलगा सुलतान महंमद गिझनी यानें इ. स. १००१ तें १०३० पर्यंतच्या ३० वर्षांच्या काळांत

हिंदुस्थानावर एकंदर १७ स्वाऱ्या करून अपार संपत्ति लुटून नेली. जयपाळचा मुलगा अनंगपाळ यानें महंमद गिझनीस तोंड देण्याचा अनेक वेळां प्रयत्न केला. परंतु तो निष्फल ठरला व अनंगपाळच्या मुलानें महंमदाचें मांडलिकत्व पत्करल्यानें पंजाब मुसलमानी अंमलाखालीं गेला.

गिझनीचा महंमद इ. स. १०३० सालीं मरण पावला व त्यानंतर सुमारें १५० वर्षांपेक्षां अधिक काळपर्यंत हिंदुस्थानावर मुसलमानांची स्वारी झाली नाहीं; मात्र सिंध व पंजाब हे मुसलमानांच्या सत्तेखालील मुलूख म्हणून गणलें जाऊं लागले. गिझनीच्या महंमदाप्रमाणें महंमद घोरीनेंहि हिंदुस्थानावर एकंदर सात स्वाऱ्या केल्या. यापैकीं इ. स. ११९१ च्या चौथ्या स्वारींत दिल्लीचा राजा पृथ्वीराज चव्हाण यानें महंमद घोरीचा स्थानेश्वरच्या लढाईंत पूर्ण पराभव करून त्यास कैद केलें. परंतु शरणांगत-संरक्षक पृथ्वीराजानें त्यास जीवदान दिलें. या अपयशामुळें डिवचून सोडलेल्या सापाप्रमाणें चिडलेल्या महंमदानें इ. स. ११९३ मध्यें जोराची तयारी करून फिरून दिल्लीवर स्वारी केली. पृथ्वीराजाशीं सामना झाला व पृथ्वीराजाचा अकल्पित पराजय होऊन तो शत्रूच्या हातीं सांपडला. आपणास जीवदान देणाऱ्या पृथ्वीराजाचा महंमदानें वध करून आपल्या विजयाच्या वाटेंतील कांटा काढून टाकिला. त्यावेळीं कनोजचा राजा जयचंद (जयचंद्र) हा मुसलमानांना सामील होता. पुढील सालीं जयचंदाचीहि महंमदानें हीच वाट लाविली. गिझनीच्या महंमदाच्या स्वाऱ्या राज्यविस्तारासाठीं नव्हत्या, या उलट घोरी महंमदानें राज्यविस्तारासाठींच स्वाऱ्या केल्या व इ. स. ११९५ च्या सुमारास मुसलमानांचें राज्य उत्तर हिंदुस्थानांत स्थिर केलें.

शहाबुद्दीन घोरी यास हिंदुस्थानावर स्वारी करून आपलें राज्य स्थापन करून तें स्थिर करण्यास जी संधी मिळाली त्याचें प्रमुख कारण कोणतें यासंबंधी सुप्रसिद्ध इतिहासज्ञ श्री० विश्वेश्वरनाथ रेड हे राष्ट्रकट राज्यघराण्यासंबंधी आपल्या ' भारतके प्राचीन राजवंश ' या प्रसिद्ध पुस्तकांत लिहितात कीं, ' कनोजचा प्रतापी राष्ट्रकूट राजा

जयचंद यानें राजसूययज्ञ करून आपली मुलगी संयोगिता हिचें स्वयंवर पद्धतीनें लग्न करण्याचें ठरविलें. हा विवाहच हिंदुस्थानच्या स्वातंत्र्याला व नाशाला कारणीभूत झाला. या स्वयंवर उत्सवप्रसंगींच पृथ्वीराज चव्हाणनें तिचें हरण केलें व यामुळें राजा जयचंद व पृथ्वीराज यांचे आजन्म हाडवैर पडलें. या दुहीचा फायदा मुसलमानांनीं घेतला. इ. स. ११७५ च्या सुमारास " संयोगिताहरणाचा " अनिष्ट परिणाम घडला. जयचंदानें शहाबुदीनास पहिल्या स्वारींत राखेचे तोबरे चारलें, परंतु दुसऱ्या स्वारींत जयचंदास पराभूत व्हावें लागलें. कलंकित मुख घेऊन जगण्यापेक्षां मरण बरे असें वाटून जयचंदानें गंगेंत आत्महत्या केली. "

पृथ्वीराज व जयचंद या दोघांत कभी कामांध कोण होता हें ठरविणेंहि दुष्कर्मच आहे. पृथ्वीराजानें कामतृप्तीसाठीं ११ बायका केल्या, तर जयचंदानें आपल्या मंत्र्याच्या उपस्त्रीला आपल्या जनानखान्यांत आणून ठेविलीं. आपल्या मुलास राज्याधिकार मिळवून देण्यासाठीं ही शहाबुद्दीन घोरीची सी. आय्. डी. झाली व तिच्या तंत्रानें वागणारा व पृथ्वीराजाच्या सूडबुद्धीनें सारासार विचारास पारखा झालेला जयचंद विश्वासघातकी व देशद्रोही झाल्याचा संशय इतिहासकार घेतात. या सर्व कारणामुळें शहाबुद्दीन घोरी विजयी झाला व संयोगिताप्रकरणानंतर अवघ्या २० वर्षांत त्यानें हिंदुस्थानांत आपलें राज्य स्थिर केलें ! ! उत्तर हिंदुस्थानांत मुसलमानांचें राज्य स्थिर होण्याचीं हीं व अशीच कारणें आहेत ; त्यांत अहिंसा धर्माचा अगर जगन्मिथ्यावादाचा दूरचाहि संबंध नाहीं हें उघड होत आहे.

उत्तर हिंदुस्थानावरील स्वाऱ्यांचा थोडयाशा पाल्हाळानें उल्लेख करणें प्रस्तुत पुस्तकाच्या दृष्टीनें अनाठायीं आहे असा आक्षेप येण्याचा संभव आहे, परंतु मुसलमानांना हिंदुस्थानांत राज्यस्थापन करण्यास अहिंसातत्व व जगन्मिथ्यावाद हीच प्रमुख कारणें आहेत असें जें वेळीं अवेळीं प्रतिपादन करून जैन व बौद्ध धर्माची निंदा केली जाते ती किती फोल, अयथार्थ, विचारशून्य व विकारग्रस्त आहे हें दाखवितांना

या स्वाऱ्यांचा काळ, त्यावेळीं हिंदूंनीं केलेले पराक्रम व अपयशाचीं खरीखुरीं कारणें कळल्यास अहिंसादि तत्वावर घेतलेल्या वृथा व बाष्कळ आक्षेपांचें खंडन होणार आहे व एवढ्याच हेतूनें या दिशेनें लिहावें लागलें. दक्षिण हिंदुस्थानावर मुसलमानांचे पाऊल केव्हां पडले व त्यावेळीं जैन कसें लढलें यांची त्रोटक माहिती देण्यापूर्वी उत्तर हिंदुस्थानांत मुसलमानांना जय कां मिळाला व हिंदूंचा पराभव कां झाला यांच्या कारणांची सारांशरूपानें संकलित माहिती या खालीं दिली आहे.

(१) आपसांत फूट-धर्मप्रसार कार्यांतील व राज्यविस्तारांतील, असहिष्णुता, देशद्रोह, स्वामीद्रोह, ऐक्याचा अभाव.

(२) राष्ट्रीय भावनेचा अभाव-दुसऱ्याच्या नाशांत समाधान, स्वतःच्या पायापुरती अदूरदृष्टी.

(३) फाजील आत्मविश्वास-पृथ्वीराजाची अनुचित क्षमा, महंमद घोरीला जीवदान,-फाजील आत्मविश्वासामुळें येणारा बेसावधपणा.

(४) हिंदी सम्राटाचा अभाव-राजकीय, सामाजिक व धार्मिक बाबतींतील विस्कळितपणा, भारतसंरक्षणाची जबाबदारी फारच थोड्या व्यक्तीवर टाकण्याची संवय व त्याचे दुष्परिणाम.

(५) स्पर्शास्पर्श-विटाळादिकांच्या खोट्या कल्पना व त्यामुळें अन्नादिकांना मुसलमानांचा स्पर्श झाल्यानें हिंदी सैनिकांना उपाशीं लढण्याचा प्रसंग.

(६) मुसलमानांचा स्वदेश फार दूर, यामुळें रणांगणांतून पळ काढला तरी मृत्युची भीति असल्यामुळें एकतर जिंकावें अगर लढाईंत मृत्यु स्वीकारावा या बाण्यानें ते लढत असत.

(७) ईश्वरविषयक खोट्या कल्पना व दैवाधीन राहण्याची प्रबल इच्छा.

वरील मुख्य कारणें पराजयाच्या व पारतंत्र्याच्या मुळाशीं आहेत. अहिंसाधर्म व जगन्मिथ्यावाद हीं या अपकर्षाच्या व अवनतीच्या मुळाशीं मुळींच नाहींत.

मुसलमानांचें दक्षिणेंतील आक्रमण

पृथ्वीराजाच्या पराजयानंतर व वधानंतर सुमारें एक शतक लोटल्यावर अल्लाउद्दीन खिलजीनें इ. स. १२९६ मध्यें दक्षिण हिंदुस्थानांत राज्यविस्तार करण्यासाठीं विंध्याचल ओलांडून दक्षिणेंत प्रथम पाऊल ठेविलें. देवगिरीच्या यादव राजानें यावेळीं कबूल केलेली खंडणी दिली नाहीं म्हणून अल्लाउद्दीननें आपला विश्वासू सरदार मलिक काफर यास देवगिरीच्या यादव राजाकडून खंडणी वसूल करण्यासाठीं इ. स. १३०८ मध्यें दक्षिणेंत पाठविले. मुसलमानांची दक्षिणेंतील ही दुसरी स्वारी होय. तिसरी स्वारी इ स. १३१० मध्यें झाली व यादवराज शंकरदेव यास ठार मारून यादवांचा मुलुख मुसलमानांनीं आपल्या राज्यास जोडला. इ. स. १३२६ मध्यें विजयनगर राज्याची स्थापना असें मानिलें जाते, परंतु होयसाल तृतीय बल्लाळ याच्या वधानंतर (इ. स. १३४६) कांहीं वर्षांनीं हरिअप्पा हा विजयनगरचा राजा झाला. दक्षिणें-तील राजांचा संघ स्थापन करण्याचें नेतृत्व या बल्लाळ राजाकडेच दिलें जातें. हा बल्लाळ राजा जैन नव्हता असें इतिहास मानीत नाहीं. विजय-नगरचें राज्य स्थापन होण्यापूर्वींच मलिक काफरनें तैलंगण व द्वारसमुद्र व कोरोमंडेल किनाऱ्यापर्यंतच्या राजांना जिंकून दिल्लीच्या बादशहाचें मांडलिकत्व कबूल करावयास लाविलें होते. खिलजी घराण्याच्या सत्ते-एवढी सत्ता मोंगल साम्राज्याच्या भरभराटीच्या काळांतहि स्थापन करितां आली नाहीं असें इतिहासज्ञांचें मत आहे.

कर्नाटक जैनकाळ

उत्तर हिंदुस्थानांत मुसलमानी राज्याचा पाया स्थिर होऊन त्या राज्यवृद्धीस जीं कारणें झालीं त्यांची जाणीव दक्षिणेंतील राजेरजवाड्यांना होऊन चुकली होती. मुसलमानांच्या वाढत्या सत्तेस, वरंगळचा राजा प्रतापरुद्र व देवगिरीचा यादवराजा या दोघांनीं आपसांत ऐक्याचा तहनामा करून पायबंद लावण्याचा प्रथम प्रयत्न केला, परंतु तो अयशस्वी ठरून इ. स. १३१८ मध्यें देवगिरीचें व इ. स. १३२३ मध्यें

वरंगळचें अशी दोन्हीं राज्यें मुसलमानांच्या भक्ष्यस्थानीं पडलीं. दुसरा यशस्वी प्रयत्न कर्नाटकचा राजा तृतीय बल्लाळ यानें केला व त्या यशस्वी प्रयत्नाचें फळ म्हणजे विजयनगरचें साम्राज्य होय. इ. स. १३२६ च्या सुमारास या बल्लाळ राजानें दक्षिणेंतील सरदार व सेनापतींची जी सभा बोलाविली त्या सभेस हजर असणाऱ्या वीरवरांच्या नांवाचा उल्लेख असलेला इ. स. १३२८ मधील एक शिलालेख उपलब्ध झाला आहे. त्यावरून बलशाली भीमराय, सरदार कठोरहर, सिंह रघुनाथ, वीर कालमेघ, वीर शांत, दंडनायक चमूप, बैचप्पा, विख्यात मुत्सद्दी बालप्पा, दंडनायक सोमय्या व दंडनायक सिंगय्या वगैरे वीरशिरोमणी या संघाच्या सभेस हजर होते असे कळून येते. या संघाच्या सभासदापैकीं संघनायक कर्नाटकाधिपती बल्लाळ, दंडनायक सिंगय्या हे या संघनायकाचे समीपवर्ती आप्त व दंडनायक बैचप्पा व मुत्सद्दी बाळप्पा हे जैनधर्मीय होते. यावरून इ. सनाच्या चौदाव्या शतकाच्या पूर्वार्धांत मुसलमानांशीं विरोध करण्याचें, कर्नाटकांत त्यांचें राज्य होऊं न देण्याचें व कर्नाटकचें स्वातंत्र्यरक्षण करण्याचें कंकण जैनांनींच बांधिलें होतें हें सिद्ध होत नाहीं काय? विजयनगर साम्राज्याच्या भरभराटीच्या काळांतहि जैनांनीं आपली जबाबदारी उत्कृष्ट रीतीनें पार पाडिलीं व या साम्राज्याच्या नाशानंतरहि मुसलमानांचें आधिपत्य न स्वीकारितां स्वतंत्रपणें राज्यकारभार पहाणारे जैनवीरच अनेक आहेत. कर्नाटकचा हा इतिहास काय शिकवितो याचा विचार वाचकांनींच करावा. या काळास कर्नाटकजैनकाळ असें संबोधल्यास तें युक्त होणार नाहीं काय?

यावरून बाराव्या शतकाच्या अखेरीस उत्तर हिंदुस्थानांत मुसलमानांचे राज्य स्थिर झालें व पुढील अवघ्या शंभर वर्षांत त्याचा विस्तार दक्षिणेंत झाला. इ सनाच्या ७ व्या शतकाच्या मध्यास गुप्तसाम्राज्य नष्ट झालें. इ. स. ८ व्या शतकाअखेर जैनधर्म हा सार्वधर्म होता. ॲलेक्झांडरच्या-शिकंदरच्या-स्वारीपासून तो गुप्त-घराण्याच्या अंतापर्यंतच्या एक हजार वर्षांच्या काळाला **हिंदुस्थानचा**

" **सुवर्णकाल** " असें मानिलें जाते. याच काळांत जैन व बौद्ध धर्माची ध्वजा हिंदुस्थानभर दिमाखानें फडकत राहिली होती. यावरून या दोन धर्माच्या उत्कर्षांत हिंदुस्थानचा उत्कर्ष झाला व या दोन्ही धर्माच्या अपकर्षास जेव्हां सुरवात झाली त्याचकालीं हिंदुस्थानच्या अपकर्षास सुरवात झाली. जैनधर्माच्या अवनतीचा मध्यान्ह काळ व हिंदुस्थानांतील मुसलमानांच्या स्थैर्याचा काळ हेंहि एकाच वेळीं जमून येतात. यावरून जैनधर्माच्या अपकर्षास व उच्छेदनास ज्यांचें श्रम कारणीभूत झालें तेच लोक, तोच धर्म व त्या धर्माचे अनुयायी हेंच या पारतंत्र्याला–हिंदुस्थानच्या गुलामगिरीला–कारणीभूत आहेत असें ह्मणण्यास कोणताच प्रत्यवाय राहत नाहीं. वस्तुस्थिति अशी असतां व इतिहासावरूनच हेंच अनुमान निघत असतां " **चोरांच्या उलट्या बोंबा** " या ग्राम्य म्हणीप्रमाणें हिंदूधर्मीय हिंदुस्थानची गुलामगिरी जैनधर्मी अहिंसा तत्वाच्या पदरीं बांधीत आहेत. काळ, मान व परिस्थिति बदलली असतांहि जैनधर्माच्या बाबतींत आक्षेपकांच्या पूर्वजांनीं घालून दिलेली प्रथा आजहि इमानेंइतबारें पाळली जाते, हें देशाचें सुचिन्ह कीं दुश्चिन्ह हें भावी काल ठरविणार आहे.

प्रकरण १० वें

हिंदुधर्माची शिकवण.

भारतीय राजेरजवाड्यामधील संघटनेच्या अभावीं व परस्पर वैरामुळें मुसलमानांना हिंदुस्थानांत स्थिर होता आले. हिंदुधर्मानें तर हिंदुधर्मीयांत संघटना व्हावी अशी शिकवण केव्हांच दिली नाहीं. उलट मनुष्यजातींत उच्चनीच भेद पाडिलें, धंद्यानें व जन्मानें ब्राम्हण म्हणून त्यांना भूदेवाच्या ठिकाणीं बसविलें, क्षत्रियवंश नष्ट झाल्याची द्वाही फिरविली, इतरांना शूद्र लेखून त्यांना दूर लोटिलें. ही उच्चनीचत्वाची कल्पना मानवजातीपुरती ठरवून ब्राम्हणांचें समाधान झालें नाहीं. पशुयोनींतीहि ब्राम्हण व शूद्र पशू असे भेदाभेद पाडिलें. गाईला गोमाता ठरवून तिच्या पोटांत ६४ कोटी देवांना वसतीला जागा दिलीं. तरू-कोटींतील वडपिंपळांना ब्राम्हण व इतर झाडांना शूद्र ठरविलें. वनस्पतीवर्गांत तुळसीला ब्राम्हण बनविलें, पक्षांत भारद्वाजाला द्विज व कावळ्याला शूद्र ठरविलें. नदीनदांतहि असाच भेदभाव मानिला. फार काय देवादिकांतहि श्रेष्ठ कनिष्ट असें वर्गीकरण केलें.

अशारितीनें **ब्राह्मण व गाय** यांना भलत्या महत्वास चढविलें व लोकांना कर्मयोगापासून-कर्तव्यापासून—च्युत करून त्यांना निवृत्तिपर व **नशिबाच्या** हातांतील बाहुलें बनविलीं. आपलें स्तोम माजविण्यासाठीं ज्योतिषशास्त्राकडे व आकाशांतील ग्रहांच्या अनुकुलतेकडे व प्रतिकुलतेकडे पाहण्याची खोड लोकांना लाविलीं. देव, ब्राम्हण, इत्यादिकांच्या आशिर्वादावर व

शापउःशापावर भारतीयांना झुलवलें. सोंवळेओंवळे, हव्यकाव्य, श्राद्धपक्ष, पूजाअर्चा वगैरेचें खूळ मातविलें. खऱ्या धर्मापासून खऱ्या नीतिमत्ते पासून व खऱ्या कर्तव्यकर्मापासून लोकांना च्युत केलें. यज्ञांत हिंसा, व अतिथीसत्काराच्या निमित्तानें सुरापान व मांसभक्षण व पितृतर्पणाच्या निमित्तानें परस्त्रीगमन धर्मकृत्य असें ठरविलें. या व अशाच शिकवणीमुळें हिंदुधर्मीय व्यसनी, मिजासखोर, चैनी कर्तव्यशून्य व दैववादी बनलें. वीरशाली भरताच्या वीरप्रसू भारताला अवनतदशा येण्यास हिंदू-धर्मांतील अशाच शिकवणी कारणीभूत आहेत.

सृष्टिकर्तव्य, दैववाद इत्यादि.

ईश्वराकडे सृष्टिकर्तृत्व देऊन व भक्ताच्या सुखदुःखाचा मक्ता ईश्वराकडे ठेवून हिंदुधर्मीयांना पंगू व विवेकशून्य बनविलें. 'देव आपला तारक आहे, तो संकटांतून आपणास मुक्त करणारा आहे,' अशा खुळचट कल्पना उराशीं बाळगणारे हिंदुधर्मीय इंग्रजी सत्तेखालील पारतंत्र्यांतहि राहण्यास नालायख आहेत. हिंदुधर्मीयांच्या देवादिकांबद्दल व मूर्तिविषयक अद्‌भुत कल्पना व त्यामुळें घडलेले अनर्थ यांची इतरांनीं उदाहरणें दिल्यास त्यांत श्लेष काढण्याचा प्रयत्न होईल ह्मणून श्री. दिवेकरांनीं आपल्या या पुस्तकाच्या पान १३७ वर दिलेलें वर्णनच यापुढें दिलें आहे. सोमनाथावर महंमद चाल करून येत आहे यावेळीं हिंदूंनीं काय करावयास पाहिजे होतें व त्यांनीं केलें काय याबद्दल ब्रम्हश्री लिहितात, " महंमद अगदीं तटाजवळ येऊन पोहोंचला, तरी हिंदूलोक किल्याच्या तटावर उभे राहून मुसलमानांकडे पाहून खदखदां हंसत होते ; सोमनाथ तुमचा सर्वांचा नाश करील असें ह्मणून त्यांना भीति घालीत होते. " अशा शापानें मुसलमानांचा नाश थोडाच होणार होता, परंतु सोमनाथाच्या सामर्थ्यांबद्दलची व आपल्या शापाची भलतीच किंमत केल्यानें सोमनाथासह शाप देणाऱ्यांचा नाश झाल्यास त्यांत नवल तें काय ? हिंदुंच्या या अशा भावनेचा मुसलमानांनीं अनेक वेळां फायदा घेतला आहे, अशी साक्ष इतिहासच देत आहे.

एकदां तर पराजित झालेल्या मुसलमानांनीं आपल्या पाठीशीं गाईंचें खिल्लार घालून आपली कत्तल वांचविली. पळणाऱ्या मुसलमानांवर बाण मारावा तर त्यांच्या पाठीशीं असलेल्या गाई मरतील म्हणून हिंदू सैनिकांनीं आपले बाण भात्यांत घातलें व गाईंच्या आश्रयानें मुसलमानांनीं आपला नाश टाळला. ब्राम्हणभोजन घालून व रुद्राभिषेक करून राज्यावर आलेलें संकट टाळण्याची प्रथा पेशवाईअखेरहि प्रचलित होती.

सोमनाथावर चाल करून येणाऱ्या मुसलमानांकडे पाहून जैन खदखदां हंसत राहिले नसतें! देव आपलें संरक्षण करण्यास समर्थ आहे असें कोणीहि जैन म्हणणार नाहीं. आपानें शत्रुंचा नाश करण्याचा हिय्या जैन धरणार नाहींत व ब्राम्हणभोजन व देवपूजा करून आपल्यावरील संकट टळेल असें मानणारहि नाहींत.

जैनधर्माचें ध्येय, साधन व शिकवण

या छोटचाशा पुस्तकांत जनधर्मीय अहिंसा धर्माचें सत्यस्वरूप देऊन व कट्टर अहिंसावादी जैनांना वीर व योद्धे होता येते हे सोदाहरण दाखविलें आहे. तसेंच भारताचें स्वातंत्र्य रक्षण करण्यांत ज्या महाभागांनीं यश संपादिलें त्यापैकीं अनेक स्वातंत्र्योपासक वीर जैन होते हेहि यथामति व सोदाहरण सिद्ध करण्याचा प्रयत्न केला आहे. जग हें मिथ्या आहे व संसार असार आहे, या जैनधर्माच्या शिकवणीमुळें व अहिंसावादाच्या सततोपदेशामुळें हिंदभू स्त्रैण बनली व तिला दास्यत्व आलें असें तिपादन करून आपलें पातक अचूक दुसऱ्या शेंजाऱ्यांच्या पदरीं बांधणाऱ्यांची विचारसरणी व आपल्या घरांतील केरकचरा शेजाऱ्याच्या दारापुढें टाकणाऱ्यांची मनोवृत्ति सारखीच हीन आहे.

या हीन विचारसरणीचें अवलंबन करितांना जैनधर्माची शिकवण प्रवृत्तिपर नसून ती निवृत्तिपर आहे असें गृहीत धरण्यांत येते. आपल्या मताच्या पुष्टयर्थ अशा गोष्टी गृहीत धरून व त्या शाबीत व स्वयंसिद्ध आहेत असें मानून त्यावरून काढिलेली अनुमानें व

त्यावर उभारलेले तर्क वाळूवर उभारलेल्या इमारतीप्रमाणें क्षणार्धांत ढांसळल्यास नवल नाहीं. जैनधर्मप्रसारामुळें हिंदुस्थानची प्रवृत्ति संन्यासधर्माकडे वळली असें प्रतिपादन करणारे व जैनधर्म हा प्रवृत्तिपर नसून तो निवृत्तिपर आहे असें प्रतिपादणारे यांच्या मनांत फारसा फरक नाहीं. संन्यासधर्माला जैनधर्मांत श्रेष्ठत्व दिलें आहे हें जरी खरें असलें तरी तो निवृत्तिपर नसून प्रवृत्तिपर व कर्मयोगाला महत्व देणारा व त्याचा पुरस्कार करणारा आहे हें निर्विवाद आहे. आमच्या मताच्या पुष्टयर्थ आह्मीं श्री. नरसिंह चिंतामण केळकर–संचालक केसरी–हे आपल्या "**भारतीय तत्वज्ञान**" या पुस्तकांत कोणता अभिप्राय देतात हे त्यांच्या शब्दांत शक्य तितक्या विस्तारानें खालीं देत आहों. श्री. केळकर ह्मणतात,

'जैनधर्म हा निवृत्तिमार्गाचा पुरस्कर्ता व कर्मयोगाला महत्व न देणारा आहे, हा समज योग्य नाहीं. जन धर्मतत्वांचें सूक्ष्म निरीक्षण करितां हा समज निराधार असल्याचें दिसून येते. जैनधर्म हा कर्मक्षयार्थ इंद्रियदमनाचा व संसारत्यागाचा पुरस्कार करितो ही गोष्ट सर्वथैव खरी आहे; पण इंद्रियदमन म्हणजे परोपकारप्रवर्तक मनोव्यापाराचा त्याग नव्हे आणि संसारत्याग म्हणजे जगांतील दुःख व अन्याय या विषयींची बेफिकीरी नव्हे; तर इंद्रियदमन हें क्रोधादि स्वार्थजन्य विकारांचें निर्मूलन करण्याचें साधन होय; आणि संसारत्याग म्हणजे सर्व विश्वाचें ज्यायोगें कल्याण होईल अशा कार्यांच्या व उपदेशांच्या आड येणाऱ्या व्यक्तिविषयक स्वार्थी प्रपंच्याचा त्याग होय. (पहा पान ४२८–४२९)

यापुढेंहि श्री. केळकर लिहितातः– 'जैनांची धर्मतत्वें निवृत्तिपर मुळींच नसून ती वृत्तिपर आहेत हें स्पष्ट होतें. उदाहरणार्थ जैनधर्माचा हा मूलभूत सिद्धांत आहे कीं, यतीची तपश्चर्या पुरी होऊन म्हणजे स्वार्थमूलक विकारांवरील त्यांचा विजय पूर्ण होऊन, त्याचें ज्ञान पूर्ण व निर्दोष होतांच (म्हणजे त्याला केवळ ज्ञान प्राप्त होताच)

त्यानें तत्क्षणीं परोपकाराच्या (उपदेशाच्या कार्याला) लागावें. हें परोपकाराचें काय देहावसान होईपर्यंत अव्याहत चालवावें. संसारनिवृत्ति व तपश्चरण हेंच ध्येय असतें तर केवलज्ञान झाल्याबरोबर परोपदेशाचें अखंड व आमरणव्रत जैनधर्मानें सांगितलें नसतें. " (पहा पान ४२९)

जैनधर्माच्या तत्वज्ञानाचें सारसर्वस्व देतांना श्री. केळकर आपल्या पुस्तकाच्या पान ४३१ वर लिहितात :– ' स्वार्थमूलक विकारांस वश झालेला मनुष्य स्वतःहि बुडतो व इतरांसहि बुडवितो, आणि त्याचे उलट स्वार्थरहित पुरुष स्वतःचा उद्धार करून जनतेच्या उद्धारासहि कारणीभूत होतो हें जैनधर्माच्या तत्वज्ञानाचें सारसर्वस्व आहे. लोकांच्या उद्धारांतच आत्मोद्धार आहे, असें जैनांचें तत्वज्ञान आहे. असें असतां जैनधर्म हा केवळ आत्मकल्याणाचा मार्ग दाखविणारा आहे, जगाशीं व जगाच्या प्रपंचाशीं मुमुक्षु पुरुषाला कांहीं कर्तव्य नाहीं असें प्रतिपादणारा आहे, हा समज सर्वस्वीं चुकीचा आहे. "

विस्तारभयास्तव अधिक उतारे देतां येत नाहींत, तथापि वर दिलेले हे उतारे वाचून तरी ब्रम्हश्रींना आपल्या अपकर्षाच्या कारणांची खरीखुरी कल्पना येईल अशी लेखकास उमेद वाटत आहे.

आपल्या पूर्वजांच्या पापावर पांघरूण घालण्याचा व जैनधर्मतत्वांवर अन्याय्यमूलक नसते आरोप करण्याच्या मोहाला बळी पडल्यानें दिवेकरादिकांची अशी फसगत होत आहे. आपल्या पायाखालीं कोण घाण आहे हें पाहून मगच इतरांच्या काल्पनिक दुर्गंधीकडे पाहून नाकास पदर लावणें शहाणपणाचे होईल. ब्राम्हणांनीं इतरांना बौद्धिक गुलामगिरींत डांबून सोडिलें, त्यांच्या विचारशक्तीची खच्ची केली, या व अशाच या पूर्वीं दिलेल्या कारणामुळें हिंदुस्थानला पारतंत्र्य प्राप्त झालें,

हिंदुधर्मांच्याच काय पण अखिल भारतवर्षाच्या अपकर्षाचें मूळ हिंदु-धर्माच्या या अशा शिकवणींतच आहे. जैन व बौद्धधर्मीय अहिंसातत्वा-मुळें व त्या धर्मांतील इतर शिकवणीमुळें हिंदुस्थान स्त्रैण बनला असें म्हणणें म्हणजे वडाची साल पिंपळाला लावण्यासारखेंच हास्यास्पद आहे. या अपकर्षाचा व गुलामगिरीचा माग आपल्याच घराशीं लागतो हें पाहून दिवेकरादिकांना आतां काय वाटेल ?



उपसंहार

जैनधर्मतत्वज्ञान व जैनधर्मीय यांच्यासंबंधी अनेकांनीं जे अनेक निंद्य आक्षेप घेतले आहेत ; त्यापैकीं कांहीं आक्षेपांचा या पुस्तकांत विचार केला आहे. जैनधर्म ही हिंदुधर्माचीं शाखा आहे व भगवान महावीर हे या धर्माचे आद्यसंस्थापक आहेत ; शंकराचार्यांनीं जैनधर्माचें खंडन केलें ; जैनधर्म पाखंडी आहे वगैरे वगैरे अनेक आक्षेप घेतले जातात. शाळा कॉलेजांतून उपयोगांत आणिल्या जाणाऱ्या पुस्तकांत अशींच विधानें केलेली आढळून येतात व त्यामुळें विद्यार्थीदशेंत मनावर झालेले हे संस्कार आजन्म जागृत राहतात. जैनधर्मीयांच्या मनावर झालेल्या या संस्कारामुळें त्यांना आपल्या धर्माबद्दलचा व आपल्या पूर्वजाबद्दलचा योग्य व खराखुरा अभिमान उत्पन्न तर होत नाहींच, उलट आपला धर्म दुबळा, आपल्याला उज्वल इतिहास नाहीं, आपली संस्कृति नाहीं, आपलें वाङमय नाहीं, आपली स्वतंत्र अशी शिल्पकला नाहीं, आपले राजे नव्हते, सरदार-सेनापती नव्हते असे वाटून अशा या नादान धर्मांत व समाजांत आपण जन्मलों तरी कां असें निराशेनें वाटावयास लागल्यास नवल नाहीं.

हिंदुस्थानच्या इतिहासाचा-मग तो अर्वाचीन असो वा प्राचीन असो-कोणताही भाग घ्या त्यांत १०।२० ओळींत जैनधर्म, जैनवाङमय व जैनसंस्कृति वगैरेबद्दल निरवानिरव केली जात असल्याचें आढळून येते. इतक्या विस्तारानें (?) दिलेली माहितीहि विकृतच असते. जैन, जैनधर्म, महावीर वगैरे त्यांतील १०।२० शब्द मात्र खरे असतात.

ग्रीकांनीं ग्रीस देशचा लिहिलेला इतिहास ग्रीक लोकांना मान्य होतो. इंग्लडचा इतिहास इंग्लिशानें लिहिला पाहिजे, तो आयरिशानें लिहिला तरी तो सत्येतिहास नव्हे असें इंग्रज मानितात. ग्रँड डफनें मराठ्यांचा इतिहास लिहिला, परंतु डफसाहेबांची दृष्टी हिंदूची नसल्यानें मराठ्यांचा इतिहास हिंदूंनीं नव्हे तर तो मराठ्यांनींच लिहिला तरच इतिहास या नांवाला पात्र होऊन त्यांत हृद्गत दिसेल; एरव्ही तें दिसणार नाहीं. शिवाजीला राज्यस्थापनेची जी प्रेरणा झाली ती रामदास स्वामीकडून झाली; जिजाईकडून झाली अगर दादोजी कोंडदेवाकडून झाली याबद्दल वाग्युद्ध करितांना जितकीं पानें खर्च पडली आहेत तितके सैनिकही स्वराज्य स्थापन करितांना शिवरायांना खर्चावे लागले नसतील! शिवरायांचा राज्यस्थापनेचा प्रेरक रामदास होता असें शाबीत करण्यांत रामदास स्वामीला शिवरायापेक्षांहि श्रेष्ठत्व मिळतें; व तें मिळावें म्हणून एक पक्ष धडपड करितो तर तें स्थान रामदासाला दिल्यास इतिहास चुकतो अगर शिवरायाला त्यांत कमीपणा येतो असें दुसरा पक्ष म्हणतो. मुद्दा हा कीं ज्या त्या समाजाचा, धर्माचा अगर राष्ट्राचा इतिहास त्या त्या धर्मांतील व राष्ट्रांतील लोकांनींच लिहिणें जरूर आहे असें आग्रहपूर्वक प्रतिपादन केलें जातें. जैनधर्म, जैनराजे, त्यांची राज्यें, जैनाचार्य, त्यांचे ग्रंथ, शिल्पकला व त्यांची संस्कृति याबद्दल लिहिणारी लेखणी जैनांचीच असावयास पाहिजे, असें जैनानांहि ह्मणता येईल.

आपला इतिहास लिहिण्याइतकी बुद्धिमत्ता जैनांत नाहीं असें नाहीं, संपत्तिचा अभाव आहे असेंहि नाहीं; जैन इतिहास लिहिण्यास भरपूर सामुग्रीची वाण आहे असेंहि नाहीं. जैन शिलालेख, जैनाचार्यांच्या पट्टावली, जैनाचार्यांनीं लिहिलेले ग्रंथ, जैनसमाजांतील प्रचलित आख्यायिका इत्यादिकांचा भरपूर अपूर्व व अमूल्य संग्रह आहे. यांचा उपयोग

केल्याशिवाय हिंदुस्थानचाच इतिहास पुरा होत नाहीं असें सर्वच इतिहासज्ञांचें मत आहे. अशा या सामुग्रीवर जैनांचा साग्र व खरा जैन इतिहास लिहिणें अशक्य नाहीं, परंतु जैनांतील औदासिन्य दूर झालें पाहिजे. आपल्या पुर्वजांचा व आपल्या धर्मांचा इतिहास समजून घेण्याची तीव्र इच्छा उत्पन्न झाली पाहिजे. अशी प्रबल इच्छा ज्या दिवशीं उत्पन्न होईल त्याच दिवशीं इतिहास पुरा लिहून झालाच असें समजावें व तोच सुदिन होय. दक्षिण हिंदुस्थानांतील जैनधर्माचा इतिहास आपआपल्या परीं लिहावा अशी इच्छा प्रस्तुत लेखकाला झाली व तसा प्रयत्न करीत असतां जैनधर्मावर इतरांनीं घेतलेल्या अनेक आक्षेपार्ह विधानांची आठवण झाली. ते आक्षेप अयथार्थ आहेत, त्यांत जैनधर्माची व जैनांची निंदा आहे, अशी खात्री झाल्यानें आक्षेपकांचे आरोप दूर करण्यासाठीं जैनधर्मीयांना त्यांच्या पूर्वजांची आठवण द्यावी व मोठ्या प्रमाणावर इतिहास लिहिण्याची स्फूर्ति व्हावी म्हणून हा अल्पसा व अल्पमतीचा प्रयत्न आहे. हे हेतू अल्पांशानेहि कृतींत उतरल्यास आपलें श्रम कार्यीं लागले असें प्रस्तुत लेखक समजेल.

समाप्त.

'ऐतिहासिक जैन वीरा' वरील,
—*विद्वानांचे अभिप्राय*—

मननास उपयोगी पडेल.

आपलें पत्र पोंचले व त्याबरोबर आपलें पुस्तक " ऐतिहासिक जैनवीर "ही पोंचलें. हें साग्र वाचून त्यावर योग्य मननपूर्वक मत देणें हें मला सध्यां २ । ३ महिने मुळींच शक्य नाहीं, इतका कार्यभार माझ्या शिरावर सध्यां आहे. तथापि आपलें पुस्तक येतांच त्यातील बहुतेंक प्रकरणें मी काळजीपूर्वक चाळून पाहिली. त्यावरुन मला असें वाटलें कीं आपण जी माहिती या पुस्तकांत संग्रहित केली आहे, ती बरेच पूर्वग्रह दूर करण्यास कारणींभूत होईल. जैन इतिहासासबंधानें व तत्वज्ञानासंबंधानें पुष्कळांचा ग्रह दूषित झालेला आहे हें खरें. पूर्वीं तसें होण्याचीं अनेक कारणें असण्याचा संभव आहे. पण सध्यां त्यापैकीं एकही कारण उरलेलें नाहीं. म्हणून हा काळ सर्व मतमतांतरांचा शांतपणे विचार करण्यास चांगला आहे. व आपलें पुस्तक अशा प्रकारच्या मननास चांगलें उपयोगी पडेल अशी माझी खात्री झालेलीं आहे.

स्वाध्याय मंडळ
औंध ता. ३।१२।३४

श्री. दा. सातवळेकर,
सम्पादक, पुरुषार्थ.

उद्बोधक, अभिमानास्पद व उत्साहवर्धक

माझे मित्र सांगलीचे सुविख्यात वकील श्री. वा. भु. पाटील

यांनीं आपल्या " ऐतिहासिक जैनवीर " संस्थाचीं मुद्रितें अभिप्रायार्थं माझ्या स्वाधीन केलीं याबद्दल मी प्रथम त्यांचे मनःपूर्वक आभार मानतों. जैनधर्माबद्दल मॅक्समुल्लर प्रभृति ग्रंथकारांनीं व विशेषतः अलिकड ब्रम्हश्री दिवेकरशास्त्री यांनीं आपल्या " आर्यसंस्कृतीचा उत्कर्षापकर्ष " या ग्रंथांत जीं विधानें केलेलीं आहेत त्यांना उत्तर म्हणून हा ग्रंथ श्री. पाटील यांनीं लिहिलेला आहे. जैनधर्माचीं आदितत्वें जीं अहिंसा व संसारमिथ्यात्व त्यांची व्याख्या काय, व्याप्ति कोणती, श्रावकांनीं तीं तत्वें कशीं व कितपत पाळावयाचीं, मुनींनीं त्यांचें बंधनत्व कसें पत्करावयाचें वगैरेंबद्दलचें विवेचन श्री. पाटलांनीं आधारभूत वचनें उद्धृत करून केलेलें आहे व तें बरेंच यशस्वी झालें आहे, यांत संशय नाहीं. या विवेचनावरून माझी असलेली समजूत मात्र दृढ झाली कीं, सर्व धर्मांचीं व विहित कर्मांचीं मूलतत्वें एकच असून त्या धर्मांच्या अनुयायांच्या हातून कळत व नाकळत एखाद्या विशिष्ट तत्वावर अगर कर्मावर फाजील भर दिला गेल्यामुळें तीं तत्वें अगर कर्में कालेंकरुन विकृत स्वरूपांत दिसूं लागतात. श्री. पाटील यांनीं जैनधर्मीय वीरांची व वीरांगनांची दिलेली हकीगत तर अत्यंत उद्बोधक, अभिमानास्पद व उत्साहवर्धक अशी आहे. एकंदरीनें विचार करतां ग्रंथ संग्राह्य झालेला आहे. श्री. पाटील यांना मला शेवटीं अशी विनंती करावीशी वाटते कीं, त्यांनीं जैनधर्माचें संपूर्ण विवेचन असलेला असा एक स्वतंत्र ग्रंथ जरुर प्रसिद्ध करावा, म्हणजे जैनधर्मीयांवरच नव्हे तर माझ्यासारख्या इतर धर्मीयांवर सुद्धां त्यांचे अगणित उपकार होतील.

बलवंताश्रम
पुणे, ता. ९।१२।३४

लक्ष्मण बळवंत भोपटकर.
एम्. ए., एल्एल् बी.

अहिंसा सिद्धांत के प्रचार

आपकी भेजी हुई पुस्तक ' ऐतिहासिक जैनवीर ' की अपूर्ण प्रति प्राप्त हुई और आपकी इच्छानुसार मैंने शीघ्र सरसरी तौरसे उसका अवलोकन भी करलिया । इस विषय की हिन्दी में अभी अभी चार पुस्तके निकल चुकी है । राजपुताने के जैनवीर ' ' मौर्यसाम्राज्य के जैनवीर ' ' जैनवीरों का इतिहास और हमारा पतन ' तथा जैनवीरों का इतिहास इनमें से प्रथम तीन श्रीयुक्त अयोध्याप्रसादजी गोयलीय रचित है और चौथी बाबू कामताप्रसादकृत किन्तु मराठी में अभीतक इस विषय की कोई पुस्तक मेरे देखने सुनने में नही आई थी । आपमे प्रस्तुत पुस्तक द्वारा इस कभी को पूर्ण कर दिया है यह बडे हर्षकी बात है । और प्रांन्तों की अपेक्षा महाराष्ट्र प्रांन्तमें यह धारणा विशेष सूचसे प्रचलित ज्ञाती होती है कि अहिंसा सिद्धांत के प्रचार द्वारा जैनधर्मनें देश का बडा अनर्थ किया है । आपकी पुस्तक यहि इस मतके धारकों के हाथमें पहुंची तो शायद वे एकवार पुनः आपने मत पर विचार करनें के लिये बाद्ध होंगे । आपने पुस्तक के प्रथम प्रकरण यें ' अहिंसा ' पर किये गये आक्षेपों का तथा दुसरें प्रकरण में ' अहिंसा का जैनधर्म ये यथार्थ स्वरुप का जो दिग्दर्शन कहा दिया है उससे पुस्तक का लक्ष्य स्पष्ट होगया है । आशा है मराठी जाननेवाली जनता मे इस पुस्तक का प्रचार होगा और उससे कुछ वर्तमान चमों का निराकरण भी होगा । साथही जैनियों मे भी शायद कुछ स्फूर्ति और उत्साह का संचार हो जाय । इस उद्योग के लिये मैं आपको धन्यवाद समर्पित करतां हूं ।

किंग एडवर्ड कॉलेज — **हिरालाल जैन**

अमरावती ता. ७-१२-३४ — एम्. ए, एल्एल् बी.

गैरसमजूत दूर होईल

ऐतिहासिक जैनवीर नांवाचें पुस्तक वाचून पाहिलें. सदरहू पुस्तक जैन विद्यार्थ्यांना वाचनालायक झालें आहे. अहिंसा धर्मामुळें व अहिंसा धर्माच्या सहवासामुळें इतर हिंदू समाज व जैन समाज स्त्रैण बनला अशी जी कांहीं चांगल्या विद्वानांनीं समजूत करून घेतली आहे; ती या पुस्तकाच्या वाचनानें खात्रीनें निघून जाईल. जैनांचा इतिहास पहावयाचा असल्यास या पुस्तकाच्या वाचनानें चांगली मदत होईल. मराठी भाषेंत अशा पुस्तकांची फार जरूरी होती. रा. पाटील यांनीं हें पुस्तक लिहून ती उणीव दूर केली याबद्दल रा. पाटील यांना आह्मी धन्यवाद देतो.

औद्योगिक हिंसा, आरंभी हिंसा व विरोधिनी हिंसा या तीन प्रकारच्या हिंसेचीं कार्यें गृहस्थी लोकांना अनिवार्य आहेत. अर्थात या गोष्टी श्रावकांना कराव्या लागतात. यांत प्रमत्त योग असल्यामुळें पापाचा बंध होतो, तो टाळणें शक्य नाहीं. अर्थ पुरुषार्थ व काम पुरुषार्थ हीं कार्यें धर्म पुरुषार्थाला विरोध न येतां करावयाचीं असतात.

रावसाहेब रावजी सखाराम दोशी

सोलापूर, ता. ११-१२-३४ संपादक, जैनबोधक.

अज्ञात दालनावर सुसंघटित प्रकाश

वे. शा. सं. महादेवशास्त्री दिवेकर यांनीं आर्यसंस्कृतीचा उत्कर्षापकर्ष ह्या आपल्या पुस्तकांत आर्यसंस्कृतीच्या अपकर्षाची कारण-मीमांसा करतांना जैनधर्म व त्याचें अहिंसावादी तत्वज्ञान यासंबंधीं केलेल्या कांहीं विवादास्पद विधानांच्या खंडनार्थ सांगली येथील वकील

रा. बा. भु. पाटील यांनीं सदरहू पुस्तक लिहिलें आहे. पुस्तकांतील विधानांची पूर्ण कल्पना येण्यासाठीं रा. दिवेकरशास्त्री यांचे मूळ पुस्तक आह्मी समग्र चाळून पाहिले व त्यांतील विधानें बऱ्हंशीं आर्यसंस्कृतीच्या आजच्या अपकर्षाविषयीं आमच्या असलेल्या मतांना पुष्टिकारकच वाटली. 'सहना भवतु सहनौ भुवस्तु सहवीर्यं करवावहै, तेजस्विनावधि तमस्तु मा विद्विषामहै । किंवा जीवेम शरदच्छतम् । यासारखी आशापूर्ण व कर्मप्रवीण शिकवण ज्यावेळीं वैदिक काळीं आर्य-समाजास मिळत होती, त्याचवेळीं ईर्ष्या, त्वेष किंवा द्वेष यासारख्या जीवनकलहास अत्यावश्यक गुणांनीं युक्त होऊन, त्यांनीं द्रविडांच्या आसेतु-हिमाचलावर आक्रमण करून, दाशराज्ञ युद्धासारख्या महायुद्धाच्या प्रसंगीं शत्रूना चीत केलें यांत संशय नाहीं. परंतु " सर्वदुःखं सर्व क्षणिकम् सर्वशून्यम् " यासारखी जगन्मिथ्यावादाची शिकवण गौतमबुद्धानें अज्ञ समाजांत सुरूं करतांच जो तो बालपणीच भिक्षु किंवा परिव्राजक होऊन जग सोडून अरण्यांत भटकूं लागला; व समाजाची एकंदर स्थिति रणभूमीवर प्रज्ञाहत होऊन, धनुष्यबाण टाकून विमनस्क बस-लेल्या अर्जुनाप्रमाणें झाली. यांतच जिनाचार्यांची "अहिंसा परमो धर्मा" च्या शिकवणीची भर पडली. अहिंसा ही देवी संपत्तींतील प्रमुख आहे हें आर्यांना माहित नव्हतें असें नाहीं, परंतु परिणामावरून कार्याची इष्टानिष्टता ठरवावयाची असल्यामुळें कोणत्या वेळीं कोणती गोष्ट हिंसा आहे व कोणती नाहीं, याचें तारतम्य त्यांनीं राखलें होतें. जैनधर्माच्या आचरणांत हें तारतम्य राखलें गेलें नाहीं, ही गोष्ट रा० पाटील यांना कबूलच करावयास पाहिजे.

रा० पाटील यांनीं परिश्रमपूर्वक पुष्कळच माहिती मिळवून जैन धर्मांतील कांहीं वीरश्री पुरुषांचीं चरित्रें ह्या पुस्तकांत दिलीं आहेत व

ती वाचनीय आहेत. परंतु कांहीं व्यक्तींच्या आचरणावरून सर्व सामान्य प्रस्थापित असलेला सिद्धांत बदलू पहाणें हें तर्कशास्त्रदृष्टयाहि सदोषच आहे. सदरहू पुस्तक रा. दिवेकर यांच्या खंडनार्थ लिहिलें असल्यामुळें त्याला अनवश्यक असा वादविवादक सूर आला आहे व त्यामुळें सत्या-न्वेषणाच्या इतिहाससंशोधकाचा पेशा रा० पाटील यांनीं पत्करलेला नसून तो पक्षपातीपणाचा व वकीलीचा आहे असें दिसून येते. अशा प्रकारचें पुस्तकाचें स्वरुप न करतां रा० पाटील यांनीं त्यांत जैन वीरांची नुसती चरित्रेंच दिली असती तर फार चांगलें झाले असते. कारण थोर लोक हे कोणत्याहि समाजांत जन्मले तरी ते थोरच होत. किंवा जैन-धर्माची एकंदर ऐतिहासिक दृष्टया समीक्षा करून हें तत्वज्ञान वैदिक-कर्मकांडाच्या प्रतिकारार्थ कां निर्माण झालें, याबद्दल विवेचन केलें असते तरी त्यामुळें वाचकांना एक नवोन दृष्टीकोन मिळाला असता. परंतु एकानें एक गोष्ट अमुक आहे म्हणून साधार दाखविल्यावर ती केवळ नाहीं म्हणून नुसते भागत नाहीं. चंद्रगुप्त मौर्य हा जैन सम्राट होता म्हणून रा० पाटील यांनीं कांहीं परदेशी सांक्षीदारांच्या जबान्या दाखवन सिद्ध करण्याचा केलेला प्रयन साधार वाटत नाहीं. वयाच्या अमुक वर्षी त्यानें जैनमुनींची दीक्षा घेतली यावरून फार तर त्यानें वानप्रस्थाश्रम पत्करला येवढेंच म्हणावें लागेल. कारण जैन हा शब्द लेखकानेंच सांगि-ल्याप्रमाणें ' जित म्हणजें कामक्रोद्ध ज्यानें जिंकले आहेत तो ' अशा अर्थी आहे. पुस्तक एकंदरींन जैन वाङमयाच्या एका अज्ञात दाल-नावर सुसंघटीत प्रकाश पाडणारे असल्यामुळें उपयुक्त आहे.

औंध पॅलेस — भवानराव पंडित प्रतिनिधी B. A.

ता. १३-१२-३४ — संस्थानाधिपति औन्ध.

अहिंसेच्या तत्वाचें सम्यग्ज्ञान

श्रीयुत बा० भु० पाटील यांचें " ऐतिहासिक जैन वीर " हें पुस्तक जैनांनाच नव्हें तर अहिंसावादाच्या खऱ्या स्वरूपाविषयीं निर्विकार मनानें विचार करूं इच्छिणाऱ्या जैनेतर वाचकांनाहि उपयुक्त होईल यांत शंका नाहीं. रा० पाटील यांनीं अहिंसातत्वामुळें क्षात्रवृत्तीला बाध येत नाहीं, हें युक्तिदृष्टया, जैनधर्मदृष्टया व ऐतिहासिकदृष्टयाहि उत्तम रीतीनें सिद्ध केलें आहे. म० गांधी यांनीं या तत्वाला हल्लीं राजकीय बाबतींत महत्व प्राप्त करून दिलें असल्यामुळें, सत्यस्वरूप सर्वांना समजणें जरूरीचें झालें आहे. रा० पाटील यांच्या प्रस्तुत पुस्तकापासून अहिंसेच्या तत्वाचें सम्यग्ज्ञान मराठी वाचकांना प्राप्त होईल. मताभिमानाला बळी न पडतां लेखकांनीं चिकित्सक बुद्धीनेंच हें पुस्तक लिहिलें आहे, याबद्दल त्यांचे विशेषतः अभिनंदन केलें पाहिजे.

[दि. ब.] आ० बा० लठ्ठे

बेळगांव, ता० ११।१२।३४

स्पृहणीय कामगिरी

जैनधर्माबद्दल बहुजनसमाजांत असलेला समज किती भ्रम-मूलक व अज्ञानमय आहे याची जाणीव " ऐतिहासिक जैनवीर ' या पुस्तकावरून नुसती ओझरती दृष्टी फिरविली असतां सहज होते. खरे सांगायचे ह्मणजे त्या धर्माबद्दल आपल्या पुस्तकानें मला एक नवीनच दृष्टी प्राप्त करून दिल्याप्रमाणें वाटते. ' प्रतिकार करणें हें जैनधर्माप्रमाणें पाप आहे काय ? ' ' अहिंसाधर्म हा क्षात्रवृत्तीला मारक आहे काय ? " " जैनधर्म हा भारतवर्षाच्या उत्कर्षाला की अपकर्षाला कारणीभूत झाला ? " " जैनधर्म हा राष्ट्रधर्म होण्याला

अपात्र आहे काय ? " वगैरे अत्यंत महत्वाच्या प्रश्नांचें या लहानशा पुस्तकांत सप्रमाण आणि अत्यंत सयुक्तिक असें विवेचन केलें आहे. या लहानशा पुस्तकांतील निरनिराळ्या राष्ट्रीय जैनवीरांची माहिती फारच उद्बोधक आहे. हें पुस्तक प्रसिद्ध करून आपण अत्यंत स्पृहणीय कामगिरी बजाविली आहे असें माझ्या अल्प मतीस वाटतें.

गो. बा. पळसुले,
वकील, अकोला.

आक्षेपांचें समर्पक निराकरण

श्रीयुत बा. भु. पाटील " यांनीं ऐतिहासिक जैनवीर " ह्या पुस्तकांत जैनवीर-वीरांगनांची माहिती आणि जैनांचा तेजस्वी इतिहास झणझणित भाषेंत दिलेला असून जैनधर्मीयांच्या अहिंसाधर्मावरील आक्षेपांचे समर्पक निराकरण केलें आहे. जैन इतिहासावरील चोहोंकडे विखुरलेली माहिती संकलित करून मराठी साहित्यांत एका वाचनीय ग्रंथाची भर श्रीयुत पाटील यांनीं घातली आहे व त्यामुळ पुष्कळशा निराग्रही महाराष्ट्र साहित्यकोविदांच्या जैनधर्मविषयक भ्रामक समजुती दूर होतील. श्री. पाटील यांनीं आपल्या एवढ्या उद्योगाचे व्यापांत वेळ काढून हें पुस्तक लिहिलें याबद्दल त्यांचा जेवढा गौरव करावा तेवढा थोडाच आहे.

अकोला [वऱ्हाड]
६।१२।१९३४

मनोहर बापूजी महाजन,
हायकोर्ट वकील.



सत्यवादी स्टीम प्रेस, कोल्हापूर.